अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

ऑक्टोबर २०११ । किंमत १५ रुपये












# 'मेहता मराठी ग्रंथजगत'च्या दिवाळी अंकात वाचा




**विशिष्ट कार्यक्षेत्र निवडून त्यात स्वत:ला झोकून देऊन त्या कार्यक्षेत्रावर स्वत:चा ठसा उमटविणाऱ्या**

| | | |
|---|---|---|
| रा.ग. जाधव | माधव गाडगीळ | चंद्रकुमार नलगे |
| डॉ. अनंत फडके | डॉ. आनंद पाटील | महावीर जोंधळे |
| ह.मो.मराठे | निरंजन घाटे | शांतिलाल भंडारी |

आणि इतर अनेक दिग्गजांचे लेख

(वर्गणीचे नुतनीकरण करा व आजच आपला दिवाळी अंक राखून ठेवा)

◆ ऑक्टोबर २०११
◆ वर्ष अकरावे
◆ अंक दहावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

## — अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **दखल** | १२ |
| **साहित्यवार्ता** | १६ |
| **पुस्तक परिचय** | |
| **धन्वंतरी घरोघरी** : डॉ.ह.वि.सरदेसाई/डॉ. अनिल गांधी | ४४ |
| **तलवारीचा शोध** : अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **ब्रेनप्रोग्रॅमिंग** : डॉ. रमा मराठे | ५६ |
| **अज्ञेय** : रेखा बैजल | ६६ |
| **अभिप्राय** | ७८ |
| **वाचलेच पाहिजे असे** | ८३ |
| **पुरस्कार** | ९२ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | १०० |
| **श्रद्धांजली** | १०२ |
| **बालनगरी** | १०६ |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

**नोव्हेंबरचा अंक हा दिवाळी अंक असेल.
तो ऐन दिवाळीत वाचकांना मिळेल**

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) - २२७/२४३**
**Email -** info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## प्रकाशनक्षेत्राची पुनर्रचना अपरिहार्य

'बुक एक्स्पो अमेरिका' हे न्यूयॉर्कमध्ये दरवर्षी भरणारे ग्रंथव्यावसायिकांचे अधिवेशन यंदा प्रकाशनक्षेत्राने स्वत:ची नवीन ओळख निर्माण करायला हवी असा संदेश देणारे ठरले. या संमेलनात निरनिराळे प्रकाशक आपली आगामी पुस्तके प्रदर्शित करतात. 'महान कल्पनां' ची (बिग आयडियाज्) सांगोपांग चर्चा करणारी परिषद याच वेळी 'बुक एक्स्पो अमेरिका' तर्फे घेण्यात येते. 'ग्लोबल मार्केट फोरम' या उपक्रमात एखाद्या देशाला केंद्रीभूत धरून ग्रंथव्यवहारातील नव्या प्रवाहांवरील प्रकाशन व्यावसायिकांची निरीक्षणे नोंदवली जातात. अमेरिकन बुकसेलर्स असोसिएशनची वार्षिक बैठक याचवेळी होते आणि आंतरराष्ट्रीय डिजिटल पब्लिशिंग फोरमच्या व्यासपीठावर ई-बुक क्षेत्रातील घटनांचा अद्ययावत आढावा घेण्यात येतो. प्रकाशनक्षेत्राच्या समकालीन वाटचालीचा सर्वंकष परामर्श घेण्याच्या दृष्टीने 'बीईए' चा हा वार्षिक सोहळा महत्त्वाचा ठरतो.

या अधिवेशनातील विचारमंथनाची दिशा जाणून घेणे श्रेयस्कर ठरेल.

या सोहळ्यात ग्रंथव्यवसायविषयक पाचव्या सर्वेक्षणाचा अहवाल सादर करण्यात आला. ई-बुक्सच्या विक्रीला ऑक्टोबर २०१० पासून चांगलाच वेग आला असून ए श्रेणीतल्या कादंबरीकारांची नवी पुस्तके २५ ते ३० टक्के ई-बुकच्या स्वरूपात विकली गेली असे आकडेवारीवरून स्पष्ट दिसून आले. एकून ग्रंथविक्रीत मात्र ई-बुक्सचे प्रमाण ११ टक्के आहे. महाविद्यालयीन पाठ्यपुस्तकांचा खप गतवर्षी सुमारे ७ टक्के कमी झाला. ई-बुकच्या संदर्भातील काही निरिक्षणेही या अहवालात नमूद केली आहेत.

(१) ई-बुक बरोबर बाळगणे सोपे जाते. ते पुस्तकासारखे वजनदार नसते.

(२) मुद्रित पुस्तकाच्या तुलनेत त्याची किंमत २०-३० टक्के कमी पडते.

(३) ई-बुक हे सध्या आपल्या वाचनयंत्रावरच वाचता येते. ते दुसऱ्या कोणा मित्राला देता येत नाही. त्याची देवघेव करणे सोयीस्कर व शक्य व्हायला हवे.

(४) ई-बुकमध्ये रंगीत चित्रे, नकाशे असावे.

(५) छापील पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध होण्याआधीच ई-बुक मिळाल्याने ते वाचण्यात विशेष अभिमान वाटतो.

(६) विद्यार्थ्यांना एका सेमेस्टर पुरतीच ई-बुक मिळतात. सेमेस्टरनंतर त्यांची वर्गणी संपल्याने ती वाचता येत नाहीत. यावर काहीतरी तोडगा काढायला हवा.

(७) सारखे स्क्रीनवर वाचून वाचून डिजिटल फटिग (थकवा) येतो. त्यामुळे चारपैकी तीन वेळा छापील पुस्तक निवडले जाते.

(८) डिजिटल पुस्तकांच्या किंमती दरवर्षी कमी होत चालल्या आहेत. १० डॉलर्सवरून ७-८ डॉलर्सवर आल्या आहेत. लेखकांनी स्वत:च प्रकाशित केलेली पुस्तके १ डॉलर ते ३ डॉलरला मिळतात.

(९) एकूण पुस्तकांपैकी सुमारे ७ टक्के ई-बुक्स स्वत: लेखकाने सेल्फ पब्लिश केलेली आढळतात.

(१०) फादर्स डे चा मुहूर्त साधून नव्या टच स्क्रीन वाचनयंत्राचे अनावरण अपेक्षित आहे. किंमत १२९ डॉलर्स.

(१२) डिजिटल पुस्तके ही एक चांगली आणि फायदेशीर गोष्ट आहे हे अमेरिकन वाचकांच्या मनावर ठसवले जात आहे.

(१३) ललितेतर पुस्तके आणि बालसाहित्य यांचे रूपांतर ई-बुक्समध्ये कसे करावे? सध्या ई-बुक्स म्हणजे डीव्हीडीचे विस्तारीकरण असाच समज आहे. आणि त्याला फारशी मागणी नाही.

(१४) डिजिटल पुस्तकांमध्ये जाहिराती टाकाव्यात का? पुस्तके आणि जाहिराती या परस्परविरोधी बाबी आहेत. त्या एकमेकांना पूरक नाहीत असे बहुतेक ग्राहकांचे मन दिसले.

(१५) 'डिजिटल' मुळे ग्रंथप्रकाशन व्यवसायाचे स्वरूप बदलते आहे. गुंतवणूक, उत्पन्न, फायदा यांचे जे पारंपरिक गणित होते ते बदलत आहे. खेळत्या भांडवलाची गरज तीव्र होत आहे.

'बिग आयडियाज्' च्या व्यासपीठावर ई-बुक्सचे भवितव्य या विषयावर विविध मते मांडली गेली. डिजिटल बेस्टसेलर्सच्या याद्या अनेकजण प्रसिद्ध करीत आहेत; त्यामुळे वाचकग्राहकांची दिशाभूल आणि फसगत होते. या याद्या जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ हव्यात आणि त्या एकाच अधिकृत संस्थेतर्फे तयार केल्या जाव्यात. त्यांच्याबद्दल लोकांचा विश्वास वाटला पाहिजे, असे अनेकांनी सुचवले.

'बार्न्स अँड नोबल' या अग्रगण्य ग्रंथविक्रीसंस्थेने 'नूक'ची किंमत स्पर्धात्मक ठेवून, आणि 'कलर नूक' बाजारात आणून हजारो वाचकग्राहकांना नव्याने ई-

बुक्सकडे वळवले आहे. या संस्थेने आपल्या विक्रेत्यांना डिजिटल वापराचे प्रशिक्षण देऊन ग्राहकांना उत्कृष्ट सेवा देऊन ई-बुक्सचा वापर वाढत जावा यासाठी नवनवे मार्ग चोखाळले आहेत. 'नूक' घेऊन ग्रंथदालनात येणाऱ्या ग्राहकांना स्पेशल ऑफर्स देण्यात येत आहेत. नवीन ई-बुक्सची माहिती दिल्यावर ती घेणाऱ्यांचे प्रमाण २५ ते ७० टक्के आहे असा या संस्थेचा अनुभव आहे. 'टॉप २००' या यादीतील पुस्तकांना मोठ्या प्रमाणावर ग्राहकांचा प्रतिसाद मिळतो. अमेरिकेत इतर देशांतील आणि परदेशी भाषांतील डिजिटल पुस्तकांची मागणी आणि विक्री वाढत आहे असेही काही प्रकाशन संस्थांनी नमूद केले. छापील पुस्तकांच्या तुलनेने डिजिटल पुस्तकांचा खप दुप्पट झाला आहे; असे 'स्पॅनिश' बाबतचे निरीक्षण 'बार्न्स अँड नोबल' च्या प्रतिनिधीने सांगितले. जर्मन, इटालियन, पोर्च्युगीज पुस्तकांची मागणीही चांगली आहे. 'आंतरराष्ट्रीय ग्रंथविक्री केंद्रा'ची स्थापना करण्याची आवश्यकता आहे असाही प्रस्ताव ठेवण्यात आला. डिजिटल पुस्तकांच्या किमतीत देशादेशात तफावत पडते यावरही चर्चा झाली. अमेरिकेत डिजिटिल पुस्तकांवर २० टक्के व्हॅट आहे. इंग्लंडमध्ये नाही. त्यामुळे पुस्तके इंग्लंडमध्ये स्वस्त आहेत. सर्व जगभर इंग्लिश पुस्तकांचे एकच अधिकृत मार्केट असावे, इंग्लिश पुस्तकांचे हक्क विकण्याची घाई करू नये असा सल्ला ब्लूम्ससबरीच्या इव्हान स्निटमनने दिला. ॲमेझॉन, बी अँड एन, गुगल, ॲपल यांनी पारंपारिक ग्रंथव्यवसायाचे स्वरूप उद्ध्वस्त करून टाकले आहे. या विनाशातून ग्रंथव्यवहाराची पुनर्रचना करण्याचे आव्हान आपल्यापुढे आहे असा संदेश या 'बुक एक्सपो अमेरिका' च्या अधिवेशनाने दिला अशीच सर्वांची भावना आहे.

दि मॅरेज प्लॉट, दि नाइट सर्कस, टर्न ऑफ माइंड, लास्ट मॅन इन टॉवर, दि लँग्वेज ऑफ फ्लॉवर्स, व्हेन शी वोक, रनिंग द रिफ्ट, स्टेट ऑफ वंडर, यू डिझर्व्ह नथींग, द अंडर साइड ऑफ जॉय, दि आर्ट ऑफ फीलिंग, दि डोव्हकीपर्स, रुल्स ऑफ सिव्हिलीटी, दि प्राग सेमेट्री ही कादंबऱ्यांची नावे लक्षात ठेवा. यंदाच्या बेस्टसेलरर्समध्ये त्यांचा नंबर असण्याची दाट शक्यता आहे. न्यूयॉर्कच्या बुक-एक्स्पो अधिवेशनात या पुस्तकांच्या मार्केटिंगवर विशेष जोर देण्यात आला.

❒



आगामी

# चाय, चाय

**बिश्वनाथ घोष**

अनुवाद

**पूर्णिमा कुंडेटकर**

**१५०रु. पोस्टेज २५रु.**




काही वर्षांपूर्वी कानपूर ते मद्रास प्रवासादरम्यान इटारसी स्थानकावर विश्वनाथ घोष हे पत्रकार पाय मोकळे करायला आणि चहा प्यायला उतरले.

तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, लाखो प्रवासी त्यांच्या मुक्कामाकडे जाणारी पुढची गाडी येण्यापूर्वी इटारसीसारख्या जंक्शनवर कदाचित करोडो तासांचा वेळ घालवत असतील. पण स्थानकापलीकडचे शहर कसे आहे हे शोधण्याची तसदी कोणी घेत नाही. लेखक म्हणतो, भारतातील रेल्वे स्थानके ही शहरांना आणि गावांना जोडणाऱ्या प्रदेशातील उत्कंठावर्धक अशी स्वतंत्र राज्ये आहेत. ती स्थानिक जीवनापेक्षा पूर्णपणे भिन्न असतात. जणू दिल्लीतील एकाच अधिकाऱ्याच्या अखत्यारीतील तो एक वेगळाच प्रदेश असतो, रेल्वेच्या शिट्ट्यांच्या सहवासात लहानाचे मोठे झालेले लोक आणि त्यांचे जीवन याबद्दल जाणून घेण्यासाठी घोष मुद्दाम ह्या शहरांमध्ये फिरले. इटारसी, मुघलसराई, अरक्कोनम, जोलारपेटाई, झाशी, शोरानूर आणि गुंटकल अशा उत्कंठावर्धक नावांच्या शहरांमधून त्यांनी केलेला हा प्रवास....!

**आगामी**

# अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम

मूळ गुजराती लेखक
**दिनकर जोशी**

अनुवाद
**सुषमा शाळिग्राम**

**१२०रु. पोस्टेज २५रु.**




आजमितीला वेगवेगळ्या भाषांत, वेगवेगळ्या प्रदेशांत आणि वेगवेगळ्या धर्मांत मिळून तीनेकशे रामायणे उपलब्ध आहेत, असा अंदाज आहे.

सोळाव्या वर्षी रामाला वैराग्य येते, राम गृहत्याग करतो, वनवासी होतो आणि नंतर कुलगुरू वसिष्ठ त्याची समजून घालून, त्याला उपदेश करून रमायणात आहे. कृष्णाच्या रासलीलेने अत्यंत भारावून गेलेल्या लेखणीबहाद्दरांनी रासलीला करणारा रामही रंगवायला कमी केलेले नाही. रामायणाच्या नावाखाली हे सगळे चालत आले आहे. अनेक असामान्य काव्यात्म ग्रंथही लिहिले गेले आहेत. भवभूती आणि कालिदासही त्यातच आले.

‘समग्र रामकथा हीच मुळात निव्वळ पुराणकथा आहे, यात सत्याचा लवलेश नाही, असा कोणी राम कधी झालाच नव्हता आणि अयोध्या म्हणजे उत्तर प्रदेशातील गाव नाहीच, जावा बेटावरचे जोग्या नावाचे ते एक नगर आहे, थायलंडमधील अयुथ्या (अयोध्या) नावाचे गाव हीच रामजन्मभूमी आहे...’ असली विधाने ‘पुराव्यांनिशी’ करणारेही कमी नाहीत. वाल्मीकीच्या मूळ रामकथेच्या पात्रांची, तिच्या कथानकाची ह्यात भले पुष्टी झाली नसेल, निष्ठापूर्वक समर्थनही नसेल, तरीसुद्धा कुठे कृत्रिम विरोधाभास वाटू नये अशा अकृत्रिम सहजतेने ह्या कथेचे विणकाम करण्याचा हा निष्ठापूर्वक केलेला प्रयास आहे.

**आगामी**

# युवराज्ञी

मूळ इंग्रजी लेखिका

**जीन सॅसन**

अनुवाद

**संयुक्ता कैकिणी**

**१८०रु. पोस्टेज २५रु.**




एका सौदी अरेबियन राजकुमारीला मनश्चक्षूंसमोर आणा, काय दिसतं तुम्हाला? चमचमत्या हिरेमाणकांनी मढलेली, विश्वास बसणार नाही अशा ऐशाआरामात राहणारी स्त्री; पण प्रत्यक्षात मात्र सोनेरी मुलामा चढवलेल्या पिंजऱ्यात राहणारी. तिला स्वातंत्र्य नाही, स्वत:चे मत नाही, स्वत:च्या आयुष्यावर अधिकार नाही; फक्त पुत्र जन्माला घालणारी व्यक्ती एवढीच तिची किंमत.

सुलताना ही सौदी राजघराण्यात जन्माला आलेली, राजेसाहेबांची अगदी निकटवर्ती. बुरखा बाजूला सारून – स्त्रियांचा निर्घृण छळ, तसेच सक्तीचे विवाह, लैंगिक गुलामगिरी व तत्काळ देहान्तशासन यांसारख्या मानवी हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या घटनांचा धक्कादायक इतिहास ती उघड करते.

‘प्रिन्सेस’ ही स्त्रीच्या निर्भीड वृत्तीचा आणि प्रचंड साहसाचा पुरावा आहे. सुलतानाने स्त्रियांच्या अत्याचाराविषयी स्पष्टपणे बोलून स्वत:च्या आणि आपल्या मुलांच्या माथी सौदी समाजाचा रोष ओढवून घेतला आहे. याच कारणास्तव तिने तिची कहाणी अनामिकपणे सांगितली आहे.

मानवी हक्कांची किमान जाणीव असलेल्या कुणाचेही काळीज पिळवटून टाकेल अशी अत्यंत प्रभावीपणे लिहिलेली विश्वसनीय खासगी कथा

**– बेटी महमूदी**

(‘नॉट विदाऊट माय डॉटर’ या सुप्रसिद्ध पुस्तकाची लेखिका.)

आगामी

# तुला आठवताना...

मूळ लेखक
**जॉन ग्रे**

अनुवाद
**शुभदा विद्वांस**

**३००रु. पोस्टेज ३०रु.**




तुम्ही सहज तरून जाल!

एखादी गोष्ट गमावण्याचे दु:ख अटळ असले तरी त्यापासून होणारे नुकसान मात्र आपण टाळू शकतो. आपल्या भूतकाळातील वेदनांवर उपचार करू शकतो आणि त्या अनुभवाकडे सकारात्मक नजरेने पाहून नवीन काही शिकू शकतो. आपले आयुष्य अधिक चांगले बनवू शकतो.

'मार्स ॲण्ड व्हीनस स्टार्टिंग ओव्हर' हे पुस्तक प्रेमातून उद्भवणाऱ्या प्रसववेदनांबद्दल आहे. ही माझ्याकडून जगाला दिलेली भेट आहे आणि अठ्ठावीस वर्षे तुमच्यासारख्या लोकांची सेवा करण्याचे फलित आहे. तुमच्या आत्म्याला या अंधाऱ्या प्रवासात त्याची मदत होईल. तुमच्या निराशेच्या अंधकारात हे पुस्तक एखाद्या मेणबत्तीप्रमाणे प्रकाश देईल, एखाद्या चांगल्या शिक्षकाप्रमाणे मार्गदर्शक ठरेल, तुमच्या एकाकीपणात समजूतदार मित्राप्रमाणे हे पुस्तक तुम्हाला फुंकर घालील. वेदनामय काळात हे पुस्तक जिवाभावाच्या मित्राप्रमाणे उपयोगी ठरेल. हे पुस्तक पुन्हा-पुन्हा वाचा आणि लक्षात ठेवा की तुम्ही एकटे नाही. इतरही पुष्कळ लोक या रस्त्यावरून गेले आहेत आणि त्यांचे ठीक चालले आहे. पुन्हा प्रेम करण्यासाठीच ते जिवंत राहिले आहेत आणि तुम्हीसुद्धा राहाल!

आगामी

# लव्हिंग नॅटली

मूळ लेखक
**बेथ हॉलोवे**

अनुवाद
**पूर्णिमा कुंडेटकर**




२००५च्या मे महिन्यामध्ये बेथ हॉलोवेला एक असा भयानक फोन आला,

बेथची मुलगी नॅटली, तिच्या हायस्कूल सीनियर क्लासच्या ट्रीपला गेलेली असताना अरूबा बेटावरून बेपत्ता झाली.

नॅटली बेपत्ता झाली तेव्हा तिचे फोटो वर्तमानपत्रांच्या मुख्य पानांवर आणि टी.व्ही.च्या सर्व वाहिन्यांवर जगभर झळकले. आपल्या अठरा वर्षांच्या मुलीच्या शोधासाठी बेथने पूर्णपणे समर्पित स्वयंसेवकांच्या ताफ्यासह अथक परिश्रम घेतले.

'लव्हिंग नॅटली' हा एका अकल्पित, मर्मभेदक आणि दुर्दैवी घटनेचा वृत्तान्त आहे. त्यामधून ह्या दुर्दैवी घटनेनंतर जे भ्रष्ट राजकारणाचे दर्शन घडले, त्यामुळे 'सत्तेपुढे शहाणपण चालत नाही' ह्याच गोष्टीचा प्रत्यय येतो.

एका आईच्या हिमतीची, ताकदीची, समर्पणाची आणि अढळ प्रेमाची ही प्रेरणादायी सत्यकथा आहे!

# दखल



## आगामी वर्ष टॅब्लेट पीसीच्या नवीन अवताराचे

इ.स. २०१२ हे वर्ष संगणक क्षेत्रात टॅब्लेट पीसीचे नव्या अवताराचे वर्ष म्हणून नोंदवले जाईल असा जाणकारांचा अंदाज आहे. ॲमेझॉनने चार वर्षांपूर्वी किंडल हे वाचनयंत्र बाजारात आणून ई-बुकच्या संकल्पनेला व्यावहारिक पातळीवर स्थानापन्न केले. किंडलमध्ये सुधारणा करीत ५०० डॉलर्सवरून १४९ डॉलर्सपर्यंत किंमती कमी केल्या. हार्डकव्हरपेक्षा ई-बुक्सची विक्री वाढत गेल्याने ॲमेझॉनचा उत्साह दुणावला. आता यंदा नोव्हेंबरमध्ये ॲमेझॉन किंडल टॅब्लेट पीसी लॉंच करणार आहे. हा वायफाय टॅब्लेट पीसी सात इंच असेल. पुढच्या वर्षी दहा इंची मॉडेल बाजारात येईल. ते थ्रीजी तंत्रज्ञानावर आधारित असेल.

ॲमेझॉनप्रमाणे इतर संगणक उत्पादक संस्था टॅब्लेट पीसीच्या अद्ययावत उत्पादनावर भर देत आहेत.

दक्षिण कोरियातील सॅमसंगने गॅलेक्सी टॅब हे टॅब्लेट पीसीचे मॉडेल विकसित केले आहे.

झेटीई या चिनी कंपनीने तयार केलेले टॅब्लेट पीसी थ्रीजी टॅब नावाने बाजारात आले आहेत.

सिस्को सिअस आणि ब्लॅकबेरी प्लेबुक हा टॅब्लेट पीसी व्यावसायिकांसाठी तयार करण्यात आला आहे.

सोनी या जपानी कंपनीने टॅब्लेट एस बाजारात आणला आहे. त्यात वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचा वापर केला गेला आहे. हा वजनाने हलका असून आकर्षक दिसतो. याच्यावरील स्क्रीनही तंत्रदृष्ट्या प्रगत आणि डोळ्याना आल्हादकारक आहे. अँड्राइड ३.१वर चालणारे प्लेस्टेशन यात प्रथमच वापरले गेले आहे. वाय-फाय सेवा अंतर्भुत असल्याने ऑनलाइन व्हिडिओ आणि टिव्ही पाहणे सुलभ ठरेल तसेच घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तूंसाठी रिमोट कंट्रोल म्हणूनही त्याचा वापर करता येईल. त्यात व्हीजीए चा ५ मेगापिक्सलचा कॅमेरा आहे. टेग्रा २ प्रोसेसर आणि डीएलएनए

तंत्रज्ञानही यात वापरण्यात आले आहे.

'मोटोरोला'चा झूम हा टॅब्लेट पीसी ही अँड्राइड बेस्ड असून त्याचा एचडी डिस्प्ले १०.१ इंची आहे. त्यातील ग्राफीक्स ही विशेष मानली जातात. आयपॅड(ॲपल), गॅलेक्सी टॅब(सॅमसंग), प्लेबुक(ब्लॅकबेरी), स्ट्रीक(डेल), फ्लायर(एचटीसी), मिडियापॅड(ह्युवेई) यांच्यातील स्पर्धा ग्राहकांना निवडीला खूपच वाव देणार आहे.

टॅब्लेट पीसीत नवनव्या तांत्रिक सुविधांचा समावेश होत असल्याने आणि तो कोठेही नेणे आणणे सोयीस्कर असल्याने पारंपरिक संगणकापेक्षा अधिक लोकप्रिय ठरेल अशी अपेक्षा आहे. लॅपटॉपपेक्षाही तो विक्रीत वरचढ राहील. यंदा भारतात १ कोटी १५ लाख पीसी विकले जातील असा कयास आहे. डेस्कटॉप, नोटबुक, लॅपटॉप वगैरे मिळून ५ कोटी युनिटस् गतवर्षी विकली गेली. यंदा त्यात किमान १० टक्के वाढ अपेक्षित आहे. टॅब्लेटपीसींचा उठाव त्यात अधिक दिसला तर आश्चर्य वाटू नये.

**ई-बुक्स क्षेत्रातील प्रचंड स्पर्धा**

ॲमेझॉनने जर्मनीमध्ये किंडल स्टोअर सुरू केले असून त्यामध्ये २५ हजार जर्मन भाषेतीलतील पुस्तके वाचकांना मिळू शकतील.

कोबो या संस्थेने जर्मनीत ई-बुक रीडर विक्रीचा आरंभ केला आहे. कोबोची वाचन यंत्रे जर्मनीतील इलेक्ट्रॉनिक्सच्या दुकानात ऑगस्टपासून सहजी उपलब्ध आहेत. त्याशिवाय आयफोन, आयपॅड, आयपॉड-टच, आणि अँड्राइड यांच्यासाठी जर्मन भाषेतील ॲप्सही विकसित केली आहेत. कोबोने जर्मन भाषेतील ८० हजार ई-बुक्स विक्रीसाठी खुली केली आहेत. त्याशिवाय २४ लाख पुस्तके वाचकांना ई-बुक स्वरूपात मिळू शकतील. फ्रेंच, इटालियन, स्पॅनिश, डच भाषांतील पुस्तके तेथे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊ शकतील.

गुगलने इरिव्हरच्या सहकार्याने आपला ई-रिडर बाजारात आणला असून त्याची किंमत १३९ डॉलर्स ठेवली आहे. सहा ई- इंक स्क्रीन आणि क्यूडब्लूइआरटी कीबोर्ड असून गुगलची हजारो पुस्तके त्यावर विकत घेऊन वाचता येतील. शिवाय ३०लाख पुस्तके मोफत उपलब्ध आहेत ती वेगळीच! गुगल बुक्सचे प्रॉडक्ट मॅनेजर म्हणून प्रतीप बॅनर्जी हे गुगलच्या ई-बुक्सचा प्रसार वेगाने व्हावा यासाठी व्यूहरचना करीत आहेत.

**मॅन बुकर प्राइझ**

दि मॅन बुकर प्राइझ हे कादंबरीला मिळणारे जगातले सर्वाधिक रकमेचे बक्षीस आहे. या पुरस्काराची रक्कम वाढत आज पन्नास हजार पौंड म्हणजे सुमारे चार कोटी रुपये झाली आहे. कॉमनवेल्थ मधील देशांतील लेखकाने मूळ इंग्रजीमध्ये लिहिलेल्या कादंबरीचा विचार या पुरस्कारासाठी केला जातो. या पुरस्काराची

कार्यपद्धती वाचकांना सामावून घेणारी तसेच जाणत्यांचाही कौल घेणारी आहे. प्रथम स्पर्धेसाठी पात्र अशा कादंबऱ्यांची यादी करून तिच्यातील शंभर दीडशे पुस्तकांची प्राथमिक निवड करण्यात येते. या यादीतून वीसेक पुस्तकांची मोठी यादी मे महिन्यात प्रसिद्ध केली जाते. ऑगस्ट मध्ये त्यापैकी सहा पुस्तकांची छोटी यादी जाहीर केली जाते. ऑक्टोबर मध्ये अंतिम निर्णय भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात जाहीर केला जातो. 'बुकर'च्या प्रत्येक टप्प्यावर निवडलेल्या पुस्तकांची दखल चोखंदळ वाचक घेतात आणि आपली मते कळवतात. निवड समितीचे सदस्यही आधीच जाहीर केले जातात. या पुस्तकांची विक्री मोठ्या प्रमाणावर होते. शॉर्ट लिस्ट मधील पुस्तकांना चांगली मागणी असते. पुरस्काराची घोषणा झाल्यावर विजेत्या लेखकाला आणि पुस्तकाला माध्यमे अफाट प्रसिद्धी देतात. एका रात्रीत लेखकाचे आणि पुस्तकाचे भाग्य फळफळते. लेखकाला अनभिषिक्त राजपदच जणू बहाल केले जाते. पुस्तकाच्या लाखो प्रती जगभर विकल्या जातात.

यंदाच्या मॅन बुकरच्या शॉर्ट लिस्टमध्ये पुढील सहा पुस्तकांना स्थान मिळाले आहे.

१. दि सेन्स ऑफ ॲन एन्डिंग - ज्युलियन बार्नेस (जोनाथन केप)

२. जॅमराच्स् मेनेजरी - कॅरोल बर्च (कॅनन गेट)

३. दि सिस्टर्स ब्रदर्स - पॅट्रिक डेविट (ग्रान्टा बुक्स)

४. हाफ ब्लड ब्ल्जूज - एसी एड्युग्यान (सर्पन्ट्स टेल)

५. पिगन इंग्लिश - स्टीफन केलमन (ब्लूम्सबरी) घाना देशातून आई व मोठी बहीण यांच्याबरोबर आलेल्या अकरा वर्षाच्या हॅरिसनला दिसलेले इंग्लंडमधले वास्तव.

६. स्नोड्रॉप्स - ए. डी. मिलर (अटलांटिक बुक्स) मॉस्कोतील हिवाळ्यात एका तरुण प्रेमिकाच्या मनात उठलेली वादळे.

**'पेंग्विन इंडिया'**

पेंग्विन इंडियाच्या प्रकाशिका म्हणून चिकी सरकार यांनी सूत्रे हाती घेतली. रँडम हाऊस इंडिया मध्ये संपादन प्रमुख म्हणून त्या गेली ५ वर्षे काम पाहात होत्या. अनिता देसाई, सलमान रश्दी, झुम्पा लाहिरी या लेखकांबरोबर त्यांनी काम केले होते. त्याअगोदर लंडनमध्ये त्या ब्लूम्सबरीमध्ये सात वर्षे कार्यरत होत्या.

**शंकर सारडा**

ई १० पाटील रिजन्सी, १५ एरंडवणे, पुणे ४११००४.

मोबा.९८२३२६१०२३

❐

**नवे कोरे**

# क्लाराज वॉर

**क्लारा क्रेमर/स्टीफन ग्लान्झ**

अनुवाद

**डॉ. प्रमोद जोगळेकर**

**३००रु. पोस्टेज ३०रु.**




''आपल्या प्रिय व्यक्ती आपल्यापासून हिरावून मृत्यूच्या दाढेत फेकल्या जातात आणि तरीही आपण जगतच राहतो.''

२१ जुलै १९४२ रोजी नाझी सैन्यानं पोलंडवर आक्रमण केलं आणि झोल्किव या छोट्या गावातल्या पंधरा वर्षीय ज्यू मुलीचं, क्लारा क्रेमरचं आयुष्य बदलून गेलं. तिचे मित्र-नातेवाईक ठार केले जात असताना किंवा आगखान्यात जळून खाक होण्यासाठी नेले जात असताना, क्लारा नि तिचे कुटुंबीय एका तळघरात लपून जीव वाचवण्यासाठी झगडले. तेदेखील कुठं तर वरकरणी ज्यूद्वेष्टा वाटणाऱ्या बेक नावाच्या जर्मन माणसाच्या घराखाली.

साठ वर्षांनंतर आता क्लारा क्रेमर तिची करुण कहाणी सांगते आहे. सतत मृत्यूच्या सावलीत जगणाऱ्या क्लाराच्या या विलक्षण आठवणींमध्ये क्रौर्य, भीषण हत्याकांडे आणि नाझींच्या सैतानी प्रवृत्तीची छाया हे सगळं असलं, तरी अखेर ही कहाणी आहे एका तरुण मुलीच्या दुर्दम्य आशावादाची आणि धैर्याची.

# साहित्यवार्ता

## * भाषांतर : शब्दार्थ आणि भावार्थ!

भाषांतर करताना नेमका शब्द ओळखणारी संगणकपूरक नियमावली

एखादी व्यक्ती आपल्याला त्रास देत असेल तर आपण म्हणतो, 'मला उगाचच ताप देऊ नको..' पण एखाद्याची तब्येत बिघडली तरी आपण म्हणतो, 'त्याला ताप आला आहे...' ताप या एकाच शब्दाचे दोन अर्थ आहेत. ताप हा शब्द एका ठिकाणी न्युइसेन्स या अर्थाचा असून दुसऱ्या ठिकाणी तो फिव्हर या अर्थाशी संबंधित आहे. संगणकाच्या साह्याने इंग्रजीत भाषांतर करताना या दोन्ही शब्दांपैकी हवा असलेला नेमका शब्द ओळखणारी संगणकपूरक उपयुक्त नियमावली भाषाशास्त्रज्ञ वीणा दीक्षित यांनी तयार केली आहे. या संशोधनाला म्हैसूर विद्यापीठाने 'पीएच.डी.' प्रदान करून गौरविले आहे. दीक्षित यांच्या संशोधनाची दखल कर्नाटकमधील संस्थांनीही घेतली आहे. तेथील भारतीय भाषा संशोधन संस्था या संशोधनावर आधारित पुस्तक इंग्रजीत, तर म्हैसूर विद्यापीठ कन्नड भाषेत प्रकाशित करणार आहे. शब्दश: अर्थानुसार सहसा भाषांतर केले जाते. मात्र, वाक्याच्या अर्थानुसार संगणकाच्या माध्यमातून त्याचे नेमके भाषांतर करण्याची सुविधा अद्याप उपलब्ध नाही. प्रत्येक भाषेतील शब्दांचे अर्थ व त्यांच्या छटा वेगळ्या असतात. या पार्श्वभूमीवर एखाद्या वाक्याचे, परिच्छेदाचे त्याच्या मूळ व अपेक्षित अर्थानुसार संगणकाच्या माध्यमातून भाषांतर शक्य होणार आहे. संगणक प्रणालीमध्ये उपयुक्त नियमावलीचा समावेश केल्यास मागच्या व पुढच्या शब्दांचा अर्थ लक्षात घेऊन वाक्याच्या अर्थानुसार शब्द शोधून संगणक स्वत: त्याचे नेमके भाषांतर करू शकेल.

पदार्थविज्ञान व गणित या विषयात बीएस्सी केल्यानंतर मराठी व भाषाशास्त्र या विषयांचे पदवी शिक्षण घेऊन वीणा दीक्षित यांनी आयआयटी, पवई येथे मराठी भाषेच्या 'स्पेलचेकर' मोहिमेत त्यांनी भाग घेतला. त्यातून त्यांना संगणकीय भाषांतरासंबंधी संशोधनाची प्रेरणा मिळाली. यासाठी त्यांनी म्हैसूरच्या संशोधन संस्थेशी २००५ मध्ये

संपर्क साधला. 'अनेकार्थता व यंत्र (संगणक) मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा' हा विषय त्यांनी निवडला. या संशोधनासाठी पी.पी. गिरिधर यांनी मार्गदर्शन केले.

"भाषांतराचे शब्दश: व अर्थानुसार असे प्रकार आहेत. पण अर्थानुसार संगणकाद्वारे भाषांतर करणे, हे आव्हान आहे. संगणक प्रणालीत या उपयुक्त नियमावलीचा समावेश केल्यास मराठी मजकुराचे हिंदी व इंग्रजीमध्ये भाषांतर करता येईल," असे दीक्षित यांनी नमूद केले.

*** डिजिटल विश्वकोश युनिकोडमध्ये**

मराठी विश्वकोश आता युनिकोड मध्येडिजिटल स्वरूपात संपूर्ण जगभर मोफत पहावयास मिळेल, अशी माहिती मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या अध्यक्षा डॉ. विजया वाड यांनी दिली.

पहिला खंड तयार झाला असून दर महिन्याला एक या प्रमाणे उर्वरित खंड डिजिटल स्वरूपात येतील.

महाराष्ट्र शासन, सी डॅक व मराठी विश्वकोश यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प उभा रहात आहे. विश्वकोशाला मिळणाऱ्या अनुदानातून याचा खर्च भागवणे शक्य होणार नाही म्हणून राज्य शासनाच्या संकेतस्थळावरील जागा मागण्यात आली आहे, असे विजया वाड म्हणाल्या.

*** कबीर आणि कुमार गंधर्व**

'कबीराच्या वाणीवर काळाची तर कुमार गंधर्वांच्या गाण्यावर नश्वरतेची छाया होती, पण अटळ भक्ती आणि अभिव्यक्तीतली प्रश्नवाचकता यामुळे दोघेही कालातीत ठरले. कुमारांनी कबीराचा असा पुनराविष्कार केला की आता कुमारांशिवाय कबीर एकूच येत नाही," अशा भावना ज्येष्ठ हिंदी कवी व समीक्षक अशोक वाजपेयी यांनी व्यक्त केल्या.

डॉ. स. म. परळीकर लिखित व यशवंत प्रकाशन प्रकाशित 'सार्थ निर्गुणी भजने' या पुस्तकाचे ज्येष्ठ गायिका कलापिनी कोमकली यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. मुकुंद संगोराम, डॉ. श्रीराम लागू, यशवंत प्रकाशनचे गिरीश जोशी आदी




**३री आवृत्ती**

**बकुळा**

**अनु. लीना सोहोनी**

बकुळीच्या साक्षीने जन्मलेली श्रीमती आणि श्रीकांत यांची अनोखी प्रेमकहाणी

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

उपस्थित होते.

वाजपेयी म्हणाले, ‘कबीराच्या भजनांची भाषा जरी ‘सगुणा’ची असली तरी त्यातील संदेश ‘निर्गुणा’चा आहे. याबाबत कुमार गंधर्व म्हणत की, निर्गुण ते समजावे जे मनाला लागते पण घायाळ करत नाही! कुमार हे विसाव्या शतकातले कबीरच आहेत असे म्हटले जाते, पण कबीर सोळाव्या शतकातले कुमार होते असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही!’’

परळीकर यांनी सांगितले, ‘‘कबीराची भाषा अतिशय सांकेतिक आहे. पद वाचल्यावर ताबडतोब ते समजतेच असे नाही, पण एकदा अर्थ कळला की ही निर्गुणी भजने मनावर ठसतात. ‘सार्थ निर्गुणी भजने’ या पुस्तकात मी या भजनांचा भावार्थ उलगडण्याचा प्रयत्न केला आहे.’’

संगोराम म्हणाले, ‘‘कुमार गंधर्व केवळ एक अभिजात शास्त्रीय गायकच नव्हते तर निर्गुणी भजनांमधून एका वेगळ्याच जगाची निर्मिती करणारे निर्मातेही होते. ‘मर्गी’ आणि ‘देशी’ या संगीताच्या दोन वाटा कुमारांनी निर्गुणी भजनांच्या निमित्ताने एकत्र आणल्या.’’

*** औरंगाबाद जिल्हा लोककला महोत्सव**

राजीव गांधी जन्मोत्सव समितीने आयोजित केलेला लोककला महोत्सव म्हणजे ग्रामीण कलावंतांसाठी एक मोठे व्यासपीठ आहे. कलाकारांनी स्पर्धेत टिकण्यासाठी कलेची साधना करावी, सादरीकरण करावे, महोत्सवाचा फायदा घ्यावा, असे प्रतिपादन आ. डॉ. कल्याण काळे यांनी केले.

या महोत्सवात ९८ प्रवेशिका आल्या. त्यात भारूड, गवळण, आराधी, वाघ्या-मुरळी, गोंधळ, जागरण, वासुदेव यांचा समावेश होता. शिवनारायण रेणुके, रामकृष्ण मांडोळे, अविनाश अंभोरे, जिजा इंगळे, बबन डिडोरे, ज्योती जाधव, सी. जी. बोरसे, बी.डी.सूर्यवंशी, भीमराव अंभोरे, श्रीराम इंगळे, मधुरा पारूआ, प्रा. महेंद्र डेरे, सिद्धार्थ जाधव, जनार्दन रायबोले, सुधाकर मांडोळे, भागवत घायतडक, वीर गुरुजी, उत्तम आव्हाड यांनी महोत्सवाच्या यशासाठी अथक प्रयत्न केले.

*** ऑस्ट्रेलियात ‘बॉलिवूड धमाका’**

‘‘भारतातील चित्रपट आणि त्यातही बॉलिवूड यांच्या संदर्भात ऑस्ट्रेलियातील लोकांना औत्सुक्य आहे. मेलबर्न आणि सिडनी येथील काही चित्रपटगृहांमध्ये हिंदी चित्रपट प्रदर्शित होतात. ३५ हजार भारतीय वंशीयांचे ऑस्ट्रेलियात वास्तव्य असल्यामुळे या चित्रपटांना उत्तम प्रतिसाद मिळतो,’’ असे ऑस्ट्रेलियाचे भारतातील व्यापार प्रतिनिधी स्टीव्ह वॉटर्स यांनी सांगितले. नाच-गाणी आणि ॲक्शन हा भारतीय चित्रपटांच्या यशाचा ‘फॉर्म्युला’ आता ऑस्ट्रेलियन चित्रपटांतही प्रतिबिंबित झाला

आहे, असे ते म्हणाले.

ऑस्ट्रेलियन चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन वॉटर यांच्या हस्ते झाले. राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रशांत पाठराबे, वीरेंद्र चित्राव आणि सतीश जकातदार या प्रसंगी उपस्थित होते. १९९५ नंतरचे ऑस्ट्रेलियन चित्रपट दाखविण्यात आले.

वॉटर म्हणाले, ''१९०६ मध्ये ऑस्ट्रेलियन चित्रपटाची निर्मिती झाली. त्यानंतरच्या काळात येथील चित्रपटांना अमेरिकन चित्रपटांशी स्पर्धा करणे अवघड झाले. १९७० च्या दशकात अनेक आशयघन आणि दर्जेदार चित्रपटांची निर्मिती झाली. आंतरराष्ट्रीय स्तरावर नाममुद्रा उमटविणारे कलाकार आणि दिग्दर्शक घडविले. जगभरातील लोकांच्या मानसिकतेनुसार ऑस्ट्रेलियातील दर्शकांनासुद्धा 'शेवट गोड' असलेले चित्रपट आवडतात. भारताप्रमाणेच येथेही व्यावसायिक आणि कलात्मक चित्रपट असे भेद आहेत. मात्र, त्यातील सीमारेषा धूसर असल्याने कलात्मक चित्रपटांनादेखील व्यावसायिक यश लाभते.''

*** 'गुरुदत्त ॲकॅडमी'**

''माझे वडील गुरुदत्त यांनी पुण्यातील प्रभात स्टुडिओतूनच कारकिर्दीस सुरुवात केली. त्यामुळे पुण्यातच त्यांच्या नावाने ॲक्टिंग ॲकॅडमी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि आज या ॲकॅडमीतील पहिली तुकडी बाहेर पडल्याचे समाधान वाटते,'' अशी भावना श्रेष्ठ चित्रपट दिग्दर्शक गुरुदत्त यांचे पुत्र अरुण दत्त यांनी नुकतीच व्यक्त केली. 'गुरुदत्त फिल्म्स ॲक्टिंग ॲकॅडमी' या संस्थेतून पहिली तुकडी बाहेर पडल्याच्या निमित्ताने त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

अरुण दत्त म्हणाले, ''गेल्या वर्षीपासून मी पुण्यात राहत आहे. चित्रपटाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणारी 'एफटीआयआय' व्यतिरिक्त दुसरी कोणतीच संस्था पुण्यात नसल्याचे जाणवले म्हणून पुण्यात 'गुरुदत्त फिल्म्स ॲक्टिंग स्कूल'ची स्थापना करण्यात आली. या संस्थेच्या माध्यमातून चित्रपटाच्या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठी संधी देण्याचा प्रयत्न आहे.'' या ॲक्टिंग ॲकॅडमीतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना नामवंत प्रॉडक्शन कंपन्या, दिग्दर्शकांसोबत काम करण्याची संधी मिळू शकेल असेही




**मध्यरात्रीचे पडघम** ६ वी आवृत्ती

रत्नाकर मतकरी

रत्नाकर मतकरींच्या मंत्रमुग्ध करणाऱ्या गूढकथा

१२०रु. पोस्टेज २५रु.

ते म्हणाले.

*** स्वरयात्री नाथ नेरळकर गौरव ग्रंथ प्रकाशन**

संसार सांभाळणारी पत्नी व मला सांभाळणारे तुम्ही रसिक मिळाल्याने शिस्त लागली. चांगले शिष्य मिळाले म्हणून निर्मिती करता आली; अन्यथा मी झीरोच आहे, असे उद्गार ज्येष्ठ स्वरयात्री नाथराव नेरळकर यांनी काढले.

डॉ. मंगला वैष्णव संपादित 'स्वरयात्री नाथ नेरळकर' गौरवग्रंथाचे प्रकाशन माजी खासदार व उद्योगपती मोरेश्वर सावे यांच्या हस्ते झाले. यावेळी गायक पं. सत्यशील देशपांडे, गायक सुधाकरराव जोशी आणि शिक्षण सहसंचालक डॉ. भोजराज चौधरी व प्रतिभा प्रकाशनचे प्रफुल्ल देशपांडे उपस्थित होते.

ते म्हणाले, गुरूने दिलेले गाणे बायकोमुळेच सांभाळता आले. शिष्यांकडून रियाज करून घेताना माझाही रियाज झाला. त्यातून नवनिर्मितीची प्रेरणा मिळाली व काहीतरी निर्मिती झाली. हे प्रेम असेच राहू द्या.

''सदैव प्रसन्न, मनस्वी संगीत तपस्वी असलेले नाथराव स्वप्नाळू पण दिलदार कलावंत आहेत. माझी व त्यांची मैत्री ६० वर्षे जुनी आहे. त्यामुळे त्यांनी घडविलेले संगीताचे गुरुकुल मी जवळून पाहिले आहे. त्यांच्या मागे त्यांच्या पत्नी सुशीलाबाई, म्हणजेच अम्माई उभ्या राहिल्यामुळेच त्यांना संगीताचा संसार उभा करता आला'', असे मोरेश्वर सावे म्हणाले.

पं. सत्यशील देशपांडे म्हणाले, जो हे पुस्तक वाचेल तो या नाथ संप्रदायाचा सदस्य बनून राहील. भावनेचे सादरीकरण कसे करावे, मैफल कशी रंगवावी हे नाथरावांकडून शिकावे, असे मत सुधाकर जोशी यांनी मांडले.

ग्रंथाच्या संपादिका डॉ. मंगला वैष्णव म्हणाल्या, नाथरावांच्या वाढदिवसालाच हा गौरवग्रंथ लोकार्पण करण्याचे आम्ही ठरविले होते. त्यामुळे केवळ पाच महिन्यात हे काम पूर्ण केले.

*** नारायण मूर्ती निवृत्त**

'इन्फोसिस' या जागतिक दर्जाच्या आयटी कंपनीचे संस्थापक-अध्यक्ष एन. आर. नारायण मूर्ती यांनी 'इन्फोसिस'मधून निवृत्ती पत्करली आहे. मूर्ती आता मानद अध्यक्ष म्हणून काम पाहतील. अध्यक्षपदाची धुरा आता आयसीआयसीआय बँकेचे माजी अध्यक्ष के. व्ही. कामत यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

नारायण मूर्तींनी १९८१ मध्ये सहा सहयोगी अभियंत्यांसमवेत पुण्यात 'इन्फोसिस'ची स्थापना केली. त्यानंतर केवळ २० वर्षातच इन्फोसिसला जागतिक पातळीवरील एक श्रेष्ठ कंपनी बनविण्यात ते यशस्वी ठरले. सलग ३० वर्षे ते 'इन्फोसिस'चे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. कंपनीच्या भागविक्रीतून त्यांनी कंपनीच्या हजारो कर्मचाऱ्यांना

करोडपती बनवले.

मानद अध्यक्ष म्हणून आता इन्फोसिसला केवळ मार्गदर्शन करायचे काम मूर्ती करतील. कंपनीच्या व्यवस्थापनाच्या बैठकांना उपस्थित राहणार नाहीत, पण कोणालाही व्यक्तिगतरीत्या भेटू शकतात.

*** प्रा. रा. ग. जाधव -८० व्या वर्षांत पदार्पण**

''विज्ञान-तंत्रज्ञानाची प्रगती, जागतिकीकरण, कमी होत जाणारे नैसर्गिक स्त्रोत आणि माणसाच्या वाढत्या आकांक्षा या साऱ्या बाबी असल्या तरी माणसाची सर्जनशीलता ही अंतिम चांगली गोष्ट आहे. वाङ्मय, चित्रकला, नृत्यकला, शिल्पकला, गायन, वादन या ललित कलांसह विज्ञानामध्ये निरंतर प्रयोग होत राहणार आहेत. रामराज्य येणार नाही यावर जसा माझा ठाम विश्वास आहे, तसाच विश्वास माणसाच्या सर्जनशीलतेवर आहे. नवनिर्माण करणाऱ्या कलावंतांवर श्रद्धा ठेवली पाहिजे,'' अशी भावना ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केली.

जाधव यांनी २४ ऑगस्ट रोजी ऐंशीव्या वर्षात पदार्पण केले. पद्मगंधा प्रकाशनतर्फे त्यांच्या 'मराठी समीक्षेचा परिप्रेक्ष्य' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते झाले. प्रकाशक अरुण जाखडे आणि 'साधना'चे संपादक डॉ. नरेंद्र दाभोलकर यावेळी उपस्थित होते.

'साधना'च्या हीरक महोत्सवानिमित्त निवडक ग्रंथांचे संपादन आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मराठी वाड्मय इतिहासाचे खंड संपादित करण्याची संधी माझ्यासाठी आनंददायी ठरली. माझ्या पुस्तकांविषयी जेवढे समाधान नाही, त्याहून अधिक समाधान या कामाचे आहे, असेही जाधव यांनी सांगितले.

कोत्तापल्ले म्हणाले, ''समीक्षक असूनही जाधव यांनी कधी कुणाला दुखावले नाही. त्यांची समीक्षा मराठी साहित्य आणि समीक्षेचा परीघ विस्तारला असून, होणाऱ्या विविध प्रयोगांविषयी त्यांना जाण आहे. त्याकडे ते सजगपणे पाहतात.''

*** जोहार मायबाप जोहार**

''मांडलेला विचार आचरणात आणला जात नाही. वास्तविक आजच्या जगात विचारवंत न होता आचारवंत होण्याची गरज आहे,'' असे मत संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. अशोक कामत यांनी व्यक्त केले. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या मंजुश्री गोखले लिखित 'जोहार मायबाप जोहार' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. कामत यांच्या हस्ते झाले. डॉ. रामचंद्र देखणे, डॉ. सदानंद मोरे, गणेश दीक्षित यावेळी उपस्थित होते.

डॉ. कामत म्हणाले, ''संत साहित्याचे लेखन सर्वांनी शुद्ध अंत:करणाने करायला हवे. पैसा व प्रतिष्ठेसाठी कोणी लिखाण करू नये. कोणतीही गोष्ट

लिहिताना श्रद्धेने व अभ्यासपूर्ण पद्धतीने लिहावी. ग्रामीण भागात मंदिरांची होणारी उपेक्षा, गणपतीसमोर चालणारे जुगाराचे अड्डे बंद करायला हवेत.''

डॉ. देखणे म्हणाले, ''संत ज्ञानेश्वर म्हणजे महाराष्ट्राचा श्वास, संत तुकाराम महाराष्ट्राचा नि:श्वास, तर संत चोखा मेळा महाराष्ट्राचा ध्यास आहे. बालगंधर्वांच्या गळ्यातील 'जोहार मायबाप जोहार' हा स्वर शब्दरूप होऊन या कादंबरीत आला आहे.'' संत चोखा मेळा सोडून महाराष्ट्रातील सर्व संतांवर खूप लिखाण झाले आहे. संत चोखा मेळा यांच्या जीवनावर कादंबरी लिहून लेखिकेने त्यांना न्याय दिला आहे, असे मोरे म्हणाले.

*** बारामती येथे १८ वे साहित्य संमेलन**

'नवोदित साहित्यिकांनी अभ्यासपूर्ण लिखाण केल्यास साहित्याचा दर्जा टिकेल. ग्रंथ हाच आपला सोबती आहे. त्यामुळे वाचन संस्कृती वाढली पाहिजे. त्यावर समीक्षण झाले पाहिजे. लेखक हाच स्वत:चा समीक्षक असतो. ग्रंथवाचनातून मिळणारा आनंद जगाच्या पाठीवर कोठेही नाही,' असे मत ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांनी बारामती येथे '१८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलना'चे उद्घाटन करताना व्यक्त केले.

संमेलनाध्यक्ष डॉ. आ. ह. साळुंखे, प्रकृती-अस्वास्थ्यामुळे उपस्थित राहिले नाहीत. त्यांच्या लिखित भाषणाचे वाचन करण्यात आले. मावळते संमेलनाध्यक्ष प्रा. रामनाथ चव्हाण, स्वागताध्यक्ष इम्तियाज शिकीलकर, निमंत्रक नाना सातव, प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजीराव सावंत आदी उपस्थित होते.

यावेळी 'लोकमत'चे वार्ताहर वसंत मोरे यांना 'सत्यशोधक दिनकरराव जवळकर पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

रामनाथ चव्हाण म्हणाले, ''भगवान गौतम बुद्धांच्या विचारांची गरज या देशाला होती; मात्र त्या काळच्या समाजधुरिणांनी त्यांना या देशाबाहेर जाण्यास प्रवृत्त केले; परंतु बौद्ध भिक्षू ज्या देशांमध्ये गेले, तेथे समृद्धी, विकास आणि शांतता स्थापित झाली. डॉ. आंबेडकर यांनी बुद्धांचे विचार पुन्हा भारतात आणले. आंबेडकरी विचारांतून क्रांतिकारी साहित्य निर्माण झाले.''

संमेलनाध्यक्ष डॉ. आ. ह. साळुंखे यांचे भाषण वाचून दाखविण्यात आले. त्यांनी नवोदितांना मार्गदर्शन करताना, ''इतिहासाच्या पानांवर आपल्या अस्तित्वाचा ठसा उमटवायचा असतो. वैचारिक साहित्य आणि ललित साहित्य असे दोन प्रकार केले, तरी दोन्ही प्रकारांना लागू पडणारी समान तत्त्वे असतात. याचा विसर पडता कामा नये. नवोदित साहित्यिकांनी अनुकरणात अडकून पडू नये, हे पाहणेदेखील आवश्यक आहे,'' अशी अपेक्षा व्यक्त केली.

* **‘सबकुछ गुलजार’**

प्रसिद्ध गीतकार, लेखक, दिग्दर्शक गुलजार यांच्या वाढदिवसानिमित्त १८ ऑगस्ट रोजी बात पश्मिने की या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सचिन खेडेकर, किशोर कदम, आनंद इंगळे, पौर्णिमा मनोहर यांनी निवेदन, सूत्रसंचालन तसेच गुलजार यांच्या कथा व कवितांचे वाचन केले. हृषीकेश रानडे, विभावरी आपटे-जोशी, जितेंद्र अभ्यंकर आणि स्वरदा गोडबोले यांनी गुलजार यांची गीते सादर केली.

* **‘मॉडर्न’ ग्रंथालय आता ‘वायफाय’**

आधुनिक युगात ग्रंथालयांची संस्कृती मागे पडत चालली असताना महाविद्यालयांमध्ये मात्र तंत्रज्ञानाधिष्ठित ग्रंथालयांची संकल्पना पुढे येत आहे. तरुणांना तंत्रज्ञानाच्या जवळ नेण्यासाठी मॉडर्न महाविद्यालयात डिजिटल ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये इंटरनेटची ‘वायफाय’ सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

मॉडर्न महाविद्यालयात (गणेशखिंड) एक कोटी रुपये खर्चून तयार केलेल्या अद्ययावत ग्रंथालयाचे उद्घाटन नुकतेच झाले. इंटरनेटच्या माध्यमातून जगभरातील ‘ई-बुक’, ‘ऑडिओ बुक’, ‘जर्नल’, ‘प्रबंध’ व जगातील महत्त्वाची वृत्तपत्रे येथे उपलब्ध झाली आहेत. या ग्रंथालयात सध्या १५ संगणकांची व्यवस्था करण्यात आली आहे. दररोज दोनशे विद्यार्थी त्याचा लाभ घेत आहेत. बरेचसे विद्यार्थी स्वत:चे लॅपटॉप घेऊन ग्रंथालयात येतात. विद्यार्थ्यांना ही सेवा नि:शुल्क देण्यात येत आहे. त्यासोबत वाचन संस्कृती जोपासण्यासाठी विविध प्रकारची पुस्तके आणि काही दुर्मिळ पुस्तकेदेखील आहेत, अशी माहिती ग्रंथपाल संगीता ढमढेरे यांनी दिली.

ग्रंथालयात ‘यूजीसी इन्फोनेट’ व ‘डेलनेट’च्या साहाय्याने विद्यार्थ्यांना सुमारे ३६ लाख ‘ई-बुक्स’, ‘जर्नल्स’, ‘प्रबंध’ अभ्यासासाठी उपलब्ध झाले आहेत. त्यामध्ये भारतीय जर्नलसह अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ फिजिक्स, रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट, ऑक्सफर्ड स्कॉलरशिप ई-बुक यासारख्या नामांकित संस्थांच्या जर्नल्सचा समावेश आहे. तसेच यूजीसीच्या ‘व्यास उच्च शिक्षण’ या वाहिनीवरील शैक्षणिक




**हा शोध वेगळा** **२री आवृत्ती**

**अनु. भारती पांडे**

गुरू आणि ज्ञान याबाबत कबीरांच्या सुंदर दोह्यांचे कबीरांनी केलेले रसाळ विवेचन

**१४०रु. पोस्टेज २५रु.**

कार्यक्रमही पाहता येतील. विद्यार्थ्यांना प्रकल्प, प्रात्यक्षिक करण्यासाठी या गोष्टींचा उपयोग होईल.

*** अक्षरधारा बुक गॅलरीत धार्मिक पुस्तकांचे दालन**

अक्षरधारा बुक गॅलरीतील श्रावण मासानिमित्त धार्मिक पुस्तकाच्या स्वतंत्र दालनाचे उद्घाटन डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. या दालनामध्ये दहा ते ३० टक्केपर्यंत सवलत असून श्रीगणपत्यथर्वशीर्ष, श्रीमारुती स्तोत्र, अध्यात्म रामायण, सार्थ श्रीदासबोध, श्रीविष्णुपुराण, श्रीअग्निपुराण अशा अनेक ग्रंथांचा यात समावेश आहे.

*** संत साहित्यातील सुभाषिते**

सुभाषिते ही संस्कृत भाषेतीलच असतात, हा समज बरोबर नाही. रामभाऊ नगरकर यांनी अथक परिश्रम आणि अभ्यासातून संकलित केलेल्या 'संत सुभाषित कोशात संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास स्वामी आणि तुकाराम या पाच संतांच्या साहित्यातील ५१४७ सुभाषिते एकत्रित करण्यात आली आहेत. हा कोश पाचशे पानांचा असून तो मासिकाच्या आकारात आहे.

'अतिथी' या विषयावर संत ज्ञानेश्वर यांचे 'जैसे अपमानिता अतिथी ने सुकृतीची संपत्ती' हे तर संत एकनाथ यांचे 'अतिथी जाता परान्मुख त्या सवे जाय पुण्य निक्षेप' अशी सुभाषिते आहेत. तर 'आरोग्य' या विषयावर संत ज्ञानेश्वरांची ३७ सुभाषिते आहेत. याच विषयावर नामेदव-४, एकनाथ-८, रामदास स्वामी-१ आणि तुकाराम यांची ११ सुभाषिते या कोशात देण्यात आली आहेत.

संत साहित्याचे अभ्यासक आणि पुणे विद्यापीठाच्या ज्ञानेश्वर अध्यासनाचे डॉ. यशवंत पाठक यांच्या हस्ते या कोशाचे प्रकाशन झाले.

''जे प्रबोधन करतात त्यांना 'आचार्य' म्हणतात आणि कोणत्याही लाभाची अपेक्षा न करता जे प्रेम करतात त्यांना 'संत' म्हणतात. सर्व संतसाहित्य वाचून त्याचे सार सांगण्याचे अत्यंत अवघड काम रामभाऊ नगरकरांनी केले, त्यासाठी आपण सर्वांनी त्यांचे आभारी असले पाहिजे.'' असे मत आचार्य किशोरजी व्यास यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले.

नगरकर यांनी सांगितले की, या कोशात सुभाषित म्हणजे काय, ते ठरविण्याचे निकष कोणते, सुभाषिते मराठीत असू शकतात का, म्हणी आणि सुभाषिते यातील फरक, संस्कृत सुभाषिते असलेले विविध ग्रंथांचा धावता आढावाही घेतला आहे. सुभाषिते ही फक्त संस्कृत भाषेतच असतात. हा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. सुभाषितांची निवड करताना या कोशात त्याचे विषयावर वर्गीकरण करण्यात आले असून ११५ विषय घेण्यात आले आहेत. अतिथी, अभ्यास, आकाश,

आरोग्य, आरसा, गंध, गुरू, ग्रंथ, भक्ती, भीती, मद्य, मासा, मुक्ती, मोक्ष आणि अनेक विषयांवरील मराठी सुभाषिते या कोशात आहेत.

*** डॉ. रघुनाथ माशेलकर राष्ट्रीय संशोधन प्राध्यापक**

वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधनाच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना राष्ट्रीय संशोधन प्राध्यापकपद (नॅशनल रिसर्च प्रोफेसरशिप) देऊन केंद्र सरकारने त्यांचा विशेष सन्मान केला आहे.

वयाची ६५ वर्षे पूर्ण केलेल्या अभ्यासकांचा या सन्मानासाठी विचार केला जातो. १९४९ पासून हा उपक्रम राबविण्यात येत असून, सर सी.व्ही. रामन, सत्यजित रे, पंडित रविशंकर, उस्ताद बिसमिल्ला खान आदींना हा सन्मान मिळाला आहे.

डॉ. माशेलकर यांनी वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (सीएसआयआर) महासंचालकपद भूषविले असून, त्यांच्या काळात त्यांनी या संस्थेला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पेटंटबाबतच्या जागरूकतेसाठी त्यांनी मोहीम हाती घेतली होती. ते फेलो ऑफ रॉयल सोसायटी असून, याखेरीज त्यांना अनेक मानसन्मान मिळाले आहेत. राष्ट्रीय प्राध्यापक म्हणून ते पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेत (एनसीएल) एक सप्टेंबरपासून काम करणार आहेत.

*** आध्यात्मिक ग्रंथ तरुणांना उद्योगातही मार्गदर्शक**

'समर्थ रामदास स्वामींची शिकवण साडेतीनशे वर्षांनंतर तरुणांना आजही दिशादर्शक ठरणारी आहे. त्यातून उद्योजकांनी बोध घेतला पाहिजे,' असे मत मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अग्रीकल्चरचे संचालक श्रीनिवास रायरीकर यांनी व्यक्त केले.

औद्योगिक शिक्षण मंडळाने आयोजित केलेल्या 'पनासिया' या मनुष्यबळ विकास विषयक परिषदेत ते बोलत होते. परिषदेचे उद्‌घाटन औद्योगिक शिक्षण मंडळाच्या सचिव डॉ. आशा पाचपांडे यांच्या हस्ते करण्यात आले. रायरीकर यांनी 'दासबोध आणि व्यवस्थापन' विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'साडेतीनशे वर्षानंतरही




**ओमेर्ता** **२री आवृत्ती**

**अनु. अनिल काळे**

खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य असणारे गॉडफादरचे लेखक मारिओ पुझो यांची माफिया विश्वावरील थरारक कादंबरी

**२५०रु. पोस्टेज २५रु.**

समर्थ रामदास स्वामी यांची शिकवण आपल्याला दिशादर्शक ठरत आहे. करिअरसाठी मॅनेजमेंट, इंजिनीअरिंग हे क्षेत्र स्वीकारले तरीही या ग्रंथांकडे आध्यात्मिक ग्रंथ आहे. उतारवयात वाचू म्हणून दुर्लक्ष करून चालणार नाही. त्यातून विद्यार्थ्यांनी बोध घेतला पाहिजे.'

केहिन फाय प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे अध्यक्ष सुधीर गोगटे, होंडा कार कंपनीतील व्यावसायिक प्रबंधक अनिकेत डांबरे यांनी 'जगातील कंपन्यांमधील विविध समस्यांवरील तोडगे' या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात डायनॅमिक लॉजिस्टिकचे सहसंस्थापक प्रफुल्ल तालेरा यांनी 'चॉक पॉइंट ऑफ द वर्ल्ड' हा सिद्धांत आणि 'जागतिक अर्थव्यवस्थेवर नियंत्रण' या विषयावर मार्गदर्शन केले.

*** लिनक्सची विशी!**

ओपनसोर्स ऑपरेटिंग सिस्टिम लिनक्सने वाटचाल २० वर्षांची पूर्ण केली. या ऑपरेटिंग सिस्टिमचा आरंभ २५ ऑगस्ट १९९१ मध्ये हेलेसिंकी विद्यापीठात झाला. लिनस टोरवल्ड्स या विद्यार्थ्याने मिनिक्सवर आधारित एक नवी ऑपरेटिंग सिस्टिम बनवली.

टोरवल्ड्सच्या कॉलेजमध्ये सर्वत्र मिनिक्स ऑपरेटिंग सिस्टिम वापरण्यात येत होती. यामध्ये तुम्हाला कोणकोणत्या सुधारणा अपेक्षित आहेत असा प्रश्न टोरवल्ड्सने कॉलेजच्या वेबसाइटवर टाकला. मिळालेल्या प्रतिसादातून त्याने मिनिक्सवर आधारीत स्वत:ची एक नवी सिस्टिम तयार केली. तिला लिनक्स असे नाव मिळाले. ओपनसोर्समधील ही सर्वात यशस्वी ऑपरेटिंग सिस्टिम ठरली. हिची सुरुवात १९७१ मध्ये युनिक्सपासून झाली. युनिक्सचे रूपांतर मिनिक्समध्ये झाले. मिनिक्सचे पुढे लिनक्स झाले.

ओपनसोर्स ऑपरेटिंग सिस्टिम ही कंपन्यांच्या अंतर्गत व्यवहारासाठी वापरण्यात येते. या ऑपरेटिंग सिस्टिमच्या सेटिंगमध्ये आपण आपल्या सोयीने कोणतेही बदल करू शकतो, असे बदल विंडोज किंवा इतर ऑपरेटिंग सिस्टिममध्ये करता येत नाहीत. लिनक्स हे नाव अपघाताने पडले. सुरुवातीला याचे नाव 'फ्रेक्स' असे ठेवण्यात आले होते. मात्र, एफटीपी सर्व्हरचे काम करणाऱ्या टोरवल्ड्सच्या मित्राने सर्व्हरवर 'लिनक्स' असे नाव अपलोड केले.

*** जग 'शिका' पुस्तकाशिवाय...**

पुस्तकी शिक्षणांबरोबर व्यावहारिक शिक्षण दिले तर विद्यार्थ्यांचा अधिक विकास होऊ शकेल.. या विचाराने 'लोकसेवा करिअर अकादमी' तर्फे 'बिनभिंतीच्या शाळे'ची स्थापना करण्यात आली आहे. या शाळेच्या अभ्यासक्रमाची आखणी ही सामान्य ज्ञानावर अर्थात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर केली आहे.

डॉ. अ. ल. देशमुख यांनी know your city या संकल्पनेतून 'पुस्तकाशिवाय जगाची ओळख' या शाळेची स्थापना केली. यामध्ये मुलांना आपल्या शहराची, साहित्य-संस्कृतीची माहिती प्रत्यक्ष त्या-त्या ठिकाणांना भेटी द्वारे होते. या शाळेच्या पहिल्या धड्यामधून महात्मा फुले मंडईची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. यानंतर ससून हॉस्पिटल, पोलीस कमिशनर ऑफिस, महानगरपालिका, साहित्यिक व कलावंतांना भेट, बिल्डिंग कन्स्ट्रक्शन, लोहियानगर झोपडपट्टी, एनडीए, सिटी पोस्ट, रेल्वे स्टेशन यांची माहिती देण्यात येणार आहे.

*** जगातील सर्वांत लांब 'परिदर्शक'**

कल्पक्कम येथील इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्रातील (आयजीसीएआर) रिॲक्टरसाठी कोइमतूरमधील व्हिज्युअल एज्युकेशन एड्स (व्हीईए) आयजीसीएआर आणि अन्य संस्थांसह ३.९ कोटी रुपये खर्चून दहा मीटर लांबीच्या परिदर्शकाची निर्मिती केली आहे.

मेन्टेनन्सच्या वेळी अणुऊर्जा निर्मिती प्रकल्पातील फास्ट ब्रीडर रिॲक्टरच्या अंतर्गत भागातील घटक पाहण्यासाठी या परिदर्शकाचा उपयोग होणार असून हा जगातील सर्वांत लांब परिदर्शक आहे. त्याचे दुरूनही नियंत्रण करता येऊ शकते. तसचे आवश्यक त्या भागाचे स्कॅनिंग करण्यासाठी, इमेज झूम करण्यासाठी फिरवण्यासाठी त्याला यांत्रिक सुविधा आहेत.

*** 'ॲपल'चे सहसंस्थापक जॉब्स यांचा राजीनामा**

आयपॉड, ऑयपॅड आणि आयफोनसह अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या निर्मितीत कायमच अग्रेसर असलेल्या ॲपल टेक्नॉलॉजी कंपनीचे सीईओ स्टीव्ह जॉब्स यांनी राजीनामा दिला. जॉब्स यांच्या राजीनाम्यामुळे कंपनीच्या शेअर्सचा भाव पाच टक्क्यांनी घसरला.

स्वादुपिंडाचा कॅन्सर या दुर्धर आजाराचा यशस्वी मुकाबला करणारे जॉब्स कंपनीचे सहसंस्थापक असून १९७६ मध्ये त्यांनी स्टीव्ह वोझनियाक यांच्यासह 'ॲपल'ची स्थापना केली.

*** मी प्रेमिका - अल्बम**

सॉफ्टवेअर क्षेत्रात करिअर करताना इचलकरंजी ते कॅलिफोर्निया असा पल्ला गाठणाऱ्या अभिजित कुंभारने स्वरचित गीतांचा एक म्युझिक अल्बम आयटी क्षेत्रातली टिपिकल ऑफशोअर ऑपरेशन्सची कल्पना वापरून तयार केला.

'मी प्रेमिका' या अभिजितच्या म्युझिक अल्बममध्ये 'प्रेम', 'जी मिळे ती नजर...', 'चहू ओर पाहता...', 'नवा नवा श्वास हा...' अशी एकूण आठ गाणी आहेत. संगीतकार अभिजित, संगीत संयोजक मिलिंद गुणे आणि गायिका कस्तुरी

पायगुडे-राणे हे तीन मुख्य आधारस्तंभ. अभिजितने गीते रचली, त्यांना चाली लावल्या आणि ती कस्तुरी यांच्याकडे पाठवली. त्यानंतर मिलिंद गुणेंनी त्यावर काम केले. गीत-संगीतकार कॅलिफोर्नियात आणि संगीत संयोजक व गायिका पुण्यात असे ऑफशोअर ऑपरेशन स्वरूप होते.

संगीताचे शिक्षण घेता आले नसले तरी अभिजितवर हृदयनाथ मंगेशकर, सुधीर फडके, आर. डी. बर्मन आणि एस. डी. बर्मन यांचा प्रभाव आहे. जगभरातल्या मराठी कलावंतांना विश्वासाने एकत्र येण्यासाठी एखादे व्यासपीठ नसल्याबद्दल त्याला खंत वाटते.

परदेशात स्थायिक असल्यामुळे तिकडच्या मराठी रसिकांपर्यंत हा अल्बम बऱ्याच प्रमाणात पोचला आहे. भारतातून विदेशात गेल्यानंतर मातृभूमी, मातृभाषेचे महत्त्व लक्षात आले. करिअरसाठी परदेशात राहूनही आपली सांस्कृतिक मूल्ये व कलेची आवड जोपासणाऱ्या गुणवतांची संख्याही कमी नाही. या आवडीपोटी असे धाडस हे कलावंत करू धजतात, असे अभिजितला वाटते.

*** 'बुक ट्रॅक गॅझेट'द्वारे चित्रपटाचा अनुभव**

मजकुराबरहुकूम पार्श्वसंगीताचे वैशिष्ट्य असलेले व वाचताना थेट सिनेमाचा अनुभव देणारे 'बुक ट्रॅक' हे नवे संगीतमय मॉडेल न्यूयॉर्कमध्ये लाँच करण्यात आले. जेम्स फ्रे या 'पॉवर ऑफ सिक्स' या पुस्तकाद्वारे 'बुक ट्रॅक' ने ई - बुकचे नवे मॉडेल तयार केले आहे. लवकरच 'ॲडव्हेंचर ऑफ हकलबरी फिन', 'जेन आयर', 'रोमिओ ॲण्ड ज्युलियट', 'शेरलॉक होम्स', 'प्राईड ॲण्ड प्रेज्युडाईस' वगैरे अभिजात कलाकृती बुकट्रॅकद्वारे उपलब्ध होतील, असे न्यूझीलंडमधील कंपनीचे निर्माते मार्क आणि पॉल कॅमेरॉन यांनी सांगितले. गेल्या तीन वर्षांपासून कॅमेरॉन बंधू बुकट्रॅक निर्मितीच्या कामामध्ये गुंतले होते. पेपाल, फेसबुक आणि 'हायफर फॅक्टरी' या बड्या कंपन्यांच्या मदतीने त्यांनी ही कल्पना प्रत्यक्षात आणली.

ध्वनीशिवाय सिनेमा ही कल्पनाच आज करता येऊ शकणार नाही. वाचणाऱ्याला पूर्णपणे सिनेमाचा अनुभव देणारी, बदलत जणाऱ्या 'मूड्स'मधील संगीताचा अनुभव देणारी बुकट्रॅक ही कल्पना आहे.

ई-बुकनंतर वाचकांसाठी सर्वात मोठे मनोरंजनाचे असे हे साधन असेल. येत्या २० वर्षांमध्ये 'बुकट्रॅक' व्यतिरिक्त पुस्तक प्रकाशनविश्वाची कल्पनाही अशक्य असेल, असा दावा 'बुकट्रॅक'चे अध्यक्ष डेरेक हॅण्डली यांनी केला आहे. वर्ष अखेरीपर्यंत 'ॲपल' स्टोअर्समध्ये ते उपलब्ध होईल. तसेच आयपॅड, आयफोन धारकांना हाताळता येईल. कंपनीने हार्पर कॉलिन्स, सोनी एटीव्ही, न्यूझीलंड सिम्फनी, ऑर्केस्ट्रा, खासगी संगीतकार यांची फौज बुकट्रॅकसाठी उभी केली आहे. येणारा काळ

'बुकट्रॅक'चे भवितव्य ठरविणारा असेल. पारंपरिक पुस्तक वाचताना मजकुरातून वाचकाच्या मनात उभे राहणारे चित्र अथवा ध्वनी बुकट्रॅक निर्माण करू शकले तर वाचकांची कल्पनाशक्ती संकोच पावेल, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे.

*** 'नॅसडॅक'ची बेल**

कॅनडातील मॅनिटोबा विद्यापीठाने घेतलेल्या बिझनेस प्लॅन स्पर्धेत प्रथम आल्याने पुण्यातील प्रदीप अकनूर या तरुणाला २६ ऑगस्ट रोजी न्यूयॉर्क शेअर बाजाराची (नॅसडॅक) घंटा वाजविण्याचा मान मिळाला. यापूर्वी इन्फोसिसचे माजी अध्यक्ष नारायण मूर्ती आणि शाहरूख खान दोनच भारतीयांना हा मान मिळाला आहे.

मूळचा पुण्याचा असलेला प्रदीप सध्या बँकॉकमध्ये मॅनेजमेंटचे शिक्षण घेत आहे. प्रदीपच्या संघाने सादर केलेला बिझनेस प्लॅन या स्पर्धेत अव्वल ठरला. नॅसडॅकची घंटा वाजविण्याबरोबरच प्रदीपच्या संघाला वीस हजार कॅनेडियन डॉलर (रु. ९.२ लाख) मिळाले.

प्रदीपच्या संघाने यापूर्वीही एमएआय बँकॉक बिझनेस चॅलेंज ही स्पर्धा जिंकून ४.५ लाख रुपयांचे बक्षीस मिळवले होते.

प्रदीप, मयूर जोशी आणि कल्याणी दामले यांनी इंडिया फॉरेन्सिक कन्सल्टन्सी सर्व्हिसेस ही कंपनी २००५ मध्ये स्थापन केली. सत्यमच्या आर्थिक घोटाळ्यांच्या तपासणीत आंध्र प्रदेश पोलिसांनी या कंपनीला सल्लागार नेमले होते.

*** 'अँड्रॉइड' वर सर्वाधिक मालवेअर हल्ले**

जागतिक बाजारपेठेबरोबरच भारतीय बाजारपेतही अँड्रॉइड या मोबाइल ऑपरेटिंग सिस्टिमवर आधारित मोबाइल फोन्स मोठ्या प्रमाणात लाँच होत आहेत. अँड्रॉइड फोन वापरणाऱ्याचे प्रमाण अधिक असल्याने या ऑपरेटिंग सिस्टिमला पूरक ठरणारी ॲप्लिकेशन (ॲप्स) बाजारात मोफत उपलब्ध आहेत. व्हायरस ॲटॅक झाल्यास मोबाईल हँग होतो. अशा ॲटॅकपासून वाचण्यासाठी अँटी व्हायरस कंपन्यांची सॉफ्टवेअरही विकसित केली आहेत. मात्र, अशा सॉफ्टवेअरनाही हॅकर्स चकवितात, असे अमेरिकेतील मॅकफे सॉफ्टवेअर सिक्युरिटी सिस्टिम कंपनीने केलेल्या पाहणीत




निरामय यशासाठी ध्यान ३री आवृत्ती

शुभदा गोगटे

सध्याच्या स्पर्धात्मक, संघर्षमय वातावरणात मन शांत ठेवून यश मिळविण्याच्या ध्यानाच्या साध्या सोप्या पद्धतीचे विवेचन

८०रु. पोस्टेज २०रु.

पुढे आले आहे. अँड्रॉइड डिव्हाइसवर मालवेअर अ‍ॅटॅक होण्याच्या प्रमाणात ७६ टक्के वाढ झाली आहे.

*** अण्णा भाऊ साठे पुरस्कार**

साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रांतील अण्णा भाऊ साठे यांचे कार्य प्रेरणादायी असून, त्यांचे विचार येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहोचले पाहिजेत, असे मत विधानसभेचे विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य मातंग समाज संघटनेच्या वतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कारांचे वितरण खडसे यांच्या हस्ते करण्यात आले. सिंबायोसिस संस्थेचे अध्यक्ष शां. ब. मुजुमदार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते.

राज्यस्तरीय पुरस्कार 'स्टार माझा'चे संपादक राजीव खांडेकर आणि राहुरी कृषी विद्यापीठाचे कुलगुरू तुकाराम मोरे यांना देण्यात आला, तर जिल्हास्तरीय पुरस्कार 'लोकसत्ता'चे निवासी संपादक मुकुंद संगोराम, डी.सी.एम. सोसायटीचे अध्यक्ष एम. डी. शेवाळे, गजानन एकबोटे, दादासाहेब बेन्द्रे, ज्येष्ठ साहित्यिक उत्तम तुपे यांना देण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन माजी राज्यमंत्री दिलीप कांबळे यांनी केले.

खडसे म्हणाले, स्वातंत्र्यासंग्राम, संयुक्त महाराष्ट्र चळवळ या काळामध्ये समाजाला जागे करण्याचे आणि वातवरण ज्वलंत करण्याचे काम अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या लेखणीतून केले. लावणीला त्यांनी प्रतिष्ठेचे स्थान मिळवून दिले. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी आहे. माणूस हा पदाने किंवा पैशाने मोठा होत नसतो, तो त्याच्या जगण्याने मोठा होतो, हे अण्णा भाऊंच्या जीवनाकडे पाहिले असता जाणवते.

सुधीर गाडगीळ यांनी खांडेकर आणि मोरे यांची मुलाखत घेतली. खांडेकर म्हणाले की, वरुणराज भिडे, विजय कुवळेकर, अरुण टिळेकर आणि कुमार केतकर या संपादकांकडून मला बरेच शिकायला मिळाले. त्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला. मोठ्या जबाबदाऱ्या दिल्या आणि त्यातूनच मी घडत गेलो.

*** 'सायबर मॅन'**

जनलोकपालसाठी १२ दिवसांचे उपोषण करणारे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आपल्या उपोषणाच्या कालावधीत लोकप्रियतेचे विविध उच्चांक मोडले. या कालावधीत वृत्तवाहिन्यांवर सलग १२ दिवस टीआरपींची सर्वाधिक नोंद करण्यात आली. इंटरनेट जगतातही अण्णा हिट ठरले आहेत.

या १२ दिवसांच्या कालावधीत फेसबुकवर त्यांना तीन लाख ६४ हजार 'लाइक्स' मिळाले. 'सपोर्ट अण्णा हजारे फास्ट अगेन्स्ट करप्शन' या अकाऊंटवर एक लाख ४५ हजार 'लाइक्स' मिळाले. अण्णांच्या विरोधात तयार करण्यात

आलेल्या 'आय हेट अण्णा हजारे' या फेसबुक पेजवर ४१३७ जणांनी 'लाइक' केले. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी किरण बेदी यांनी तिहार तुरुंगात तयार चित्रित केलेल्या अण्णांच्या व्हिडीओला युट्युबवर एक लाख ६० हजार 'व्ह्यूज' मिळाले. युट्युबवर अपलोड करण्यात आलेला अण्णांच्या भाषणाचा आणखी एक व्हिडीओ चौथ्या क्रमांकावर आला आहे.

इंटरनेटबरोबरच एसएमएसमध्येही अण्णा आघाडीवर राहिले. '१६० बाय २ कॉम' या फ्री एसएमएस सेवा पुरविणाऱ्या कंपनीच्या साइटवरून रोज पाठवण्यात येणाऱ्या पन्नास लाख एसएमएसपैकी १० लाखांमध्ये 'अण्णा हजारे' किंवा 'करप्शन' शब्द होता. 'वे २ एसएमएस' या फ्री वेबसाइटच्या माहितीनुसार पाच दिवसांमध्ये तेरा लाख एसएमएसमध्ये 'अण्णा हजारे' हा शब्द होता.

*** 'हॉबिट' मराठीत**

'द लॉर्ड ऑफ द रिंग्ज'चे लेखक जे. आर. आर. टॉल्किन यांनी लिहिलेली 'द हॉबिट' ही फॅण्टसी आता मराठीत आली आहे.

फॅण्टसी १९२७ मध्ये प्रथम प्रकाशित झाली आणि पुढे तिने खपाचे उच्चांक निर्माण केले. १९७३ मध्ये टॉल्किन यांचे निधन झाले. पण ते 'द लॉर्ड ऑफ द रिंग्ज' व 'द हॉबिट' द्वारे जिवंतच राहिले. टॉल्किन हे ब्रिटिश सैन्यात सैनिक होते. जवळच्या मित्रांचे मृत्यू पाहून त्यांचे मन द्रवले. अखेर लष्करातून बाहेर पडून ते प्राध्यापक झाले. बंदुकीऐवजी लेखणी हाती घेतली. 'द लॉर्ड ऑफ द रिंग्ज' यावर चित्रपट निघाले. हॉबिटमध्ये रिंग्जच्या पूर्वीचा काळ आहे. आता न्यूझीलंडचे ख्यातनाम दिग्दर्शक पीटर जॅक्सन त्यावर चित्रपटही काढत आहेत.

मीना किणीकर यांनी मराठी भाषांतर केले असून जगप्रसिद्ध ॲलन ली यांची चित्रेही आहेत.

'हॅरी पॉटर', 'क्रॉनिकल्स ऑफ नार्निया' या फॅण्टसी कादंबऱ्या अलीकडे बऱ्याच गाजल्या.

३ जानेवारी १८८२ ला जन्मलेले टॉल्किन पहिल्या महायुद्धातील सैनिक



६ वी आवृत्ती
**अज्ञाताचे विज्ञान**
डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी
'गूढ' ठरलेल्या विषयावरील शास्त्रोक्त मनोरंजक लेख
१५०रु. पोस्टेज २५रु.

होतेच. पण त्यानंतर ते जगातील सर्वोत्तम भाषातज्ज्ञ म्हणून प्रसिद्धी पावले. द सिलम रिलिऑन्, द टू टॉवर्स, या त्यांच्या कादंबऱ्या गाजल्या. द हिस्ट्री ऑफ मिडल अर्थ चे १२ भाग निघाले.

*** रा. ना. चव्हाण यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन**

''महाराष्ट्रात आजपर्यंत झालेल्या प्रबोधनाचा आयाम स्पष्ट करणारे लिखाण अजूनही झालेले नाही,'' अशी खंत राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. यशवंत सुमंत यांनी व्यक्त केली.

दिवंगत विचारवंत रा. ना. चव्हाण यांच्या 'गौतम बुद्ध व त्याचे बौद्धदर्शन' आणि 'महाराष्ट्राचे उपेक्षित मानकारी राजारामशास्त्री भागवत' या पुस्तकांचे प्रकाशन डॉ. रावसाहेब कसबे व डॉ. सुमंत यांच्या हस्ते झाले.

डॉ. बाबा आढाव, संतसाहित्याचे अभ्यासक सदानंद मोरे, डॉ. अशोक चौसाळकर, प्रकाशक रमेश चव्हाण, संभाजीराव पाटणे उपस्थित होते.

डॉ. सुमंत म्हणाले, ''महाराष्ट्रातील अभ्यासक उपेक्षितांवर लेखन करतात हे आशादायक चित्र आहे. राजारामशास्त्री भगवतांचे वाङ्मय वाचताना समाजाच्या सर्वस्पर्शतेचा अनुभव येतो. त्यांचा कल सत्यशोधक समाजाकडे होता.''

मोरे म्हणाले, ''धार्मिक परिवर्तने योग्य दिशेने होण्याची गरज आहे. तसे झाले नाही तर इतर परिवर्तन पेलण्याची ताकद समाजात येत नाही. महाराष्ट्राचा इतिहास उज्ज्वल व संपन्न आहे; परंतु तो त्या पद्धतीने मांडला जात नाही.''

''धार्मिक व सामाजिक क्रांतीच्या पायावरच राजकीय क्रांती उभी करावी लागते. हा प्रबोधन चळवळीचा सर्वांत महत्त्वाचा भाग आहे,'' असे डॉ. कसबे यांनी सांगितले.

*** ब्रिटनमधील पुस्तकाची २००० दुकाने बंद**

माऊसच्या एका क्लिकवर जगभरातील साहित्य इंटरनेटवर उपलब्ध होऊ लागल्याने युवा पिढी ज्ञानात भर टाकणारी मुद्रित पुस्तके संग्रही ठेवण्यात रस दाखवीत नाही. याचा परिणाम पुस्तकांच्या खपावरही होत असून, गेल्या सहा वर्षांत ब्रिटनमधील पुस्तकांच्या दुकानांची संख्या तब्बल निम्म्यावर आली आहे.

इंटरनेट आणि 'ई-रीडिंग'ची वाढती लोकप्रियता यासाठी जबाबदार असल्याचे 'एक्स्पेरियन' या डाटा कंपनीने केलेल्या सर्वेक्षणात दिसून आले. २००५ मध्ये ब्रिटनमध्ये पुस्तकांची चार हजार दुकाने होती. आता २ हजार १७८ वर उरली आहे. देशातील ५८० छोट्या शहरांमध्ये पुस्तकाचे दुकान उरलेले नाही.

'दि डेली टेलिग्राफ'च्या वृत्तानुसार या भयानक परिस्थितीच्या विरोधात मोहीम राबविणाऱ्या लोकांनी यामुळे दुकानांसह वाचनालयेही बंद पडण्याचा इशारा दिला आहे.

*** 'ई-पासपोर्ट'**

अतिरेकी कारवाया, तसेच डुप्लिकेट पासपोर्टला आळा घालण्यासाठी 'ई-पासपोर्ट'चा पर्याय पुढे आला आहे. नाशिकरोडच्या इंडिया सिक्युरिटी प्रेस मध्ये 'ई-पासपोर्ट'साठी लागणारी अत्याधुनिक यंत्रणा तयार करण्यात आली आहे. काही महिन्यांतच 'ई-पासपोर्ट'चे उत्पादन सुरू होईल.

पासपोर्टचा दुरुपयोग तसेच दहशतवादी घटना टाळण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाने पासपोर्टच्या रचनेतच बदल करण्याचा निर्णय घेतला आणि त्यानुसार अत्याधुनिक अशा 'ई-पासपोर्ट'ची संकल्पना स्वीकारली. 'ई-पासपोर्ट'मध्ये मायक्रोचिप बसविण्यात येणार आहे. विमानतळावर असलेल्या विशेष मशीनद्वारे मायक्रोचिपमधील माहिती कम्प्युटरवर दिसणार आहे. त्यामुळे पासपोर्टधारक व्यक्तीने आजवर कुठे-कुठे प्रवास केला आहे, याची माहिती क्षणार्धात मिळू शकेल. या पासपोर्टला बारीक अॅन्टेनाही असेल. जुन्या पासपोर्टधारकांना नव्या स्वरूपाचे 'ई-पासपोर्ट' देण्यात येणार आहेत.

नाशिकरोडच्या प्रेसमध्ये वर्षाला ८२ लाख पासपोर्ट तयार होतात. 'ई-पासपोर्ट'च्या यंत्रणेमुळे ही संख्या वर्षाला एक कोटींपेक्षा अधिक होणार आहे.

*** इ-मेलचा वाढता उपयोग**

ई-मेल, इंटरनेट, गुगलाच्या जमान्यात आता पत्र, पोस्टबॉक्स यांचे महत्त्व कमी होत चालले आहे. नव्या पिढीबरोबर जुनी पिढीदेखील ई-मेलिंगमध्ये अपडेट होऊ लागल्याने पोस्टाने पत्र पाठविण्याचे प्रमाण कमी झाले आहे. रेडिफमेल, जी. मेल, हॉट मेल या साईटवर ई-मेलचे खाते उघडून जगातल्या कुठल्याही व्यक्तींची माहिती, पत्राची, कागदपत्रांची देवाणघेवाण करता येते त्यामुळे पोस्टाचा वापर करणे कमी होऊ लागले आहे.

आई बाबा आणि आजी आजोबाही आता ई-मेल करण्याचे तंत्र शिकून घेत आहेत. पोस्टाने पत्र पाठविण्यास लागणाऱ्या वेळेच्या तुलनेत ई-मेलची गती अचाट आहे.

शिवाय आता पुस्तकेही ई-बुक तसेच स्कॅन कॉपीमध्ये मेलला अटॅच करण्याची





**वुइ दि नेशन** ४थी आवृत्ती

अनु. वि. स. वाळिंबे

भारताच्या आर्थिक, राजकिय, सांस्कृतिक, सामाजिक समस्यांवरील अभ्यासपूर्ण विवेचन

२८०रु. पोस्टेज ३०रु.

सुविधा असल्याने बुक पाठवा वापरही कमी झाला आहे.

खासगी कम्प्युटरच्या जोडीला स्कॅनर, प्रिंटरही घेऊन कागदपत्रे, फोटो, माहिती पाठविणे सोपे झाले आहे.

*** 'अग्गोबाई'चे प्रकाशन**

'करून करून काळजी माझी करून माझे लाड, दमलात तुम्ही आई-बाबा झोपा आता गाढ' हे गीत सादर करून 'शुभंकर'च्या गायन कारकिर्दीचा 'श्रीगणेशा' झाला. 'अग्गोबाई ढग्गोबाई भाग-२' हा अल्बम रसिकांसाठी खुला झाला.

डॉ. सलील कुलकर्णी, अंजली कुलकर्णी आणि संदीप खरे यांनी 'अग्गोबाई'च्या दोन्ही भागांतील गीते म्हटली. विभावरी देशपांडे आणि सुनील अभ्यंकर यांनी खुसखुशीत शैलीत निवेदन केले. प्रज्ञा अगस्ती यांच्या मार्गदर्शनाखाली छोट्या मुलींनी काही गीतांवर साकारलेली नृत्ये सादर केली.

'फाउंटन म्युझिक'तर्फे 'अग्गोबाई ढग्गोबाई'च्या दुसऱ्या भागाचे प्रकाशन स्नेहल भावे, अशोक कुलकर्णी, नीता सावळे, कमला सत्यनारायण, संध्या हिंगे यांच्या हस्ते झाले.

'अग्गोबाई', 'कोण कोण आले', 'दूरदेशी गेला बाबा गेली कामावर आई', 'इवली इवली पाठ आणि लटलटणारे पाय, एवढ्या मोठ्या दारातून नेलेस तरी काय', 'मी पप्पाचा आहे श्याम मित्र माझा राम' ही गीते सादर झाली.

*** 'एनजीओ' पुस्तकाचे प्रकाशन**

''अराजकीय स्वयंसेवी संस्थांच्या (एनजीओ) कार्याचे योग्य मूल्यमापन झाले पाहिजे'', असे मत राज्यशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सुहास पळशीकर यांनी व्यक्त केले.

कोल्हापूर येथील श्रमिक प्रतिष्ठान, पुणे विद्यापीठ समाजशास्त्र विभाग आणि आंतरप्रणाली विभाग यांच्यातर्फे राज्यशास्त्राचे प्राध्यापक विलास रणसुभेलिखित 'एनजीओ' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार अनंत दीक्षित यांच्या हस्ते झाले. गोविंद पानसरे, प्रा. अजित अभ्यंकर, प्रा. राजा दीक्षित या वेळी उपस्थित होते.

पळशीकर म्हणाले, ''स्वयंसेवी संस्थांकडे विविध अंगांनी पाहिले पाहिजे. काही संस्था पुरोगामी असतात, तर काही केवळ सामाजिक कार्य करणाऱ्या असतात. सर्वच संस्था अराजकीय स्वरूपाच्या असल्या तरी, त्या सरकारप्रमाणे व्यापक प्रमाणावर काम करू शकत नाहीत. त्यामुळे अशा संस्थांच्या कार्याला मर्यादा पडू शकतात.''

अभ्यंकर म्हणाले, ''लोकांचे प्रश्न सोडविण्यामध्ये राजकीय पक्षांकडून निर्माण झालेली पोकळी 'एनजीओ'ने भरून काढली आहे. जागतिकीकरणामध्ये 'एनजीओ'च्या संख्येत जशी वाढ झाली तसे त्यांचे कार्यदेखील वाढले आहे. सरकारविरोधात

सामान्य माणसांचा राग असल्यामुळे अण्णा हजारे यांच्या चळवळीत 'एनजीओ'ला पाठिंबा मिळाला. अनेकदा अशा संस्था पुरोगामी चळवळीला धोकादायक ठरू शकतात. कित्येकदा अशा संस्था अनुदान मिळेपर्यंतच काम करतात.''

रणसुभे म्हणाले, ''भांडवलशाही प्रतिगामी लोकांबरोबरच अराजकीय स्वयंसेवी संस्थांना राजकीय पक्षांशीदेखील संघर्ष करावा लागत आहे.''

*** मोबाइलवर फेसबुकचे बटन**

बहुतांश कंपन्यांनी आता फेसबुक ट्विटर अशा कंपन्यांशी टायअप करण्यास सुरुवात केली आहे. वोडाफोन एस्सार कंपनीने भारतात नवा फेसबुक मोबाइल लॉन्च केला आहे. या फोन्समध्ये फेसबुकचे एक बटन दिलेले असते. त्यावर क्लिक केले की, तुमचे फेसबुक लॉगइन सुरू होते. मोबाइलमध्ये फेसबुकचे मोबाइल व्हर्जन डाऊनलोड करावे लागत नाही. सोशल मीडियातील उत्पादनांची संकल्पना विकसित होऊ लागली आहे. फेसबुकचे मोबाइल बिजनेस प्रमुख, हेन्री मोइस्सिनॅक म्हणाले की, आम्हाला प्रत्येक फोनमध्ये फेसबुक पोहचवायचा आहे. यामुळे आम्ही मोबाइल सेवा पुरविणाऱ्या विविध कंपन्यांशी टायअप करीत आहोत. या सुविधेमुळे आता भारतात फेसबुकचा वापर विनाशुल्क करता येणार आहे. तर मोबाइल कंपन्या या माध्यमातून तरुणांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत.

*** फळे, फुलांतून साकारले चेहरे**

पालेभाज्या आणि फळांपासून चविष्ट पदार्थ करण्याऐवजी कोणी जर अप्रतिम चित्र रेखाटले तर...? निश्चितच अत्यंत सुंदर रेखाचित्र तयार होईल. याची प्रचिती नुकतीच न्यूयॉर्कमध्ये पाहायला मिळाली. क्लॉस एनिक गर्डस् या छायाचित्रकाराने खऱ्या भाज्या, फळे आणि फुलापासून मानवी चेहरे तयार केले. हे चेहरे तयार झाल्यावर त्याचे फोटो काढून त्याचे प्रदर्शन भरवले. खरी फळे वापरली असल्याने चेहऱ्याचे प्रदर्शन अप्रतिम दिसते. फार पूर्वी आर्सिबोल्डो या इटालियन कलाकाराने अशा प्रकारची चित्रे रेखाटली होती. त्याने काल्पनिक फळा-फुलांच्या विविध आकारांच्या कलाकृती साकारल्या होत्या. या संकल्पनेवरून गर्डस्‌ला ही कल्पना सुचली.

*** गानसरस्वतीचा प्रवास**

गानसरस्वती किशोरी अमोणकर यांच्या सांगीतिक वाटचालीविषयी माहिती सांगणारा 'भिन्न षड्ज' हा लघुपट दाखवण्यात आला. एनएफएआयमध्ये मराठी आणि हिंदी भाषेतल्या या लघुपटाची निर्मिती अमोल पालेकर आणि संध्या गोखले यांनी केली आहे. किशोरी अमोणकरांच्या मुलाखती, गुरू आणि आई मोगुबाई कुर्डीकर यांच्या आठवणी, मैफलींमागची भूमिका, घराणे गायकीबद्दलचे विचार, भारतातील प्रसिद्ध कलाकारांनी किशोरीताईंबद्दल मांडलेले विचार अशा अनेक विषयांना

या लघुपटानं स्पर्श केला होता.

आपली मैफल कशी सुरू होते, या प्रश्नावर किशोरीताई म्हणाल्या, ''माझी मैफल सुरू होते, त्यावेळी मी कुणाशीच बोलत नाही. मैफलीत गाणाऱ्या रागाच्याच स्वरांभोवती राहण्याची माझी इच्छा असते. त्या रागाची प्रतिकृती आपल्या मनाला भिडावी असा माझा प्रयत्न असतो. तरीही मंचावर आल्यावर मी घाबरलेलीच असते. या सगळ्या प्रकारातून तो स्वरच मला माझ्यापासून दूर कुठेतरी नेत असतो. तिथेच मी माझी राहात नाही. त्यात हे स्वर रसिकांवर काय जादू करतात याचं कोडं आजही मला सुटलेलं नाही.''

*** संत सुभाषित कोशाचे प्रकाशन**

संत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम या पाच संतांच्या वाङ्मयातील पाच हजाराहून अधिक सुभाषितांचा संग्रह असलेल्या 'संत सुभाषित कोश', संपादक- रा. शं. नगरकर या कोशाचा प्रकाशन समारंभ दि. २८ ऑगस्ट रोजी स. प. महाविद्यालयाच्या देवी रमाबाई सभागृहातभारतीय संस्कृतीचे समर्थ भाष्यकार आचार्य किशोरजी व्यास यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. पुणे विद्यापीठातील संत ज्ञानदेव अध्यासनाचे प्रमुख आणि मराठीचे जाणकार अभ्यासक डॉ. यशवंत पाठक यांच्या



हस्ते कोशाचे प्रकाशन झाले. डायमंड पब्लिकेशन्सच्या श्री. दत्तात्रेय पाष्टे यानी हा कोश प्रकाशित केला आहे. स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप शेठ हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. दांडेकर अध्यासनाच्या समन्वयक डॉ. वैजयंती बेलसरे यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. यशवंत पाठक म्हणाले, ''विविध विषयांवरील संतांची अवतरणे ही माणसांच्या जगण्याची संजीवनी आहे. हा कोश घराघरांतून असायला हवा. त्यातून

पुढची पिढी संस्कारक्षम होणार आहे, हे सामर्थ्य या कोशात आहे !''

''प्रस्तुत सुभाषित ग्रंथाला रामभाऊ नगरकरांनी प्रदीर्घ आणि भारदस्त प्रस्तावना जोडली आहे, सुभाषित वाङ्मय आणि संत वाङ्मय यांची तुलनात्मक चर्चा अतिशय उद्‌बोधक आहे. असे डॉ. काळे यांनी सांगितले

डॉ. कानडे, डॉ. चुनेकर, डॉ.गो. बं. देगूलकर, डॉ. स. म. परळीकर, प्रा. रामदास डांगे, चंद्रकांत जोशी इ. जाणकारांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

*** अलिकडे - पलीकडे पुस्तकाचे प्रकाशन**

अपूर्व पब्लिकेशन्स, पुणे यांनी छापलेल्या व श्री. मोहन काळीकर यांनी लिहिलेल्या 'अलिकडे - पलीकडे' या प्रवासवर्णनपर पुस्तकाचा प्रकाशन समारंभात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. श्यामकांत कुलकर्णी म्हणाले, हे पुस्तक नुसते स्थळांचे भौगोलिक वर्णन सांगत नाही. तर त्या प्रदेशांतील लोकांचे भावविश्व समोर उभे करते.''

*** कवी अनंत फंदी साहित्य पुरस्कार**

संगमनेर येथील इतिहास संशोधन मंडळाच्या वतीने कवी अनंत फंदी साहित्य पुरस्कार प्रदान केले जातात. कादंबरी, कथासंग्रह, कविता संग्रह चरित्र. आत्मचरित्र, बालसाहित्य, समीक्षा माहितीपर साहित्य व इतर सर्व प्रकारच्या साहित्यकृतीस प्रत्येकी १९९९ रुपये रोख, स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येते. सन २००९ ते ऑक्टोबर २०११ दरम्यान प्रकाशित झालेली पुस्तके पुढील वर्षीच्या पुरस्कारासाठी पाठवावीत असे निवेदन संगमनेर इतिहास संशोधन मंडळाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

श्री. संतोष खेडलेकर (कार्याध्यक्ष - संगमनेर इतिहास संशोधन मंडळ) संवाद, गणेशनगर,कॉलनी नं. १४,संगमनेर, फोन९८२२०९७८०९

*** सर्वांत लहान पुस्तकांचे ग्रंथालय**

विविध पुस्तकांचे संग्रह करणारे वाचक असतात; परंतु सगळ्यात आकाराने लहान पुस्तकांचा, कादंबऱ्यांचा संग्रह करणारे एक गृहस्थ हंगेरीत आहेत. जोसेफ तारी यांनी २.९x३.२ मिलिमीटर या आकाराचे जगातील सर्वांत लहान पुस्तकांचे ग्रंथालय घरात केले आहे. १९७२ पासून त्यांनी या पुस्तकांचा संग्रह करण्यास सुरवात केली. या ग्रंथालयातील पुस्तके हंगेरीव्यतिरिक्त अमेरिका, मेक्सिको, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, जपान या देशांमधून संग्रहित केली आहेत. खेळापासून साहित्य, पाककृती या अशा सर्व विषयांमधील पुस्तके त्यांच्या संग्रहात आहेत. किमान ७६ मिलिमीटर आकाराची किंवा त्यापेक्षा लहान पुस्तके ते जमा करतात. शंभर वर्षांपासूनची चार हजार पाचशेहून अधिक पुस्तके जमवली आहेत.१५

वेगवेगळी १९ x २६ मिलिमीटर इतक्या छोट्या आकाराची वर्तमानपत्रेदेखील या ग्रंथालयात आहेत.

*** फोटोग्राफीच्या क्षेत्रात 'तलाक'ग्रस्त युवती**

बुरख्याआड अपेक्षाभंग, अवहेलना आणि अत्याचार सहन करीत अंधकारमय जीवन जगणाऱ्या, मुंबईतील 'तलाक'ग्रस्त मुन्नी, फरिदा, फातिमा वगैरे मुस्लीम युवती 'कॅमेरावूमन' म्हणून जिद्दीने प्रयत्न करत आहेत. 'तलाक' झालेल्या मुस्लिम युवतींसाठी रोजच्या आयुष्यातला संघर्ष सोपा नसतो. समाजातून होणारा प्रश्नांचा भडिमार अन् अंधकारमय भविष्यकाळ. पदरी मूल असेल तर हा संघर्ष अजूनच बिकट... शिक्षण नसेल तर कमाईचे साधनही सहजसोपे राहत नाही. पुनर्विवाहाची शक्यताही दुरापास्त. अशा पीडित मुस्लिम महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या 'आवाज-ए-निस्वान' या संस्थेने मुंबईमधील १६ युवतींना 'नॅशनल फोटोग्राफी प्रमोशन ट्रस्ट' च्या मदतीने फोटोग्राफीचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण द्यायचे ठरवले. बुरखा घालून 'फोटोशूट' करणाऱ्या 'तलाकपीडित' मुलींना पाठिंबा देणे, हे अनेकांना मान्य नव्हते. घरातूनही विरोध होता. कुरेशी सांगते, ''फोटो काढायचे, ते प्रसिद्ध होण्यासाठी प्रयत्न करायचे, एजन्सी गाठायची, भेटीगाठी घ्यायच्या हे अवजड शिवधनुष्य आम्ही पेलतोय...'' मुंबापुरीतल्या आयुष्याच्या अनंत छटा कॅमेराबद्ध करणाऱ्या तरुणी आता तिसऱ्या आता तिसऱ्या डोळ्याच्या साह्याने देशाच्या कानाकोपऱ्यात निर्धास्तपणे जातात. जत्रा, प्रदर्शने, प्रकल्पग्रस्त गावांमधल्या समस्या, वारकऱ्यांची वारी; यांचे चित्रण करतात.

प्रशिक्षणानंतर या युवतींना मॉडेलिंग, फोटोग्राफी, ग्लमर्सच्या दुनियेत संधी मिळावी, यासाठीही 'आवाज-ए-निस्वान' प्रयत्न करत आहे. याच प्रयत्नांचे फलित म्हणजे या सोळाही जर्णीनी काढलेल्या अनोख्या छायाचित्रांच्या कॅलेंडरला दणदणीत प्रतिसाद मिळाला. त्यांचे प्रदर्शनही नुकतेच भरवण्यात आले.

*** सिंगापूर कलासंग्रहालय स्पर्धा**

सिंगापूर कलासंग्रहालयाकडून ४५ हजार अमेरिकन डॉलरच्या कलापुरस्कारासाठी पाच भारतीय कलावंतांना उपान्त्य फेरीत नामांकन लाभले. यात अतुल भल्ला, प्रभावती मेपायिल, शिल्पकार रवी शहा, शिबा छाच्छी आणि श्रेयस कार्ले यांचा समावेश आहे.

आशिया प्रशांत क्षेत्रातील २४ देशांतील १३० चित्रे, छायाचित्रे व शिल्पांची त्रैवार्षिक 'सिग्नेचर आर्ट प्राइज'च्या उपान्त्य फेरीसाठी निवड झाली असून त्यात या पाच कलावंतांचा समावेश आहे. आणि व्हिएतनाम या देशांतूनही कलाकृती दाखल झाल्या आहेत. या १३० कलाकृतींतून एक ऑक्टोबरला अंतिम फेरी आणि १८

नोव्हेंबर विजेत्यांची घोषणा होणार आहे. दिल्लीला राहाणारे ४७ वर्षांचे अतुल यांनी यमुनेकाठची वाळू, सिरॅमिक टाइल्स तसेच लाकूड आदींचा वापर करून पाणी, नागरी पर्यावरण आणि लोकसंख्या यांचा वेध घेणारी 'छबील' ही कलाकृती साकारली आहे. बंगळुरूचे रवी शहा हे काष्ठशिल्पकार म्हणून प्रसिद्ध आहेत. चंपक वृक्षाच्या लाकडापासून बनविलेले 'मीट ॲट लास्ट/द हग' हे त्यांचे काष्ठशिल्प या स्पर्धेत आहे. श्रेयस कार्ले यांचे 'चिडिया उड' हे कॅनव्हासवरील कोलाज स्पर्धेत आहे.

* **पुलंचे संकेतस्थळ**

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व असलेले पु. ल. देशपांडे यांच्या कलाकृतींबरोबरच त्यांचा जीवनपट उलगडणाऱ्या संकेतस्थळाचे उद्घाटन शिवसेनेचे कार्याध्यक्ष उध्दव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. 'प्रबोधन गोरेगाव'च्या वतीने तयार करण्यात आलेल्या या संकेतस्थळावर पुलंविषयी जे काही उपलब्ध आहे, त्याचा समावेश करण्यात आला आहे.

हे संपूर्ण संकेतस्थळ पाहायचे म्हटले तर त्याला ४८ तास लागतात. त्यात असलेले पुलंचे साहित्य, भाषणे, गाणी, कथाकथन, छायाचित्रे यांचा आस्वाद घ्यायचा तर तब्बल दहा दिवस तरी हवेत, असे पुलंचे नातू जयंत देशपांडे यांनी सांगितले.

* **संस्कृत अकादमी**

संस्कृतमधील पुरातन हस्तलिखितांचे अध्ययन आणि संशोधन यासाठी संस्कृत अकादमी स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री राजेश टोपे यांनी महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार वितरण सोहळ्यात केली.

संस्कृत भाषेतील उपलब्ध हस्तलिखितांचे संपादन करून ती, प्रकाशित करणे, संस्कृत भाषेच्या प्रसारासाठी संमेलने, व्याख्याने आयोजित करणे, प्राचीन आणि अर्वाचीन शास्त्रांचा तौलनिक अभ्यास करणे, त्यांचे जतन आणि संवर्धन करणे आवश्यक आहे.

राज्यातील शासकीय महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये संस्कृत भाषा विभाग सुरू करण्यास चालना दिली जाईल. विद्यापीठात संस्कृतभाषेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी तीन हजार रुपयांचे पुरस्कार दिले जातील.

संस्कृत भाषेची १४ विद्यापीठे आहेत, अन्य कोणत्याही भाषेची एवढी स्वतंत्र विद्यापीठे अस्तित्वात नाहीत, संस्कृत ही वैज्ञानिक भाषा आहे, असे या वेळी महाकवी कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु डॉ. पंकज चांदे म्हणाले.

*** 'प्रणाम तुजला बुलंद देशा'**

गीतकार माया धुप्पड यांचे 'प्रणाम तुजला बुलंद देशा, प्रिय भारत देशा' हे गीत आता भारतभर आकाशवाणी वरूनप्रसारित केले जाणार आहे.

धुप्पड यांच्या या गीताची निवड आकाशवाणीच्या दिल्ली केंद्राने केली.

या गीताला संगीतकार संजय हांडे यांचे संगीत आहे. कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रतिभा जगताप यांनी केले आहे तर जळगावच्या तिथी बऱ्हाणपूरकर, साक्षी साठे, मृण्मयी भागवत आणि फाल्गुनी जोशी यांनी हे गीत म्हटले आहे.

*** ललित कलेवरील पुस्तकाचे प्रकाशन**

प्रा. जयप्रकाश जगताप यांनी लिहिलेल्या 'ललित कला अभिव्यक्ती' या पुस्तकाचे प्रकाशन शिल्पकार डी. एस. खटावकर यांच्या हस्ते नुकतेच झाले. महाराष्ट्र विद्यार्थी सहायक मंडळाने हा कार्यक्रम आयोजित केला होता.

*** 'सोशल नेटवर्क'वर गणेशोत्सव**

'गणपती बाप्पा ॲट माय होम', 'गणपती मोबाईल अपलोड्स' अशा नावांचे अल्बम अनेकांच्या फेसबुक किंवा ऑर्कुटच्या अकाउंटवर दिसून आले. घरामध्ये केलेली गणेशाची प्राणप्रतिष्ठा, त्याची आरास, सजावट अशा गोष्टी नेटिझन्स सतत 'अपडेट' करीत होते. गणपती बाप्पा मोरया', 'जय गणेश' अशा शुभेच्छा देत फेसबुक; ऑर्कुट, ट्वीटर अशा सोशल नेटवर्किंग साईटवर गणरायाचे स्वागत केले गेले.

'ई-सकाळ'वर तयार केलेल्या 'मोरया २०११' या मायक्रोसाइटवर पारंपरिक गणेशपूजनापासून ते पर्यावरणीय गणेश उत्सवापर्यंत, सर्व माहिती उपलब्ध होती. मंत्र, स्तोत्र, माहात्म्य, जन्मकथा, व्रतकथा, पूजाविधी, देवस्थाने, अष्टविनायक माहिती, विविध देशांतील गणपतीची मंदीरे, गणेश वाहनाची माहिती, अथर्वशीर्ष, शहरातील मानाच्या गणपतींची माहिती, देखाव्यांची व सजावटीची माहिती ''www.ekmev.com,"www.shreeganesha.com' अशा विविध संकेतस्थळांवर दिली गेली.

*** दलित साहित्यात रक्तक्रांतीची भाषा नाही**

व्यवस्था बदलण्याच्या व माणूस म्हणून आपले अधिकार पुन्हा मिळवण्याच्या लढाईत महाराष्ट्रातील दलित समाजाने आक्रमक भाषेचा वापर केला असला तरी दलित साहित्यिकांनी कधीही 'रक्तक्रांती' मार्गाकडे जाण्याचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळेच मराठी साहित्यात सर्वप्रथम उमटलेला विद्रोहाचा क्रांतिकारी स्वर आज संपूर्ण देशात व किमान १७ प्रमाणभाषांमध्ये प्रवाहित झालेला आढळतो, असे मत 'महाराष्ट्र व राष्ट्रनिर्माण : महाराष्ट्रातील दलित साहित्याचा प्रभाव' या विषयावरील

परिसंवादात व्यक्त झाले.

'इग्नू'च्या डॉ. विमल थोरात, मिलिंद आवाड आणि परराष्ट्र सेवेतील देवयानी खोब्रागडे यांची भाषणे झाली. सुहास बोरकर व विजय नाईक यानी कार्यक्रमाचे संचालन केले. डॉ. थोरात यांनी संत परंपरेपासून दलित साहित्यविश्वाचा धांडोळा घेताना मराठीत 'स्वातंत्र्याने आम्हाला दिले तरी काय' असा प्रश्न करीत दलित साहित्याचा आवाज सत्तरच्या 'गोलपिठा'नंतर उमटू लागल्याचे सांगितले.

*** पुणे इंटरनॅशनल सेंटर**

पुणे इंटरनॅशनल सेंटर'चे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. मोहन धारिया यांच्या हस्ते २४ सप्टेंबर रोजी झाले. 'अण्णा हजारे याच्या आंदोलनानंतर पुढे काय', 'भविष्यातील पुण्याचा वेध' या आणि अशा विविध प्रश्नांवर तरुणांच्या आणि संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली विचारमंथन घडवून आणण्यासाठी हे सेंटर स्थापन करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्याला 'युनिक आयडेंटिफिकेशन ॲथॉरिटी ऑफ इंडिया'चे अध्यक्ष आणि इन्फोसिस कंपनीचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी नंदन निलेकणी उपस्थित होते. 'सकाळ'चे अध्यक्ष प्रतापराव पवार, अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर, व्यवस्थापन सल्लागार प्रभाकर ऊर्फ बापू करंदीकर, उद्योजक रवी पंडित, चित्रपट निर्माते डॉ. जब्बार पटेल, बांधकाम व्यावसायिक सतीश मगर, सिंबायोसिस सोसायटीचे संस्थापक- संचालक डॉ. शां. ब. मुजुमदार, शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाडगावकर आदि या प्रसंगी उपस्थित होते.

पुणे इंटरनॅशनल सेंटरच्या अध्यक्षपदी माशेलकर, उपाध्यक्षपदी केळकर, मानद महासचिव म्हणून करंदीकर, तर मानद खजिनदार म्हणून पंडित असतील.

अण्णांच्या आंदोलनानंतरची परिस्थिती, प्रसिद्ध व्यक्तींनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रकाशन, असे उपक्रम सेंटरमध्ये राबविण्यात येणार आहेत. फेसबुक, वेबसाईटस्, प्रिंट, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आदींचा वापर करून ग्रामाण आणि शहरी भारतातील दरी मिटवण्यासाठी उपक्रम राबवले जातील. ❐



# खळाळ

**४ थी आवृत्ती**

**आनंद यादव**

ग्रामीण साहित्याचा नवा खळाळता झरा म्हणजे खळाळ. याची ग्रामीण कथा नावीन्यपूर्ण आ प्रयोगशील आहे.

**१४०रु. पोस्टेज २०रु.**

## टी बुक क्लब २० मधील चौथे पुस्तक

# मेल्टडाऊन




**मार्टिन बेकर**

अनु.

**सुभाष जोशी**

**३००रु.** टी बुक क्लब सभासदांना **१५०रु.**

**पोस्टेज २५रु.**

तुमच्या देखत तुमचं जग कोलमडून पडत असताना
तुम्ही पळणार तरी कुठे?

सॅम्युएल स्पेन्डलव्ह फार घातक खेळ खेळत आहे. बर्टनच्या साम्राज्याशी टक्कर घेतलेल्या दलालाची, त्या गूढव्यक्तिमत्त्वाच्या खानची गुप्तपणे माहिती मिळवण्याचं काम प्रसारमाध्यमाच्या अनभिषिक्त सम्राटासाठी करण्याचं त्याने मान्य केलं होतं, कारण बर्टनला खानचा सूड घ्यायचा होता.

हे काम त्याला पॅरिसच्या शेअर बाजारातून करायचं होतं. सुरुवातीला तिथलं तणावग्रस्त वातावरण सॅम्युएलला भावलं नाही, पण नंतर तो रुळला आणि त्याला ते आवडायला लागलं. काही काळ सगळं सुरळीत चाललेलं होतं.

पण प्रसंगी ऐकमेकाचे गळेसुद्धा कापणाऱ्या या आंतरराष्ट्रीय आर्थिक बाजारातल्या धसमुसळ्या वातावरणात काहीच गृहीत धरून चालत नाही.

जेव्हा त्याची आकर्षक सहकारी, गूढरीत्या अचानक नाहीशी होते,
तेव्हा त्याचं जग एक एक तुकड्यानी कोलमडायला लागतं.

जेव्हा जागतिक अर्थव्यवस्था कोसळायला लागली, तेव्हा त्यासाठी सॅम्युएलला जबाबदार ठरवण्यात आलं आणि मग सगळेच त्याच्या मागे लागले –
शत्रू, सहकारी आणि अर्थातच पोलीसही!

लपण्यासाठी जेव्हा त्याने पॅरिसच्या अंडरवर्ल्डमध्ये आसरा घेतला, तेव्हा तिथे कल्पनेपेक्षाही भयानक प्रकार चालत असल्याचं त्याच्या लक्षात आलं.

त्याने सुरुवातीला जो खेळ मांडला होता, त्याचे नियम आता पार बदलले होते.
त्याचं जग कोलमडून पडायच्या आधी त्याला सत्य समजणार होतं का?
कारण एक गोष्ट अटळ होती, . . . . . . .

नवे कोरे

# नॉट पेड




**हरिशंकर परसाई**

अनुवाद

**उज्ज्वला केळकर**

**१४०रु. पोस्टेज २५रु.**

हिंदीत पुष्कळ लेखक व्यंगलेखन करतात. त्यांच्यातले सर्वोत्कृष्ट म्हणजे हरिशंकर परसाई होत, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. हरिशंकरजींच्या काही उत्कृष्ट व्यंगरचनाच्या मराठी अनुवादांचा हा संग्रह ही श्रीमती उज्ज्वला केळकर यांनी मराठी वाचकांना दिलेली एक नावीन्यपूर्ण भेट आहे.

भारतीय समाजजीवनाची सर्वच अंगे भ्रष्ट झाली आहेत. त्यांचे स्वरूप पूर्णपणे गढूळ झाले आहे. या सार्वत्रिक गढूळपणाचे विदारक दर्शन तीक्ष्ण उपहासाद्वारे लेखकाने आपल्या व्यंगलेखनातून घडविले आहे. त्यातूनच कोणतचे क्षेत्र सुटलेले नाही. लोकशाही, निवडणुका, राजकारण यांच्यापासून साहित्य, सरकारी पुरस्कार, प्रशासन, पोलीसयंत्रणा, शिक्षण आणि अध्यात्मसुद्धा! अशी सर्वच क्षेत्रे उपहासाच्या धारदार सुरीने सोलून काढून, नागडीउघडी करून लेखकाने वाचकांसमोर ठेवली आहेत. हरिशंकरजींचा उपहास झोंबरा आहे, व्यंग बोचरे आहे. पण सार्वत्रिक गढूळपणाबद्दलची खंत आणि चीड अस्सल आहे. उपहासासाठी त्यांनी कधी पुराणकथांचे विडंबन केले आहे तरी कधी मार्मिक अभिप्रायांतून वाचकांना हसताहसता विचार करायला लावले आहे. हरिशंकरजींच्या हिंदीतील व्यंगलेखनाचे तेवढेच धारदार मराठीकरण करण्याचे कठीण काम श्रीमती केळकर यांनी समर्थपणे पार पाडले आहे.

– ह.मो. मराठे

# पुस्तक परिचय

**साध्या साध्या आजारांकडे वेळीच लक्ष दिले तर महागड्या उपचारांची गरज पडणार नाही असा दिलासा देऊन इच्छाशक्ती वाढवणारे वैद्यकीय मार्गदर्शन**

## धन्वतंरी घरोघरी




**डॉ. ह. वि. सरदेसाई / डॉ. अनिल गांधी**

पुण्यातील डॉ. अनिल गांधी यांच्या 'मना सर्जना' या आत्मकथनाला वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील कौशल्याप्रमाणेच समाजसेवेचे विविध प्रकल्पही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाला पोषक ठरले. कस्टमर इज गॉड असे महात्मा गांधी म्हणत. त्या धर्तीवर रुग्ण देवो भव असे डॉ. अनिल गांधी मानतात. रुग्ण हा डॉक्टरांचा अन्नदाता असतो; या दात्याला शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या आरोग्यसंपन्न करण्याची जबाबदारी आहे, असे त्यांचे व्यावसायिक ब्रीद तर आहेच; पण त्याचबरोबर आजारच होऊ नये या दृष्टीने स्वच्छता, व्यायाम, आहार विहार, रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे, वेळोवेळी रोगप्रतिबंधक लसी घेणे वगैरे बाबतीत रुग्णांचे प्रबोधन करणे हेही डॉक्टरांचे काम आहे, असे ते मानतात.

फॅमिली डॉक्टर या संकल्पनेचा तीस-चाळीस वर्षांपूर्वी समाजात वरचष्मा होता. त्या संस्कारात वाढलेले डॉ. अनिल गांधी आजही त्या संकल्पनेचा पाठपुरावा करण्याची गरज आहे, असे मानतात. आपल्याकडे येणारा रुग्ण हा ज्या कुटुंबाचा घटक आहे, त्या संपूर्ण कुटुंबाच्या आरोग्याची आणि सुखासमाधानाची जबाबदारी आपल्यावर आहे, अशी त्यांची भावना आहे. या त्यांच्या बांधिलकीच्या प्रेरणेने 'मना सर्जना' नंतर जनसामान्यांच्या आरोग्यविषयक प्रबोधनाच्या संदर्भात आणखी काही लेखन-प्रकाशन करण्यास चालना मिळाली. 'धन्वंतरी घरोघरी' हे संपादित पुस्तक म्हणजे या प्रबोधन-प्रकल्पातील पहिले पाऊल होय. पुण्यातील एक ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. ह. वि. सरदेसाई आणि डॉ. अनिल गांधी या दोघांनी मिळून या पुस्तकातील मजकुराचे संकलन आणि संपादन केले आहे. ''साध्या आजारांची सोप्या भाषेत माहिती देऊन जनसामान्यांचे शंकानिरसन करणे आणि त्यावरील घरगुती उपचार आणि पथ्ये'' यावर प्रकाश टाकण्याच्या उद्देशाने वेगवेगळ्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून लेखन सहाय्य घेण्यात आले आहे.

या पुस्तकात फॅमिली डॉक्टर, शिशू-बालविभाग, स्त्रीविभाग, सर्वसाधारण विकार, डोळे, कान-नाक-घसा, दात, अस्थिरोग, सौंदर्यसाधना, वैवाहिक समस्या अशी मुख्य प्रकरणे असून त्यात गरजेनुसार अनेकविध विषयांचा समावेश केला गेला आहे.

डॉ. सरदेसाई यांनी आरंभीच निरोगी जीवनाची त्रिसूत्री म्हणून ''सकस आणि संतुलित आहार, अंतर्बाह्य स्वच्छता आणि योग्य व्यायाम'' यांचा निर्देश केला आहे. व्यायामाची त्यांची व्याख्या ''कोणतेही काम करीत नसताना झालेली हालचाल-लीझर टाइम ॲक्टिव्हिटी'' अशी आहे.

स्थिर व्यायाम प्रकारात अवयव स्थिर राहतो, स्नायूंच्या आकुंचनाने सांधे हलत नाहीत पण बरीच ऊर्जा खर्च होते. वजन उचलणे, डंबेल्स, स्प्रिंगचे व्यायाम, दंड-बैठका या स्थिर व्यायामामुळे थोड्या हालचालीत लक्षणीय ऊर्जा वापरली जाते. स्नायू

बलदंड होतात. शरीर सुडौल होते. शक्ती येते. हाडांची घनता वाढते.

चालणे, पळणे, खेळ खेळणे, सायकल चालवणे, पोहणे अशा 'चल' व्यायाम प्रकारात स्नायूंच्या आकुंचनाबरोबर सांध्यांची हालचाल होते; स्नायूतील रक्त हृदयाकडे पाठवले जाते, नाडीची गती वाढते; हृदयाच्या आकुंचनाची शक्ती वाढते, हृदयाची आणि फुफ्फुसाची कार्यक्षमता वाढते. वजन, साखर नियंत्रणात राहते. झोप चांगली लागते. पचन सुधारते.

योगासने, सूर्यनमस्कार, पोटाचे व्यायाम यामुळे स्नायू आणि सांधे दोन्ही लवचिक राहतात. तोल सांभाळण्याचे कार्य सुधारते.

संथ गतीने सपाटीवर पायी चालणे, सायकलिंग वगैरे व्यायाम प्रकारात दमछाक न होता संथपणे श्रम करण्याची क्षमता वाढते. सांधे हलते राहतात. श्वसन कार्यक्षम राहते, भूक चांगली लागते. हृदयाभिसरण व्यवस्थित चालते. मन अनुरंजित राहते.

काही व्यायाम प्रकारात स्थिर, चल, लवचिकता आणि दमछाक या चारही बाबींचे मिश्रण असते. या सर्व व्यायामांना खर्चिक साधने लागत नाहीत. फारशी जागा लागत नाही. रोज अर्धा तास हे व्यायाम केले तर पुरेसे ठरते.

व्यायामाबरोबर आपला आहार संतुलित हवा. आपल्या शरीरात ३००० कोटी पेशी असतात. पेशीचा गाभा प्रोटोप्लाझमने बनतो. प्रोटोप्लाझम प्रथिनांनी बनतो. प्रथिनांची गुंफण २१ अमायनो ॲसिड्सपासून होते. त्यापैकी ८ अमायनो ॲसिड्स आपल्या शरीरात तयार होतात. ती आहारातून मिळवावी लागतात. उष्मांक, प्रथिने, स्निग्ध पदार्थ, कर्बोदके, जीवनसत्वे, क्षार, चोथा, पाणी आणि तृप्ती या नऊ अंगांनी आहाराचा विचार करावा लागतो. मांसाहार, शाकाहार यातून मिळणारी पोषक द्रव्ये, संयुक्त आणि असंयुक्त मेदाम्ले, वगैरेंचे गुणदोष जाणून घेऊन आहाराचे संतुलन साधणे आवश्यक ठरते.

व्यवस्थित झोप येणे हे चांगल्या प्रकृतीचे एक लक्षण. मेंदूतील ब्रेन स्टेम भागातील काही पेशीसमूहामुळे झोप येते, स्वप्ने पडतात आणि जाग येते. आठ तास झोप पुरेशी असते. निद्रानाशाची समस्या गंभीर ठरते. झोपेचे औषध हा निद्रानाशावरचा कायमचा उपचार नव्हे.

डोळे, श्रवणशक्ती, रक्तदाब, कोलेस्टेरॉल, स्ट्रेस टेस्ट, पॅपस्मिअर, इलेक्ट्रो कार्डिओग्राम, स्तन, मॅमोग्राफी, प्रोस्टेट ग्रंथी, एचआयव्ही, शुगर वगैरे तपासण्या आवश्यक तेव्हा करणे उपयुक्त ठरते. लग्नापूर्वी कुंडली बघतात, त्याचप्रमाणे मुलामुलींच्या काही तपासण्या करून घेतल्या तर एकमेकांच्या दृष्टीने शारीरिक-मानसिक गुणदोषांचा मेळ कितपत सुखकारक ठरेल याचा अंदाज येऊ शकतो. काही आजार अनुवांशिक असतात. उदा. थॅलिसिमिया मेजर किंवा थॅलिसिमिया मायनॉर. नवरा-बायको दोघांनाही हा दोष असेल तर त्यांनी एकतर लग्न करू नये, केल्यास

मूल होऊ देऊ नये. दत्तक घ्यावे. आर एच निगेटिव्ह मुलीने आर एच पॉझीटिव्ह मुलाशी लग्न केले तर दुसऱ्या गर्भारपणात काही प्रश्न निर्माण होऊ शकतात. रेटिनायटिस पिगमेंटोझा या दोषामुळे पुरुषाला ३५ ते ४० वयात अंधत्व येते. हा दोष आधी कळत नाही. तो पुरुषांना होतो पण जनुकीय दोष स्त्रियांमुळे पुढच्या पिढीत उतरतो. मुलीच्या आतेभांवडांत, मामेभांवडांत किंवा मावस भावंडांत असा दोष आहे का याची माहिती मिळाल्याशिवाय लग्न ठरवू नये. रातांधळेपणा, रक्त गोठण्यातील दोष, पांढरे कोड, मायॉपथी (स्नायूंचा आजार) या अनुवांशिक आजारांवर आजतरी उपचार उपलब्ध नाहीत.

डॉ. सरदेसाई यांनी एकूणच आरोग्याबद्दल आपल्या अनुभवाचे भांडार वाचकांपुढे प्रकट केले आहे. जाता जाता अनेक बहुमोल टिप्स दिल्या आहेत.

रुग्ण बरा होतो याचे श्रेय डॉक्टरांना जाते; रुग्णालयाला जाते. अनेकदा पेशंटला आणि त्याच्या नातलगांना घाबरवून टाकले जाते, वेगवेगळ्या खर्चिक तपासण्यांद्वारे आजाराचे गांभीर्य कळत-नकळत अतिरंजित स्वरूपात पेश केले जाते. डॉ. अनिल गांधी हे एक फॅमिली डॉक्टर म्हणून मूलत: आजारच होऊ नये यासाठी रुग्णाने प्रतिकारशक्ती आणि शरीराची नैसर्गिक बरे होण्याची क्षमता यावर भर देतात.

काही आजार कधीच बरे होत नाहीत, काही आजारांवर औषधेच सापडलेली नाहीत याकडेही ते लक्ष वेधतात. बऱ्याचशा विषाणूजन्य आजारांवर (उदा. गोवर, कांजिण्या, कावीळ) गुणकारी औषधे ज्ञात नाहीत, साध्या सर्दीवर औषध नाही हे स्पष्ट करून तरीही लोक डॉक्टरांकडे येतात. डॉक्टर उपचार करतात आणि रुग्ण त्या औषधाने बरा होतो, असे दोघेही समजून चालतात! हर्निया, मूतखडा, अस्थिभंग, शारीरिक व्यंग, आतड्यातील ऑबस्ट्रक्शन, करोनरी आर्टरीचे ब्लॉकेज या आजारात शस्त्रक्रिया करणेच क्रमप्राप्त असते. सलाइन, इंजेक्शन, गोळ्या यांचा वापर रुग्ण तोंडाने खाऊ-पिऊ शकत नाही तेव्हा केला जातो. 'टॉनिक्स' वापरणे अनावश्यक असे त्यांना वाटते. टॉनिक्समुळे फक्त औषधी कंपन्या धष्टपुष्ट होतात!

रुग्ण बरा होण्यात संमोहनाचा, मानसिकतेचाही बराच भाग असतो. याला डॉ. गांधी स्व-संमोहन म्हणतात. 'मला बरे नाही. मी डॉक्टरांकडे जाईन. ते मला तपासतील. औषध देतील. ते औषध घेतले की मी बरा होईन' हे तर्कशास्त्र अनेक रुग्णांना दिलासा देते. या श्रद्धेमुळे बरेच रुग्ण मानसिकदृष्ट्या आश्वस्त, सकारात्मक असतात. फॅमिली डॉक्टर रुग्णाची तक्रार, औषधे, प्रभावी डोस यांचा सातत्याने प्रॅक्टिसमध्ये पडताळा घेऊन आपले ठोकताळे बसवत असतो. 'आय ट्रीट ही क्युअर्स' असा फलक अनेक डॉक्टर्स लावतात. एका परीने ही प्रांजळ कबुलीच होय. कारण औषधाशिवायही बरेच आजार स्वसंमोहन इच्छा शक्ती आणि प्रतिकारशक्ती यामुळे बरे होतात.

बऱ्याच आजारांबाबत ते का होतात? कोणाला होतात? त्यांचे नेमके स्वरूप काय याबाबत संभ्रम असतो. अमुक माणसाला अमुक आजार का होतो, का झाला याची मीमांसा अनेकदा करता येत नाही. केमोथेरपी, रेडिएशन यामुळे आराम मिळतो, परंतु त्यामुळे कॅन्सरच्या पेशींबरोबर काही आवश्यक व हितकारक पेशीही मारल्या जातात. त्यामुळे अपायही होऊ शकतो. निष्कर्ष काय? रुग्ण बरा होतो तो मुख्यत: त्याच्या प्रतिकारशक्तीमुळे आणि इच्छाशक्तीमुळे. औषधे आणि डॉक्टर यांचाही काही प्रमाणात उपयोग होतो. मात्र आजार फार वाढण्याच्या आधी डॉक्टरांकडे जाणे श्रेयस्कर!

अशा प्रकारे आपल्या शरीराची रचना, आहार विहाराची गरज, शारीरिक तक्रारींच्या संदर्भात आपल्या स्वाभाविक प्रतिकार शक्तीचा आणि इच्छाशक्ती यांचा प्रभाव आणि डॉक्टर व औषध यांची मदत हे सर्व लक्षात घेऊन आपल्या आरोग्याचे संवर्धन करणे कसे श्रेयस्कर ठरते याबद्दल आपण जागरूक रहायला हवे.

मुलांचे आरोग्य (डॉ. सुनील शहा), स्त्रियांचे आरोग्य (डॉ. शंशाक एच. शहा), डोळ्यांचे आरोग्य (कर्नल डॉ. मदन देशपांडे), कान-नाक-घसा (डॉ. सुरेश घैसास), दातांचे आरोग्य (डॉ. सुचित केळकर), अस्थिरोग (डॉ. मिलिंद गांधी), सौंदर्य साधना (डॉ. दिलीप शहा), लैंगिक समस्या (डॉ. शंशाक सामक) अशा विविध विषयांवरच्या टिप्सही सर्वसामान्य वाचकांना मार्गदर्शक ठरतील. वेळीच तक्रारीकडे लक्ष दिले तर व्याधीने गंभीर रूप धारण करण्याआधीच योग्य उपचाराने आटोक्यात येऊ शकेल. खर्च, मनस्ताप, हेलपाटे यापासून सुटका होऊ शकते. आजकालच्या सुपर स्पेशॅलिस्टांच्या पंचतारांकित औषधोपचारांच्या झगमगाटात बऱ्याचशा शारीरिक व्याधी वेळीच उपचार केल्या तर सहजपणे बऱ्या होऊ शकतात, असा विश्वास निर्माण करणारे हे पुस्तक आहे.

❒

**किंमत : १५०रु.  सभासदांना : सवलतीत  पोस्टेज : २५रु.**




# निर्बाचित कलाम

**४थी आवृत्ती**

**अनु. मृणालीनी गडकरी**

स्त्रीच्या आत्मसन्मानासाठी परजलेली धारदार विचारांची, शब्दांची दुधारी तलवार

**१७०रु. पोस्टेज २५रु.**

नवे कोरे




# शब्दचर्चा

**प्रा.डॉ.म.बा. कुलकर्णी**

**३५०रु. पोस्टेज ३०रु.**

'शब्द' हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. शब्दाला रंग-रूप असते. रस-गंध असतो. त्यामुळे ते जाणीवपूर्वक वापरता आले पाहिजेत. शब्दकोशामध्ये तर सर्वच शब्द असतात, पण तेथे ते एक प्रकारे निर्गुण-निराकार अवस्थेत असतात. देवळांमध्ये प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर जसे दगडाच्या मूर्तीला 'देवत्व' प्राप्त होते, तसेच शब्दांचे आहे. वापरातून त्यांच्यात प्राणप्रतिष्ठा होते. ते सजीव होतात. बोलू लागतात, डोलू लागतात. ही किमया डॉ. म. बा. कुलकर्णी यांनी या पुस्तकात उलगडून दाखवली आहे.

'अठरा विश्वे दारिद्र्य' असे सर्रास बोलले, लिहिले जाते. कोणती अठरा विश्वे? नावे सांगता येतील? नाहीतच, तर कोठून सांगणार? मग हा शब्दप्रयोग आला कोठून? डॉ. म. बा. कुलकर्णी सांगतात, 'अठराविसे' असा शब्दप्रयोग असायला हवा. अठराविसे = ३६०. म्हणजे बाराही महिने दारिद्र्य!

# पुस्तक परिचय

**उन्मत्त डायनोसॉर राजा आणि शांतिदूत कपोत पक्षी यांच्यातील दुर्जन-सज्जन संघर्षाची कहाणी**

## तलवारीचा शोध




**नॅन्सी यी फान**/ अनु : मंजूषा आमडेकर

नॅन्सी यो फान या चीनमध्ये जन्मलेल्या पण अमेरिकेत बालपणापासून वास्तव्य असलेल्या मुलीने वयाच्या बाराव्या वर्षी लिहिलेल्या स्वोर्डबर्ड या कादंबरीचा चांगलाच गाजावाजा झाला. मराठीतही शांतिदूत या नावाने तिचा अनुवाद प्रसिद्ध झाला. 'स्वोर्ड बर्ड'च्या पूर्वकथेच्या स्वरूपातील स्वोर्डक्वेस्ट ही कादंबरी २००८ मध्ये प्रसिद्ध झाली. तिचाही मराठी अनुवाद मंजूषा आमडेकर यांनी अल्पावधीत केला आणि मेहता पब्लिशिंग हाऊसने तो झटपट बाजारातही आणला.

मुलांच्या कल्पनाशक्तीला जर बालवयातच वाव देण्यास योग्य ते वातावरण मिळाले तर नॅन्सीप्रमाणे त्यांच्यातील सृजनाची ऊर्मी आविष्कृत होऊ शकते आणि उत्तम कलाकृतीची निर्मिती होऊ शकते. मुलांमधील प्रतिभेचे पंख शालेय अभ्यासक्रमाच्या साचेबंद घोकंपट्टीत जर छाटले गेले नाहीत तर ते कसे मुक्त गगनभरारी मारू शकतात याचे एक नमुनेदार उदाहरण म्हणून 'स्वोर्ड क्वेस्ट'कडे बोट दाखवता येईल.

अमेरिकेत या कादंबरीचे कुमार वाचकांनी उत्साहाने स्वागत केले. न्यूयॉर्क टाइम्सच्या बेस्टसेलर्सच्या यादीत तिला स्थान मिळाले.

'स्वोर्ड क्वेस्ट' ही कौरियन सागर आणि ऑगरिक महासागर यांच्या परिसरातील पक्षी जगताच्या पार्श्वभूमीवरील साहस कथा आहे.

नंदनवनातील कौरियाचा राजा पेफेरोह हा वयोवृद्ध फिनिक्स होता. तो पक्षीजगतातील विध्वंसक संघर्षाच्या आणि विद्रोहाच्या बातम्यांनी अस्वस्थ झालेला होता. त्याच्या राज्यात शांतता होती. परंतु एकूणच पक्ष्यांच्या वेगवेगळ्या जातीजमातीत आणि वसाहतीत तणाव होता.

घरट्यांसाठी जागा, बिया आणि फळांचे वाटप, वृक्षतोडीमुळे वसाहतींना निर्माण झालेला धोका यावरून वाद सुरू होते. धान्याच्या गोदामांची लुटालूट, चोऱ्यामाऱ्या, एकमेकांवर हल्ले यासारखे प्रकार सर्रास सुरू होते. बलवान मोठे पक्षी आणि छोटे, दुबळे, नाजूक पक्षी यांच्यात दुरावा निर्माण झाला. चारपंखी डायनोसॉर आणि ऑर्कियाप्टेरिक्स डायनोसॉर धुमाकूळ घालू लागले. सगळीकडे दहशतीचे, भीतीचे, अविश्वासाचे वातावरण होते.

पेफेसह राजाने ईश्वराची प्रार्थना करीत म्हटले, ''हे ईश्वरा, आम्हाला मदत कर. आम्ही काय करावे ते सांग. तुझा कौल दे.''

ईश्वर त्याची प्रार्थना ऐकून त्याला आदेश देतो. ''एक तलवार तयार कर. जगाचा कारभार सुरळीत करण्यासाठी लौकरच मी पक्षी राज्यात अवतार घेऊन येणार आहे. मी आल्यावर ती तलवार जगात शांतता प्रस्थापित करील.''

पेफेरोह पक्ष्याला तलवारीने खरोखर शांतता प्रस्थापित होईल का असा प्रश्न

पडतो. अशी तळपती तलवार तयार करणारा कारागीर कुठे सापडेल असा दुसरा प्रश्न त्याला जास्तच भेडसावतो.

तेवढ्यात ईश्वराचा पुढचा संदेश येतो.

''तलवार तयार झाली की मी तिला विलक्षण जादूई शक्तीने अभिमंत्रित करीन. आजपासून तीन वर्षांनी पाचव्या पौर्णिमेला त्या तलवारीचा खरा वारसदार येऊन तिच्यावर हक्क सांगेल. तोवर तिचे रक्षण करायला हवे. ती सैतानी वृत्तीच्या पक्ष्याच्या पंज्यात सापडली तर आसुरी थैमान माजेल.''

पेफेरोहच्या या साक्षात्काराची बातमी सर्वत्र पसरली.

तलवार बनवण्यासाठी अनेक लोहार, कारागीर येऊन भेटले. एका कारखान्यात तलवारीची निर्मिती होऊ लागली.

काही दिवसांनी राजाला आकाशातून एक प्रकाशाचा लोळ खाली येताना दिसला.

तो एक अश्रू होता. लढायांमुळे कष्टी झालेल्या परमेश्वराचा अश्रू.

पृथ्वीवर पडल्यावर त्या अश्रूचे आठ भाग झाले. त्या प्रत्येक तुकड्याचे आठ रस्त्यांमध्ये रूपांतर झाले.

सर्वांत मोठ्या रस्त्यात इंद्रधनुष्याचे सात रंग लखलखत होते.

उरलेल्या सात रत्नांमधील प्रत्येक रत्नाचा रंग वेगळा होता. इंद्रधनुष्यातील सात रंगांपैकी एकेक.

कारखान्याच्या उघड्या खिडकीतून सर्वांत मोठे रत्न आत झेपावले; ते त्या तलवारीच्या मुठीवर पडले आणि तलवार पूर्ण झाली.

तलवारीला स्पर्श करून राजा म्हणाला, ''महानायक येईपर्यंत मी तुला जपून ठेवीन.''

महानायकाला शोधायला लोहार काम करणारा टूफॅन जातीचा पक्षी ओझॅन बाहेर पडला तेव्हा राजाने त्याला आशीर्वाद दिला.

परमेश्वराच्या अश्रूपासून तयार झालेल्या सात रत्नांबद्दल पक्षी जगतात चर्चा चालू होती. आकाशातून टपकलेले हे नागमणी वेगवेगळ्या जागी विखुरलेले असून ते वेगवेगळ्या रंगाचे आहेत. कोरियातील जादूच्या तलवारीवर ही सात रत्ने जडवण्यात आली. तिच्यात अभूतपूर्व शक्तीचा संचार होईल. त्या तलवारीने महानायक सर्व दुष्ट शत्रूंचा संहार करू शकेल. या तलवारीने जगाचे स्वरूप बदलता येईल. त्या तलवारीत सैतानी ताकदीचा नायनाट करण्याची शक्ती असेल आणि समस्त पक्ष्यांना शांततापूर्ण जगता येईल अशा नव्या जगाची निर्मिती होईल. या रत्नांवर गूढ लिपीत लिहिलेला संदेश उकलता आला तर त्या तलवारीचा ठावठिकाणा लागेल. अशा

कथा दंतकथा संपूर्ण पक्षी जगतात प्रसृत झाल्या. या रत्नांवर एव्हिश लिपीत काही मजकूर असतो. ही लिपी फारच थोड्या पक्ष्यांना वाचता येते.

ऑर्किऑप्टेरिक्स डायनोसार पक्ष्यांचा सम्राट हंग्रियास दुसरा याचा सेनापती माल्दिओर त्याला पदच्युत करून स्वत: सम्राट होतो. तो दुष्ट, क्रूर आणि काळ्या शक्तीचा प्रतीक असतो. यीन आत्म्याने त्याला एक जादूई पंख दिलेला असतो. त्या पंखातील शक्ती वाढवण्यासाठी दरमहा एक विशिष्ट काढा घेण्यासाठी माल्दिओरला यीन आत्म्याकडे यावे लागते. त्याला माल्दिओरच्या शरीरात शिरून स्वत:चा जीव महानायकाच्या तावडीतून वाचवायचा असतो. त्यासाठी माल्दिओरच्या पोटात काढ्याच्या जोडीला आपला अर्क जायला हवा म्हणून यीन आत्मा माल्दिओरला नागमण्यापेक्षाही भारी वस्तूचे म्हणजे तलवारीचे आमिष दाखवतो. यीन आत्मा माल्दिओरच्या पोटात शिरला की माल्दिओरचा मृत्यू काही कालावधीत होणे अटळ असते, पण यीनला त्याची पर्वा नसते. त्याला स्वत:चा जीव वाचवणेच जास्त महत्त्वाचे वाटत असते. तलवारीच्या प्राप्तीच्या मोहाने माल्दिओर घाण वास येणारा यीन आत्माचा राखाडी गिळगिळीत अर्क थोडासा प्राशन करतो. ''तू हे सर्व गिळून टाकलेस तर दरमहा तुला काढा घ्यावा लागणार नाही. तू महानायक होशील.'' असे यीन आत्मा त्याला आग्रहाने सांगतो तेव्हा माल्दिओर ती टाटली फेकून देऊन यीन आत्म्याचा एक पंख विळ्याने कापतो. दुसऱ्या पंखाच्या जागी एक लाकडी ठोकळा दिसतो; चार पंखी डायनोसार असतो तो! यीन आत्मा जादूचा सुरा डोमकावळ्यावर बसून उडणाऱ्या माल्दिओरवर फेकून त्याचे शरीर आणि आत्मा वेगळे करू पाहतो; परंतु माल्दिओर यीन आत्म्याच्या तावडीत सापडत नाही. सुरा जमिनीवर आदळतो.

माल्दिओरला तलवार हवी असते. सात रत्ने हवी असतात. त्याला सर्व पक्ष्यांवर सत्ता गाजवायची असते.

रत्नांच्या शोधासाठी विंगर, गरूड, फ्लेड्युर, विंडव्हाइस (उर्फ-०१३ अज्ञात), स्टारमॅक हे चौघे मित्र बाहेर पडतात.

गरूड राजाकडे जांभळ्या रंगाचे रत्न सापडते;

हेरॉन बगळ्याकडे, खंड्याकडे पिवळे रत्न मिळते.

समुद्रापलीकडच्या रॅटल बोन्स सरदाराकडे लाल रत्न सापडते...

विंडव्हाइस कबुतराच्या जमातीकडील निळे रत्न एका बेटातल्या गुहेत सापडते.

माल्दिओर आणि विंडव्हाइस यांच्यात स्पर्धा असते.

विंडव्हाइस हा महानायक असल्याचे उघड होते. माल्दिओरला तलवार ठेवलेली मंजूषा (पेटी) मिळू नये म्हणून विंडव्हाइसला स्वत:च्या हृदयातली सगळी ताकद पणाला लावावी लागते.

माल्दिओरची तलवार विरत, विरघळत जाते. तिचे धूलिकणात रूपांतर होते. पिरॅमिड कोसळून त्याखाली माल्दिओर चिरडला गेला असे बघितल्यावर डायनोसार सैनिक शस्त्रे खाली टाकतात.

फिनिक्स राजा पेफेरोह विंडव्हाइसला कृतज्ञतेने म्हणतो, ''तू आमच्या बेटाला पुनर्जीवन दिलेस. गेली तीन वर्षे आम्ही तुझी वाट बघत होतो. ही तलवार घे. तुझ्या हृदयात सामर्थ्य आणि सत्य भरून राहू दे. त्यातून प्रेम आणि मैत्रीचा संदेश निरंतर जगाला मिळू दे. तुझ्यामध्ये अखंड शौर्य नांदू दे. त्यातून आम्हाला शांती आणि स्वातंत्र्य यांचे मोल कळू दे. जाणवू दे. आजपासून तुला शांतिदूत असा किताब देत आहोत.''

शांतिदूत विंडव्हाइस या समारंभात समारोपादाखल म्हणतो,

''खरं तर आपण सर्व महानायकच आहात. आपणा सर्व पक्षीमित्रांच्या मदतीशिवाय हे ध्येय साध्य होऊ शकले नसते. सुतारपक्षी बिंगर, सुवर्ण गरुड, फ्लेड्युर, स्टारमॅक मैना पक्षी, खंड्या पक्षी, रिया पक्षीण, करी पोपटीण, ग्वेंडलीन पेंग्विन राणी, माझी आई इरीन - या सर्वांची खूप मदत झाली. आपण सर्वच महानायक आहोत. आपल्यासाठी एकच महानायक पुरेसा नाही. आपण सर्वांनीच एकमेकांची काळजी घ्यायला हवी. विंगरचं तंतुवाद्य, फ्लेड्युरची गाणी, स्टारमॅकची लाकडी स्ट्रॉबेरी यांची आठवण कधी बुजणार नाही. शांती, स्वातंत्र्य, शौर्य आणि न्याय यांचे राज्य आता सुरू होत आहे.''

आर्कियोप्टेरिस डायनोसार हे नेत्याच्या मृत्यूनंतर आपापसात लढत राहिले. लहान लहान गटात विखुरले गेले. त्यांचे महत्त्व लोप पावले.

विंडव्हाइस शांतिदूत म्हणून पक्ष्यांचे आकाशातून रक्षण करतो तर इतर पक्षी पृथ्वीवर राहून परस्परांना मदत करतात. शांतिदूताच्या जीवनावर पुस्तक निघाले आहे. पेफेरोह राजाने पक्ष्यांच्या इतिहासाच्या नोंदींचे पुस्तक काढले आहे. समुद्र पक्ष्यांच्या बेटावर सगळे मित्र कधी कधी एकत्र येतात आणि जुन्या स्मृतींना उजाळा देतात.

ऐन किशोरवयीन नॅन्सी पक्ष्यांच्या जगातील कल्पनारम्य संघर्षाच्या रूपात सज्जन आणि दुर्जन यांच्यातील चिरकालीन लढ्याची रोमांचकारक कहाणी फुलवते याचे कौतुक वाटते. ❐

**किंमत : १९०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**

नवे कोरे




# मी संपत पाल,

गुलाबी साडीवाली रणरागिणी

**ॲनी बरथॉड**
अनुवाद
**सुप्रिया वकील**

**१७०रु. पोस्टेज २५रु.**

सकाळचे आठ वाजलेत. मी आवरून तयार होतीय.
यांत्रिकपणे माझ्या हालचाली घडतायत.
मी माझ्या छोट्याशा अंधाऱ्या खोलीत आहे.
गेल्या दोन वर्षांपासून हे माझं मुख्य कार्यालय आहे.
मी केसांचा अंबाडा वळते, मग गुलाबी साडीची
घडी उघडून ती नेसते.
बाहेर जमलेल्या गर्दीचा गलका केव्हापासूनच कानावर पडतोय. त्या
सगळ्या जणी युद्धासाठी सज्ज आहेत.
माझ्याकडून एक इशारा मिळायचा अवकाश,
त्या आणखी मोठ्यानं गर्जत उसळून उठतील!
झालं... माझं आवरून झालंय. मी काठी घेऊन बाहेर जाते.
मी दारापाशी येताच आभाळाच्या दिशेनं उंचावलेल्या
काठ्यांचं जंगल माझ्या स्वागतासाठी उत्साही आवाजात
गगनभेदी गर्जना करतं :
''गुलाबी गँग! गुलाबी गँग!''
या साडीनंच आम्हाला लोकप्रिय बनवलं आहे.

# पुस्तक परिचय

**मेंदू तुमचे ऐकतो. मात्र त्यासाठी त्याला योग्य तो संदेश तुम्ही द्यायला हवा**

## ब्रेनप्रोग्रॅमिंग




**डॉ. रमा मराठे**

रंग सुखाचे, स्वभावाला औषध आहे, हसत जगावं, असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व, चॅम्पियन व्हा, औषधाविना आरोग्य, मनगंगेच्या काठावरती, वगैरे डॉ. रमा मराठे यांनी लिहिलेली पुस्तके मानसिक, बौद्धिक, भावनिक विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शक म्हणून उपयुक्त आहेत.

डॉ. जॉन ग्रे यांच्या 'मेन आर फ्रॉम मार्स अँड वुमेन आर फ्रॉम व्हीनस' या पुस्तकाचे 'तो आणि ती' हे मराठी रूपांतर, ऱ्होंडा बायरन या लेखिकेच्या दि सिक्रेटचे रहस्य हे मराठी संस्करण देखील त्यांच्या नावावर आहे. 'फ्लॉवर रेमिडिज्' वरील स्वभावाला औषध आहे हे पुस्तक, बालमानसशास्त्राचा मागोवा घेत लिहिलेले 'असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व' हे पुस्तक, मुलांमधील स्पर्धाशीलता वाढवणारे, अभ्यास आरोग्य, आत्मविश्वास, संस्कार आणि सामाजिक बांधीलकी या पंचसूत्रीचा संदेश देणारे चँपियन व्हा हे पुस्तक, आहार, व्यायाम, निसर्गोपचार, योगासने वगैरे मार्गांची शक्य होणारी आरोग्य साधना करण्याला प्रोत्साहन देणारे 'औषधाविना आरोग्य' हे पुस्तक - या सर्वांद्वारे वाचकांना शहाणे करून सोडण्याचा चंग बांधला आहे.

कार्ल युंग या मानसशास्त्रज्ञाचे एक निरीक्षण आहे. कोणतीही नवनिर्मिती ही प्रज्ञेने नव्हे तर आंतरिक गरजेपोटी क्रियाशील होणारी सहज प्रवृत्ती असते, क्रीडा असत.हे निरीक्षण त्यांना आपल्या स्वभावप्रवृत्तीशी मिळते जुळते वाटते. आपल्या आंतरिक गरजेपोटी आपले लेखन होत आहे असे त्या मानतात. वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या एका वर्किंग वुमनला आपल्या मुलांना चांगल्या प्रकारे वाढविण्याच्या ओढीने बालमानसशास्त्राचा अभ्यास करावासा वाटतो, स्वत:च्या वेदनांचा वेध घेताना 'रंग सुखाचे' आणि 'हसत जगावे' यांचा स्वत:लाच संदेश द्यावासा वाटतो... या प्रक्रियेचाच पुढचा टप्पा म्हणजे त्यांचे 'ब्रेन प्रोग्रॅमिंग' हे नवे पुस्तक असे मानायला हरकत नाही.

आपण आज संगणक युगात वावरतो आहोत. संगणकाची परिभाषा आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनली आहे. त्यामुळे संगणकाला जसा प्रोग्रॅम किंवा आज्ञावली लागते, तशीच ती जगातील सर्वांत मोठा संगणक असणाऱ्या मानवी मेंदूलाही लागते. आपल्याला हवे तसे मेंदूचेही प्रोग्रॅमिंग केले गेले तर आपले जीवन सुरळीत चालते. समाधान मिळते. हे प्रोग्रॅमिंग नीट झालेले नसेल तर व्हायरस, मालेवअरमुळे फाइल्स करप्ट होतात. मेंदूचे कार्य पूर्ण कार्यक्षमतेने चालत नाही. दु:ख, निराशा, अपमान, आजार, अपेक्षाभंग, अपयश, नुकसान, अपघात हे सर्व आपल्या जीवनात घडतच असते. या सर्वांमुळे हतबल, हताश न होता या सकृत्दर्शनी क्लेशकारक घटनांच्या मागे परमेश्वराची काहीतरी योजना नक्कीच असणार आणि ती आपल्या व्यापक हिताची असणार, आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या आणि कर्तृत्वाच्या क्षमता वाढविण्यासाठी असणार असा दृढ विश्वास मनोमन बाळगला तर सगळी दु:खे, सगळ्या वेदना सुसह्य होतात आणि त्या प्रत्येक त्रासाची, नुकसानीची भरपाई विश्वात्मक शक्तीकडून अनेक

पटींनी होते, अशी श्रद्धा हवी. पूर्वी आपण सद्‌गुण उत्तम संस्कार, सम्यक् व्यवहार, स्थितप्रज्ञ वृत्ती, फलाशा न धरता कर्म करीत राहण्याची मनोधारणा, यांचा आग्रह धरत होतो. जे काही घडले ते चांगल्याकरिताच असा विश्वास बाळगत होतो. आपल्या स्थानपरत्वे कर्तव्याबद्दल जागरूक राहत होतो, ते खऱ्या अर्थाने ब्रेन प्रोग्रॅमिंगच होते. हेच आधुनिक परिभाषेत 'ब्रेन प्रोग्रॅमिंग' या पुस्तकात विस्तारपूर्वक दाखवण्यात आले आहे.

ब्रेन प्रोग्रॅमिंग म्हणजे आपण आपल्या मेंदूला कार्यक्रम देणे. आज्ञावली देणे.

हा कार्यक्रम मेंदूला, म्हणजे मनाला, म्हणजे अंतर्मनाला मिळतो आणि त्याचा प्रभाव आपल्या प्रत्येक कृतीवर प्रत्येक विचारावर पडतो. ''आपल्या मनाच्या सृष्टीत यश, सुख, आरोग्य, नवनिर्मिती, सृजन-रंजन यांच्यात जोडीने दु:ख, आजार, विनाश, अपघात, नुकसान, दुर्दैव हे प्रथम जन्माला येतात आणि नंतरच अस्तित्व धारण करतात.'' हे नीट लक्षात घेतले तर आपली मानसिकता नव्या कल्पनांबाबत स्वागतशील होईल. त्यासाठी आणखीही काही मुलभूत मुद्दे लक्षात ठेवायला हवेत.

१. आपल्या जीवनातील सर्व अनुभवांना आपण स्वत:च जबाबदार असतो. दुसऱ्या कोणावर दोषारोप करणे चूक असते.

२. आपल्या मनातला प्रत्येक विचार हा आपलं भविष्य घडवतो.

३. खरी शक्ती ही नेहमी आताच्या, चालू क्षणात असते.

४. आपला मेंदू म्हणजे जगातील सर्वात श्रेष्ठ आणि विलक्षण कंप्यूटर असतो.

५. मेंदूचे काम कसे चालते हे समजावून घेतले तर माहितीचे ग्रहण, माहितीचा संचय, माहितीचा वापर, वर्तन, विचार आणि भावना यांचे नियंत्रण हे लक्षात येते.

६. मेंदूचे, मनाचे आणि अंतर्मनाचे प्रोग्रॅमिंग कोणत्या भाषेत, कोणत्या शब्दांत करायचे याचे सॉफ्टवेअर रेडी झाले म्हणजे तुमच्या कंप्युटरला फीड केलेली माहिती योग्य प्रकारे प्रोसेस होऊन हवी तेव्हा अंतर्मनाच्या हार्ड डिस्कमधून बाह्य मनात येते आणि तुम्ही कळत नकळत ती अंमलात आणू लागता. बाह्यमनात तुम्ही काहीही ठरवले तरी त्याला अंतर्मनाची साथ मिळाल्यावरच कृती घडते. तशी अंतर्मनाची साथ न मिळाली तर तुमचे वर्तन, विचार, भावना यांचे जुन्या चुकीच्या पद्धतीनेच काम चालते आणि यशाचा फॉर्म्युला ठाऊक असूनही त्याचा वापर केला जात नाही. आत्मविकासाची किल्ली हातात असूनही यशाचे कुलूप उघडता येत नाही.

७. ब्रेन प्रोग्रॅमिंगमुळे मनातच नव्हेतर शरीरातही विशिष्ट बदल होतो. प्रतिक्रियांमध्ये फरक पडतो.

८. आत्मविकास साधायचा असेल तर ब्रेन प्रोग्रॅम बदला. नाहीतर सारं पालथ्या घड्यावर पाणी.

९. प्रत्येक माणूस आपल्या ब्रेन प्रोग्रॅमिंगशी सुसंगत असाच वागतो. विसंगत वागू शकत नाही.

१०. हे ब्रेन प्रोग्रॅमिंग चुकीचे, नकारात्मक, खोटे किंवा बरोबर, सकारात्मक, खरे - असू शकते. शेकडा ९० टक्के लोक बहुतेक वेळा चुकीचे ब्रेन प्रोग्रॅमिंग घेऊनच वावरतात आणि अपयशी, दु:खी जीवन जगतात.

**११. योग्य ब्रेन प्रोग्रॅमिंगचा पाया म्हणजे स्वत:वर शहाणे प्रेम करायला शिकणे स्वत:ची आत्मप्रतिमा सकारात्मक करणे.**

१२. ब्रेन प्रोग्रॅमिंग म्हणजे विशिष्ट बाबतीसंदर्भातील आपली स्वत:ची समज किंवा धारणा. स्वत: इतर व्यक्ती आणि परिस्थिती याबाबत आपले बरेवाईट अनुभव आणि अन्य लोकांचे वर्तन याबाबत मनोमन रूजलेले ठोकताळे किंवा आडाखे.

१३. ब्रेन प्रोग्रॅमिंग विशिष्ट पद्धतीने किंवा युक्तिप्रयुक्तीने बदलणे शक्य असते. आपण जिंकणार, आपण विजयी होणार या कल्पनेने भारलेले असाल तर अभ्यास, खेळ, परीक्षा, व्यवसाय, स्पर्धा, नोकरी, परस्पर संबंध या सर्व बाबतीत यश मिळू शकते, असा विश्वास वाटण्यासाठी तसे ब्रेन प्रोग्रॅमिंग हवे.

१४. ब्रेन प्रोग्रॅमिंग म्हणजे स्वत:चा स्वत:शीच संवाद. प्रत्येक प्रयत्नाचा शेवट म्हणजे यश. जोपर्यंत यश लाभत नाही तोपर्यंत प्रयत्नाचा शेवट झाला असे मानता कामा नये.

१५. मर्यादांचा व्हायरस लागला की कितीही चांगला प्रोग्रॅम असला तरी तो रन होणार नाही. मी बुद्दू आहे, माझं नशीबच फुटकं आहे. मला धंद्यात यश नाही. मला कधीच कुठली गोष्ट सहजपणे सुखाने मिळत नाही. अशी विधाने करणारे मर्यादांचा विषाणू सतत जोपासत असतात.

१६. प्रोग्रॅमिंग करताना नकारात्मक गोष्टी शोधून डिलिट करा, सकारात्मक गोष्टी आवर्जून वापरा आणि मन शुद्ध ठेवून होणाऱ्या सकारात्मक प्रोग्रॅमिंगसाठी आवाहन करा. आपल्या अंतर्मनाच्या हार्ड डिस्कवर विविध अनुभव, विविध प्रोग्रॅम्स पद्धतशीरपणे स्टोअर केलेले आहेत. आपलं अंतर्मन काहीही विसरत नाही.

१७. वैश्विक मनाच्या महासंगणकाला आपण जोडलेले हवे. निसर्गदत्त उत्पादक यंत्रणेशी शुद्ध मनाचे नाते अधिक दृढ असते. शांत, शुचिर्भूत, मोकळे मन असेल तर देवदत्त उत्पादक यंत्रणांशी संवाद साधता येईल. समस्यांची उत्तरे सापडतील. यशाची दारे खुली होतील.

**१८. तुमचा मेंदू आणि ज्ञानतंतूंचे जाळे यांना प्रत्यक्ष अनुभव आणि कल्पनेने घेतलेला अनुभव यातला फरक अजिबात कळत नाही. त्यामुळे आपण कळत नकळत संमोहित होत राहतो. हिप्नॉटाइज होत राहतो. काल्पनिक अनुभवांनी भारावून जातो. काल्पनिक अनुभवालाच वास्तव मानत राहतो.**

१९. सर्वसामान्य माणसं होईल तसं ब्रेन प्रोग्रॅमिंग स्वीकारत जातात आणि त्या प्रोग्रॅमिंगनुसार घडेल ते जीवनही स्वीकारतात. सुज्ञ शहाणी माणसं कल्पनेचा हा खेळ आपल्याला हवा तसा खेळून पॉझिटिव्ह ब्रेन प्रोग्रॅमिंग करून घेतात. त्यामुळे ते आपल्या जीवनाचे स्वत:च शिल्पकार होतात.

२०. यशस्वी आणि सुखी होण्यासाठी सकारात्मक ब्रेन प्रोग्रॅमिंग व्हावं लागतं. श्रवण, वाचन, दर्शन यातून काल्पनिक किंवा सत्य अनुभव आणि त्याविषयी मनात चालणारा संवाद यातून ब्रेन प्रोग्रॅमिंग होत राहते. हे काम २४ तास चालूच असते.

२१. तुम्ही ब्रेन प्रोग्रॅमिंगची कला आत्मसात करू शकता. त्यासाठी उदाहणं, तत्त्वं, त्यामागचं मानसशास्त्र समजावून घेणं आवश्यक आहे.

२२. ब्रेन प्रोग्रॅमिंगचा खेळ तुम्ही स्वत:च खेळायचा आहे हा खेळ वास्तव हवा. तपशीलवार हवा. तो अनुभव तुमच्या पंचेंद्रियांनी घेतलेला हवा. दृष्टी, श्रवण, स्पर्श, गंध, रुची सर्वांचा प्रत्यक्ष अनुभव हवा. तो केवळ कल्पनेतला शेख महमदी दिवास्वप्नासारखा प्रकार नसावा.

**२३. उत्तम ब्रेन प्रोग्रॅमिंगमुळे हे 'तुमच्या अंतर्मनात होत असल्याने तुम्ही सुपरमॅन सारखे सामर्थ्यशाली होऊ शकता. अंतर्मनाचा संबंध हा वैश्विक शक्तीशी असतो. त्यामुळेच चमत्कार वाटाव्या अशा आश्चर्यकारक गोष्टी घडतात.**

२४. प्रत्यक्षजीवनानुभवातून जाताना आपण जो सुसंवाद साधतो, त्यातून तर ब्रेन प्रोग्रॅमिंग हे होतेच, तसेच ते केवळ कल्पनेतून घेतलेल्या उत्कट अनुभवातूनही होते. मेंदूला प्रत्यक्ष अनुभव आणि कल्पनारम्य अनुभव यातला फरक कळत नाही या वैशिष्ट्याचा हा परिणाम असतो.

२५. सकारात्मक अनुभवाप्रमाणेच नकारात्मक अनुभवाच्या तीव्र तिरस्कारातूनही पॉवरफुल पॉझिटिव्ह ब्रेन प्रोग्रॅमिंग होते. नाटक, सिनेमा, चित्रपट, कादंबरी, कथा यामुळे संपूर्ण समाज भारावून जातो. हे देखील सामाजिक ब्रेन प्रोग्रॅमिंगचेच एक उदाहरण आहे.

२६. निगेटिव्ह ब्रेन प्रोग्रॅमिंगपासून स्वत:ला वाचवा; वाईट गोष्टींना चालना देणाऱ्या घटकांचा तिरस्कार करा; जे जे उत्तम, उदात्त, उन्नत आहे त्याद्वारे सकारात्मक ब्रेन प्रोग्रॅमिंग साधण्याची साधना करा. केवळ तशी इच्छा करून थांबू नका.

२७. नाटकाची जशी रंगीत तालीम करतात, तशी रंगीत तालीम परीक्षा, न्यूनगंड, अपघात, स्पर्धा, मोठा आजार यांच्या भयभीतीतून बाहेर पडण्यासाठी, लवकर बरे होण्यासाठी, मनोबल वाढवण्यासाठी करा. वेळेच्या नियोजनासाठीही रंगीत तालीम उपयुक्त ठरते.

२८. पॉझिटिव्ह ब्रेन प्रोग्रॅमिंगसाठी मनाची पाटी कोरी हवी. त्यासाठी कल्पनाशक्तीची

मदत घ्या, इच्छाशक्तीची मदत अजिबात घेऊ नका. तुम्हाला भेडसावणारी जी समस्या असेल ती समस्या एका कागदावर लिहा. तिच्याखाली त्या समस्येवरचे उपाय लिहा. उपाय बरोबर की चूक याबद्दल खल करीत बसू नका. या उपायांपैकी कुठला आपल्याला सोयीचा आहे याचा निर्णय अंतर्मनात उगम पावणारी कल्पनाशक्ती करील; मात्र समस्येचा कोणताही ताण मनावर येऊ देऊ नका. ताणवरहित स्वच्छ, शुद्ध मन ही पहिली पायरी समजा.

२९. विश्वशक्तीशी जोडल्या गेलेल्या अंतर्मनाच्या मदतीमुळे तुम्हाला मार्ग दिसेल यावर विश्वास ठेवा.

३०. आपण ज्या नजरेने पाहतो, ते आपल्याला दिसते वा अनुभवाला येते. आपल्या जीवनात आपण स्वत: अन्य व्यक्ती आणि परिस्थिती या तीनच गोष्टी असतात. या तीन गोष्टींना त्या त्या काळाचा संदर्भ असतो. त्यामुळे जीवनानुभवाचे स्वरूप मनावर कोरले जाते. आपले बालपण खूप कष्टमय गेले असेल. त्याच्या कडवट आठवणींची सारखी टकळी वाजवत राहिला तर त्या दु:खाची व्याप्ती वाढतच राहील. त्याचा ताण मनावर येईल. रक्तदाब वाढेल. त्याऐवजी बालपणातील काही आनंदाचे क्षण आठवून अरे, त्यावेळी खूप मजा होती असे ब्रेन प्रोग्रॅमिंग केले तर दु:खाचे जुने प्रोग्रॅमिंग डिलिट होईल आणि दु:खातूनही शहाणपण मिळेल, त्यामुळे पुढचे जीवन सुखावह झाले, बालपण आनंदाचे ठरले असे नवे प्रोग्रॅमिंग कुरघोडी करील. त्यातून तुमचे आत्मबळ वाढेल.

३१. स्वत:शी साधलेला संवाद, स्वत:ला दिलेले सकारात्मक इशारे, स्वयंसूचना यातून ब्रेन प्रोग्रॅमिंग होत जाते. ते तुमचे जीवन आणि नशीब बदलू शकते. म्हणून जे आपल्याला हवेसे वाटते ते सतत स्वत:शी बोलत रहा. नकारात्मक, निराशात्मक विचारांचं तण मुळासकट उपटून टाका, नाहीतर तेही फोफावेल. सकारात्मक विचारांची पेरणी करा. त्यांची मशागत करा.

३२. नकारात्मक विधाने उलट करून सकारात्मक बनवा. उदा. माझे मित्र मला नेहमी फसवतात. उलट विचार - मी कोणाला फसवत नाही. मी इतरांकडून फसवून घेत नाही. तेवढे चातुर्य माझ्यात आहे. मी हितैषी व्यक्तींशीच मैत्री करतो.

३३. निस्सीम श्रद्धा आणि उत्कट विश्वास यांच्याद्वारे तुमचे ब्रेन प्रोग्रॅमिंग होत असते. **तुमची श्रद्धा असेल अशी परिस्थिती, माणसे आणि स्वत:चे वर्तन तुम्ही आकृष्ट करता. तुमच्या श्रद्धेला विश्वासाला अस्तित्व येते.**

३४. दु:ख, निराशा, अपमान, आजार, अपयश यामागे काहीतरी परमेश्वरी योजना असते. त्यातून माझा नक्की फायदा होणार असतो परमेश्वर करतो ते माझ्या भल्यासाठीच अशी माझी श्रद्धा आहे. **दारिद्र्य, दु:ख, निराशा यांचा मी स्वीकार करून शांतपणे त्या भोगतो. तेव्हा या त्रासाची, दु:खाची भरपाई वैश्विक**

**शक्तीकडून अनेक प्रकारे होते अशी श्रद्धा हवी.**

३५. विशिष्ट व्यक्तीवरचा आपला विश्वास हे पॉझिटिव्ह ब्रेन प्रोग्रॅमिंग असते. त्या योगे आपले जगणे, सोपे व सुसह्य होते. पॉझिटिव्ह प्रोग्रॅम वाढवण्यासाठी अनेक समानधर्म्यांशी संपर्क ठेवा.

३६. श्रद्धा आणि विश्वास हा ब्रेन प्रोग्रॅमिंगचा पाया आहे. श्रद्धा चूक वा बरोबर याचा खल करीत बसू नका जोपर्यंत ती श्रद्धा त्या व्यक्तीबाबत अंतर्यामी खरी असते तोपर्यंत ती सकारात्मक ब्रेन प्रोग्रॅमिंगचा फायदा करून देतेच. बुवा, ताइत, अंगारा काम करीत नाहीत, तर श्रद्धा काम करते.

३७. मूर्ती, प्रतीके, स्तोत्रे हे सगळे प्रोग्रॅम्सचे पासवर्ड होत. हे प्रोग्रॅम्स वर्षानुवर्षे मेंदूत स्थिरवलेले असतात.

३८. ब्रेन प्रोग्रॅम्स सेव्ह होण्यासाठी दृढ विश्वास, उत्कट श्रद्धा हवी. त्यासाठी विचार, भावना, वर्तन यांच्या परिणामांची निश्चिती हवी. ज्याचे परिणाम विचार, भावना, वर्तन याद्वारे त्रासदायक वाटतात. तेथे तुमचे ब्रेन प्रोग्रॅमिंग चुकीचे आहे असे समजा.

३९. पॉझिटिव्ह प्रोग्रॅमिंगसाठी कष्ट, प्रयत्न करावे लागतात; पण निगेटिव्ह ब्रेन प्रोग्रॅमिंग मात्र विनासायास, आपोआप, अल्प प्रयत्नात होत राहते आणि ते तितकेच पॉवरफुल असते. हा मानवी मनाचा सहजधर्म आहे.

४०. अंतर्मनातून आपण वैश्विक शक्तींशी जोडले गेलेले असतो. हा संपर्क जेवढा घनिष्ठ, तेवढा तुम्हाला हवे ते मिळण्याचा संभव जास्त. अंतर्मनातल्या श्रद्धा, विश्वास यांना अनुसरून घटना, प्रसंग, व्यक्ती परिस्थिती आपण आकर्षित करीत असतो.

४१. आपल्याला जे सुख, आनंद किंवा यश, दु:ख, नैराश्य मिळते ते आपण आपल्या ब्रेन प्रोग्रॅमिंगनुसार आकर्षित केलेले असते.

४२. सुयोग्य ब्रेन प्रोग्रॅमिंगमुळे हवी ती गोष्ट आपण मिळवू शकता. सुख, आरोग्य, धनसंपदा, व्याधींपासून मुक्ती, व्यक्तिमत्त्वातील बदल, इतर व्यक्तींमधील बदल इत्यादी. आपल्याला आपले ब्रेन प्रोग्रॅमिंग बदलता येतो. याची कल्पना अनेक जणांना नसते. त्यामुळे ते चुकीच्या प्रोग्रॅमिंगमध्येच घुटमळत जगतात.

४३. **कार्ल युंग हा मानसशास्त्रज्ञ म्हणतो, ''ज्या गोष्टीला तुम्ही विरोध करता, ती गोष्ट टिकून राहते.''** उदाहरणार्थ दारिद्र्य, कॅन्सर, युद्ध, व्यसन यांच्याशी आपण लढत राहायचं असं चुकीचं ब्रेन प्रोग्रॅमिंग झालेले असते; त्यामुळे आपल्या जीवनात नकारात्मक गोष्टी आणि संघर्ष येतच राहतात. **युद्धविरोधी मोहिमांमुळे जास्त युद्धे होतात. मादक द्रव्य सेवनविरोधी मोहिमेमुळे जास्त ड्रग ॲडिक्टस निर्माण होतात.**

४५. तुम्ही जर युद्धविरोधी असला तर युद्धाऐवजी शांततेचे समर्थक बनून शांततेचा ध्यास घ्या. सकारात्मक मानस प्रतिमा अंतर्मनाकडे प्रक्षेपित करा. विश्व शांतीचा ध्यास घेऊन तसे ब्रेन प्रोग्रॅमिंग केले तर विश्वशक्ती तुमच्या अंतर्मनातून मार्गदर्शन करून तुमचे काम करील.

**४६. आपल्या आसपासचे लोक किंवा जग बदलणे हे आपले काम नाही. तेवढे सामर्थ्यही आपल्या हातात नाही.** वैश्विक शक्तींच्या प्रवाहासोबत वाहत राहणे आणि असे जगताना सकारात्मक मानसप्रतिनिधींनी भावनांनी आंतरिक जगात जीवनाचा महोत्सव साजरा करणे. **वैश्विक शक्तींना जोडलेले तुमचे अंतर्मन निसर्गतः तुमच्या जीवनात आनंद, आरोग्य, सुख, शांती, समृद्धी, यश आणत असते.**

४७. तुम्हाला हव्या असलेल्या गोष्टींविषयीचे विचार मनात आणा. या गोष्टी तुम्हाला मिळालेल्याच आहेत, असा भावपूर्ण अनुभव घ्या. त्याबद्दल कृतज्ञता बाळगा. **मला जे हवं आहे ते मला मिळणारच आहे. हा विश्वशक्तीवरील विश्वास व निष्ठा म्हणजे ब्रेन प्रोग्रॅमिंगच्या भाषेची लिपी आहे.**

४८. ज्या गोष्टी तुमच्या मनाप्रमाणे घडत नसतील त्याबद्दल कोणाला दोष देण्यात, तक्रार करण्यात किंवा नकारात्मक भावना दर्शविण्यात तुमचा वेळ आणि शक्ती खर्च करू नका. आवडणाऱ्या प्रत्येक गोष्टीला कवेत घ्या. झप्पी द्या. जे जे उदात उत्तम ते मन:पटलावर चित्रित करा. पहा. तुम्हाला आपोआप आणखी अशा गोष्टी मिळत जातील. कृतज्ञता वैश्विक शक्तींना प्रोत्साहित करते. सहकार्य देण्यास भाग पडते.

४९. विचारांना अस्तित्व येते. तुमच्या मनातील विचार आणि भावना, तुमच्या जीवनातील वस्तू, व्यक्ती, घटना, परिस्थिती यांना आकर्षित करतात. म्हणून जे हवं तेच बोला. जे हवं त्याचाच विचार मनात आणा.

५०. आपल्या मेंदूचा डावा भाग हा बाह्यमनाशी आणि तर्क, गणित या बौद्धिक शक्तींशी संबंधित असतो आणि उजवा भाग हा अंतर्मनाशी, कल्पनाशक्तीशी, अंत:प्रेरणेशी, कलाप्रेरणेशी संबंधित असतो. कल्पनाशक्ती ही मानवाला मिळालेली एक अमोघ देणगी आहे. कलावंत आणि शास्त्रज्ञ यांनी नव्यातल्या निर्मितीच्या मानस प्रतिमा आपल्या मनात रंगवल्या आणि त्या अंतर्मनाद्वारे, वैश्विक शक्तींद्वारे कार्यान्वित करून अस्तित्वात आणल्या. म्हणजेच मानसप्रतिमांनी ब्रेन प्रोग्रॅमिंग होते. कल्पना शक्तीमुळेच मानव जातीचा विकास झाला आहे. कल्पनाशक्तीच सर्व काही आहे. कर्ती-करविती 'कल्पना' ही जीवनातल्या आगामी आकर्षणाचं पूर्वदर्शन आहे. आपल्याला उत्कटपणे जे जे हवेसे वाटते, ते ते ती मिळवून देते.

या सूत्रांच्या अनुरोधाने डॉ. रमा मराठे यांनी आपल्या ब्रेन प्रोग्रॅमिंग या संकल्पनेची

उभारणी केली आहे. शक्य तेथे उदाहरणे, दृष्टान्त देऊन स्पष्टीकरण केले आहे. दि सिक्रेट, अलकेमिस्ट, वगैरे पुस्तकांकडून मांडलेल्या जीवनविषयक सिद्धांतांचा आधार घेत आपल्या युक्तिवादाची मांडणी केली आहे.

शेवटी, सकारात्मक ब्रेन प्रोग्रॅमिंगसाठी वापरायचे सॉफ्टवेअर आणि त्याची भाषा यांच्याइतकाच अँटिव्हायरस प्रोग्रॅम महत्त्वाचा असे सांगून प्रेम, कृतज्ञता आणि स्वीकार या तीन मोड्युल्सचे विवेचन केले आहे.

प्रेम करा, प्रेमाची लयलूट करा, प्रेम वाटत सुटा.

सर्वात आधी स्वत:वर प्रेम करा. माणूस म्हणून जन्म मिळाला, जगायला मिळाले, पुरुष असल्याबद्दल, स्त्री असल्याबद्दल, जिवंत असल्याबद्दल कृतज्ञता प्रकट करा. स्वत:चा, इतरांचा आणि परिस्थितीचा बिनशर्त स्वीकार करा. अविवेकामुळे जोपर्यंत स्वीकार करीत नाही तोपर्यंत दु:ख, नैराश्य, वेदना, यापासून मुक्तता मिळणार नाही. नकारात्मक ब्रेन प्रोग्रॅमिंग टळणार नाही. स्वीकार करा. जीवन सुखाने ओतप्रोत भरून जाईल.

प्रत्येक माणूस म्हणजे एक चालतं बोलतं दुकान. पण दुकानावर बोर्ड नाही. माल झाकून ठेवलेला. तेथे होणारा सौदा पैशांनी होत नाही. तर परस्पर देवघेवीने, सहमतीने होतो.

माणसं अगणित आहेत. तुम्हाला जे हवं ते देणारा कोणीतरी भेटेलच. तुमच्याजवळ जे आहे ते घेणारा कोणीतरी मिळेलच. सुखाचे सौदे होत राहतील.

प्रेम कृतज्ञता, स्वीकार याद्वारे सकारात्मक ब्रेन प्रोग्रॅमिंग आपोआप होऊ लागेल.

आपल्या मनात, अंतर्मनात हे पुस्तक खूप काही परिवर्तन घडवून आणील. नक्की! ❐

**किंमत : १५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**

**वाचकमित्रहो,**

**आपल्या** अखंड प्रेमामुळे **'मेहता मराठी ग्रंथजगत'** हे वाङ्‌मयीन मासिक चांगलेच लोकप्रिय झाले आहे. या अंकातील 'वाचकांचा प्रतिसाद' या सदरासाठी आपण 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वाचलेल्या पुस्तकांविषयी प्रतिक्रिया जरुर कळवाव्या.

पत्ता : मेहता पब्लिशिंग हाऊस, द्वारा-मेहता मराठी ग्रंथजगत, १९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३०.

**नवे कोरे**

# शास्त्रज्ञांचे जग

**निरंजन घाटे**




**२००रु. पोस्टेज २५रु.**

आपण बऱ्याचदा कुणाकडूनतरी स्फूर्ती घेतो. ही स्फूर्तिस्थाने प्रत्येकाच्या बाबतीत वेगवेगळी असतात. विज्ञानक्षेत्रातल्या व्यक्तींच्या दृष्टीने वेगवेगळे शास्त्रज्ञ हेच इतर वैज्ञानिकांचे स्फूर्तिदाते असतात. शास्त्रज्ञांचे वर्णन करायचे तर आपल्या मंद प्रकाशाने तेवत राहणाऱ्या या ज्योती पुढच्या अनेक पिढ्यांना वाट दाखवत राहतात.

या पुस्तकात केवळ शास्त्रज्ञांचीच चरित्रे आहेत असे नाही, तर काही विज्ञानलेखकांच्या चरित्रांचासुद्धा यात समावेश आहे, कारण त्यांच्या लेखनाने अनेक तरुणांना विज्ञानक्षेत्राकडे आकर्षित केले आहे. हे पुस्तक माझ्या वाचकांना आवडेल अशी मला खात्री वाटते.

# पुस्तक परिचय

**सत्य ही कोणतीही घटना नाही. जीवन आहे तोपर्यंत सत्याचे विविध आविष्कार होत राहणार!**
**रेखा बैजल यांची रूपककथा**

# अज्ञेय




**रेखा बैजल**

रेखा बैजल यांची अज्ञेय ही नवी कादंबरी. द. अलकेमिस्ट, लव्ह स्टोरी, जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल या रूपककथांच्या घाटणीची आहे.

ही कादंबरी चिंतनात्मक आहे. मानवी जीवन, स्वप्न, सत्य, नवनिर्मिती, देह आणि श्रेय, जीवनाचे ध्येय आणि त्याची प्राप्ती, निसर्गशक्ती आणि ऐहिक आसक्ती, कल्पप्रदेशाची ओढ आणि अमर्याद, अनाकलनीय विश्वाचे आकलन अशा गूढ, तरल, अंतर्वेधक विषयांचा परामर्श या चर्चात्मक कथेतून होतो. ही एक प्रवासकथा आहे. पाच वेगवेगळ्या प्रवृत्तींचे प्रवासी योगायोगाने एकत्र येतात.

सहा प्रवाशांना नदीपलीकडे पोचवून पुढच्या प्रवासाला मदत करणे हे काम एका नावाड्यावर सोपवले जाते. तसा संदेश त्याला मनोमन मिळतो. तो नदीवर जाऊन नाव सज्ज करून प्रवाशांची वाट बघत थांबतो. पूर्वसंकेताप्रमाणे पाच प्रवासी येतात. सहावा नंतर येईल असे गृहीत धरून नौकेचा प्रवास सुरू होतो.

चित्रकार **चेतन**, परीक्षाची आकांक्षा बाळगणारा **कांचन**, स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घेऊन मुक्तीची आकांक्षा बाळगणारी **धारिणी**, उकिरड्यावर जन्मलेला आईवडिलांना नकोसा असलेला एकाकी वाढलेला **नकुल**, आणि प्रवासात खूप गंमत असते असे मानणारी स्वच्छंदी **सखी** - या पाचही जणांची स्वप्ने वेगवेगळी आहेत आणि आयुष्याकडे पाहण्याची दृष्टी भिन्नविभिन्न आहे.

नावाडी **अभिमन्यू** हाही आधी नावाडी आणि नंतर वाटाड्या म्हणून बरोबर असतो. तोच उर्वरित सहावा प्रवासी अशी शेवटी सर्वांना प्रचिती येते. तो स्वत:ही म्हणतो, ''मी वाटाड्या का झालो असा प्रश्न मला आजवर पडत होता. पण आज कळलं. तो सहावा प्रवासी मी आहे. तो माझ्याच मनात येऊन ठेपला. मी स्वप्न न पाहताही परमेश्वरानं मला आपण होऊन स्वप्न दिले. ज्या वाटा इतरांना दिसत नव्हत्या. त्या मला दिसत होत्या. न मागता हे स्वप्न सत्याच्या रूपानं माझ्या ओंजळीत घातले. ती क्षमता माझ्यात निर्माण केली.'' (९६)

चित्रकार चेतन हा वृक्षवल्लीची चित्रे काढण्यात रममाण झालेला. त्याला व्यवहारी जगात स्वारस्य नाही. त्याने पोटापुरते तरी मिळवावे ही आईची अपेक्षा. एवढा धट्टाकट्टा तरुण मुलगा निरुद्देश जगतो आहे, यामुळे ती अस्वस्थ आहे. वास्तव जग आणि स्वप्नांचं जग यातलं अंतर चेतनला जणू कळतच नाही. मी कलावंत आहे. हे जग का जाणून घेत नाही असा प्रश्न तो विचारतो. आपले चित्रातले रंग जिवंत व्हावे, आपण चितारलेले झाड, आपण चितारलेले सूर्य जिवंत चैतन्यपूर्ण व्हावे अशी त्याची आकांक्षा असते.

एक बासरीवाला त्याला आपल्या बासरीच्या वादनाने, संगीताने एका नैसर्गिक शक्तीचे परिवर्तन दुसऱ्या असामान्य शक्तीत करून दाखवतो. त्याच्या बासरीच्या सुरांनी झाडे डुलू लागतात. वारा वाहू लागतो. चेतनच्या चित्रातले कोमेजलेले झाड

टवटवीत होते. बासरीवाला सांगतो; तुझ्यात, तुझ्या रंगरूपात परमेश्वर आहे. तुझी चित्रे, माझे सूर ह्या त्याच्या पाऊलखुणा आहेत. या क्षमतेला फुलवावे लागते. जे स्वप्न तू पाहतो आहेस त्या दिशेला जा. स्वप्नं आपल्या पायाला, मनाला, जीवनाला गती देतात ती गती सार्थ बिंदूशी थांबते, ते सत्य? स्वप्न सत्यात परावर्तित होते. प्रत्येकाला आपापल्या क्षमतेच्या बिंदूपाशी साथ गवसते. ह्या मुर्दाड गावात बसून, मनाशी झुरत राहून काही होणार नाही.''

चेतनला बासरीवादनाच्या प्रभावाने आश्चर्य वाटते.

तो विचारतो, ''स्वप्नापर्यंत कसं जायचं?''

''तो एका नदीपलीकडचा प्रवास आहे. ती एक अवघड पण आनंददायी वाट असते... स्वप्नाचं रूपांतर सत्यात करणारी! एकदा ते झालं की तू अशी कोमेजलेली झाडं चितारणार नाहीस.''

''हा प्रदेश कुठं आहे?''

''उत्तरेच्या दिशेने गेल्यावर एक नदी आहे. ती ओलांडल्यावर आपल्या स्वप्न प्रदेशाची वाट सुरू होते.''

''ह्या प्रवासासाठी एखादा चांगला मुहूर्त पहावा लागेल?''

''नाही. हे आत्मिक काम आहे. ज्या क्षणी मनात इच्छा निर्माण झाली आणि आत्म्यानं हुंकार दिला; तो क्षण मुहूर्ताचा. तो क्षण साधा.''

''मला तर आत्ताच जावंसं वाटतं. पण ती नदी - ? बरोबर न्यायचे सामान? कपडे?''

''तर मग नीघ. नदी तर ओलांडण्यासाठीच असते. बरोबर सामान, कपडे-काही गरज नाही. अज्ञात प्रवासात झोकून दे स्वत:ला. तो प्रवास सारं काही देईल तुला.''

चेतन घरी जाऊन आईला हे सर्व सांगतो. ती आडवू पाहते. पण त्याचा निर्धार पक्का असतो. तो घराचा उंबरा ओलांडतो.

तो बासरीवाला त्याला दिशा दाखवतो.

घनदाट अरण्य पार केल्यावर नदी लागते. तीरावर नाव असते. तिच्यात आधीच तीन जण असतात. नावाडी त्याचे स्वागत करतो. ''अरे ये ना; ही नाव तुझी वाट बघतेय.''

त्या तीन प्रवाशांकडे तो पाहतो. चित्रकार चेतन. निष्कांचन कांचन आणि धारिणी.

पंचविशीची तरुणी धारिणी म्हणते. ''मी माझं स्त्रीत्व कधीच आपलं मानलं नाही. स्त्रीत्वाचा तसा मी तिरस्कारच करते. **मला मुक्त होऊन व्यक्ती म्हणून हे जीवन जगायचे आहे. हे स्त्रीत्व मला केवळ एक वस्त्र वाटते. मला अर्थपूर्ण**

**जगायचं आहे. मला माझ्या अस्तित्वाचा शोध घ्यायचा आहे.''** धारिणी आपले उद्दिष्ट स्पष्ट करते.

प्रवाशांपैकी दुसरा कांचन. तो म्हणतो, ''माझं आजवरचं आयुष्य दारिद्र्यात गेलं - खूप कष्ट केले. पण प्रत्येक वेळी अपयशच पदरी पडलं. दारिद्र्याची अभद्र छाया घरादाराला व्यापून राहिलेली होती. नुकतीच माझी धाकटी बहीण उपासमारीनं गेली. जाण्यापूर्वी ती म्हणाली होती - आपल्याला एक परीस मिळायला हवा होता. तो परीस असता तर सोनेच सोने, पैसाच पैसा जवळ असता. तिच्या निष्पाप निर्व्याज चेहऱ्यातून बहुतेक नियतीच बोलली असावी असे मला वाटते. **मला परीस हवा आहे. परीस मिळवून मला कुटुंबाला वैभवशाली बनवायचे आहे.''**

सखी म्हणते, ''प्रवासात खूप गंमत असते असे मला एकाने सांगितले. म्हणून मी निघाले. ती झाडं, पाण्याचा प्रवाह, पक्ष्यांची भांडणं, किलबिलाट... सारं मला गंमतशीर वाटतं. नावेतले हेलकावे मला गमतीचे वाटतात.

नाव दुसऱ्या किनाऱ्याला लागते.

नावाडी म्हणतो, ''सावकाश उतरा. इथून तुमचा शोधाचा प्रवास सुरू. ही नदी सीमा आहे. आपले विश्व आणि कल्पभूमी यांच्यामधली. आपल्या इच्छेची पूर्तता झाली, आपलं स्वप्न पूर्ण झालं, ते ठिकाण म्हणजे कल्पप्रदेश. तेवढा प्रवास आवश्यक.''

त्यावर चेतन प्रश्न विचारतो, ''नदी ही सीमा कशी मानायची? नदी तर क्षणाक्षणात पुढे जाते आहे. वाहते आहे. मग तिला सीमा कसं मानायचं?''

नावाडी स्पष्टीकरण देतो. ''नदीचा किनारा, तिचा उगम, तिचा प्रवाह, तिचा खळाळ हे सगळं मिळून नदी होते. नदीचा काठ तुटला तर नदी ही नदी राहणार नाही. नदी स्थिर आहे हा भ्रम असेल तर नदी अस्थिर आहे हाही भ्रमच! म्हणून वाहत्या पाण्याकडे दुर्लक्ष करून आपण किनाऱ्यावर विश्वास ठेवायचा. जसं, मृत्यूचा विचार बाजूला ठेवून जीवनावर आपण विश्वास ठेवतो.''

''हा नावाडी काही औरच आहे. कधी स्वत:ला शोधाला बळ देतो. कधी शोध, स्वप्न व्यर्थ असे म्हणतो.''

''आता पुढचा प्रवास पायी. आतापर्यंत मी नावाडी होतो. आता वाटाड्या. माझ्यावर सोपवलेलं हे काम म्हणजे भागधेय. ते त्रास देत नाही.

पुढे जंगल लागतं. प्रवाशांपैकी पाचवा नकुल, तो अचानक पुढं येतो. ''तुझं स्वप्न काय?''

नकुल म्हणतो, ''सांगणं अवघड आहे... पण मला प्रेमाचा शोध आहे.''

नकुलचे जन्मदाते त्याला उकिरड्यावर फेकून देतात. एक कुत्री त्याला दूध

पाजते. एका वाड्याच्या भिंतीबाहेर तो वाढतो. थोडेफार ज्ञान मिळते. प्रेमाशिवाय सर्व काही व्यर्थ असे त्याला वाटते. आपले अनाथपण त्याला सतावते. धारिणी म्हणते, ''अनाथ म्हणून तू आपलं आयुष्य खच्ची, खुजे केले आहेस. अनाथ हे विशेषण विसरून जा. स्वत:चा विकास साध. मी तुझ्याबरोबर आहे.''

जंगलातील फळे-कंदमुळे खाऊन प्रवासी भूक भागवतात. अरण्याचे अलिखित संकेत आत्मसात करतात.

एक आदिवासी जोडपे भेटते. अंगावर वस्त्र नसलेले. त्यांना या प्रवाशांच्या कपड्यांचेच नवल वाटते. ते दचकतात. ती वस्त्रहीन तरुणी म्हणते, ''आमच्यात हे असंच असतं. उघड्या स्तनांचा आकार पाहून किती मुलं होणार, हे कळतं. आम्हाला खूप मुलं हवी असतात.'' निसर्गातून उगवलेली ही आदिवासी माणसं निसर्गासारखं राहणं पसंत करतात.

एक माणूस सोडला तर कुठलाही सजीव प्राणी अंग झाकत नाही.

अरण्यातली पहिली रात्र. कोणी झाडावर चढून बसते.

वाटाड्या अभिमन्यू त्यांच्या संरक्षणासाठी जागा राहतो.

वाघ, साप, श्वापदे यांचा वावर असतो. आदिवासी मुक्त जीवनशैलीची आणखी एक झलक ही या प्रवाशांना बघायला मिळते.

''एक रात्र माझ्याबरोबर काढशील का?'' असं तो आदिवासी तरुण धारिणीला त्याच्या सहचारीच्या माध्यमातून विचारतो. धारिणी नाही म्हणते. तेव्हा ती म्हणते - ''तुझ्या मर्जीपुढे तो जाणार नाही. बरं झालं तू नाही म्हटलेस. मी त्याच्यावर प्रेम करते.'' तो तरुण तिच्यापुढे गुडघे टेकून म्हणतो, ''तुझा नकार मी स्वीकारला आहे. तू मला मातेसारखी आहेस.'' ही जंगलातील सभ्यता बघून सर्वजण थक्क होतात.

त्या जंगलाजवळ असणाऱ्या शहरात जाऊ या असे सखी सुचवते. त्या प्रमाणे शहरात गेल्यावर एका दुकानात सखी बांगड्या घेण्यासाठी जाते. तेव्हा दुकानातला तरुण तिच्याकडे टक लावून बघत राहतो.

त्या दुकानातील तरुणाला तेथील एका संन्याशाने त्याच्या भावी पत्नीचे चित्र दाखवलेले असते. ते चित्र सखीचे असते... ते चित्र बघून सखीलाही आश्चर्य वाटते. सखीला हा दैवी संकेत वाटतो. तिला तिचे स्वप्न पूर्ण झाल्यासारखे वाटते. सखी या नगरात आली नसती तर तिला हा जोडीदार गवसला नसता. कोणताही प्रवास संपत नसतो, तो फक्त वळणे घेत असतो.

ह्या फुलपाखरी पोरीला तिचे स्वप्न गवसले. त्या दुकानदार तरुणाला बाकीचे सहप्रवासी तिला निरोप देऊन पुढे आपल्या मार्गाकडे वळतात. पण त्याआधी अचूक भविष्य सांगणाऱ्या संन्याशाला ते भेटतात.

तो संन्याशी जंगलात राहून पक्ष्यांची भाषा, झाडांची भाषा, वाऱ्याची भाषा जाणू लागतो.

नकुल त्याला विचारतो, ''माझं कोणतं स्वप्न सत्यात येणार आहे?''

संन्याशी त्याला सांगतो, ''स्वप्नाचं भविष्य न सांगण्याचं मला बंधन आहे. पण मी तुला कागदावर ते लिहून देतो. स्वप्न हस्तगत झाल्यावर तू हा कागद उलगडून बघ. त्याआधी नाही. असं वचन मला दे.''

तो संन्याशी धारिणीलाही तिचं भविष्य कागदावर लिहून देतो.

आपण संन्यास का घेतला, हे सांगताना ज्ञानी माणसाला संन्यास घेणे अपरिहार्य - हे तो स्पष्ट करतो.

कुळाचा रक्तांश ही संकल्पना समजावून देत तो म्हणतो, ''आपण कूळ मानतो. रक्ताची नाती खुपदा एकमेकांच्या रक्ताला चटावलेली असतात. संपत्ती, अधिकार, वाटण्या - घर, जात, धर्म, देश यांच्या वाटण्या. म्हणून संन्याशी सगळ्यांपासून दूर होतो. जगण्याचा आणि मृत्यूचा भेद संपवून स्वत:चं श्राद्ध करून कुळाचा संबंध तोडतो. विश्वालाच तो मग कूळ बनवतो. संन्यास म्हणजे केवळ कषाय वस्त्र नव्हे. वृत्तींचा संन्यास असतो. जवळ काही नसेलच तर संन्यास कशापासून घेणार? जगण्याच्या जबरदस्त संचितापासून घेतलेला संन्यासही तेवढाच निग्रही आणि अर्थपूर्ण असतो.''

पुढचा प्रवास अधिक अवघड असतो. सूचिपर्णी झाडांची दाटी, मोठमोठे उंच पहाड.

नंतर एक प्राचीन नगरी लागते. तेथून बर्फाचा प्रदेश सुरू होतो.

तेथे एक भिकारी समोर येतो.

कांचन त्याला आपल्याजवळचे शेवटचे नाणे देतो.

तो भिकारी त्याला एक दगडासारखी वस्तू देऊन म्हणतो, ''ही वस्तू मी तुला भेट देतो. माझा आशीर्वाद समज. तुम्ही सर्वजण कुठं चाललाय?''

''बर्फाच्या प्रदेशात. स्वप्नांच्या शोधात.''

बर्फाच्या प्रदेशातून प्रवास करताना काय काय काळजी घ्यायला हवी ते तो भिकारी सांगतो. आपली पूर्वकहाणीही सांगतो. फाटके कपडे हा त्याचा मुखवटा आहे हे प्रवाशांच्या लक्षात येते. भिकारी, वेडा, संन्याशी यांना कुणी प्रश्न विचारत नाही. म्हणून हा वेष तो घेतो. केवळ कपड्यावरून किंवा लोकापवादावरून पूर्वग्रह करून घेणे कसे चूक ठरते हेही तो सूचित करतो.

प्रवासात आणखी एक संन्याशी भेटतो. तो त्यांना त्यांच्या स्वप्नाबद्दल विचारतो.

धारिणी म्हणते, ''स्त्रीदेहाचं वस्त्र विसरून मला प्रवास करायचा आहे. प्रत्येक

प्रवासाला काही फलित हवंच असं नाही.''

वाटाड्या अभिमन्यू म्हणतो, ''यांना वाट दाखवून मला काय मिळणार हे मला ठाऊक नाही. मी अंतस्थ हृदयातून आलेली आज्ञा मानून बाहेर पडलो.''

संन्याशी त्यांना तीन स्फटिक देऊन, तुमच्या स्वप्नांची पूर्तता झाल्यावर हे स्फटिक कपाळी लावा असे सांगतो. त्यामुळे तुमची स्वप्ने स्थिर होतील, असेही स्पष्ट करतो.

बर्फाच्या त्या प्रदेशातील थंडी भयंकर. शरीरातील रक्तवाहिन्या जणू गोठत होत्या. चरबीच्या दिव्यांची उष्णता फारच अपुरी होती. कांचनचे ओठ निळे पडू लागले. वाटाड्या धारिणीला म्हणतो, ''कांचनला केवळ तूच वाचवू शकशील... तू तुझं शरीर हे एक वस्त्र मानतेस ना? मग ते आता कांचनवर पांघर. त्या वस्त्राचा विचार करू नको. जिवंत राहणं हीच या क्षणाची सर्वांत मोठी गरज आहे. तीच नैतिकता ठरते. अडखळणारे श्वास नीतिनियमांची पर्वा करीत नाहीत. निसर्गात पशुपक्षी एकमेकांना थंडीपासून, भीतीपासून वाचवण्यासाठी संग करतात. तुला कांचनला जगवावं लागेल.'' कांचन ग्लानीत असतो. अर्धवट बेहोष असतो.

''कांचन, मी आलेय'' म्हणत धारिणी त्याचं अंग वेढून टाकते... दुसऱ्या दिवशी कांचन तिची क्षमा मागतो. तेव्हा धारिणी त्याची समजूत काढते. ''ती केवळ एक शरीर निगडित घटना होती. तू ती विसरून जा.''

पुढे नकुल हिमदंशाने काळानिळा पडतो. धारिणी त्यालाही जवळ घेते.
नंतर नकुल म्हणतो, ''धारिणी, या क्षणी माझे संपूर्ण शरीर म्हणजे एक देहपात्र झालं आहे. त्याला भरभरून प्रेम मिळालेय. दोन मने, दोन आत्मे एकमेकांना भेटायला आले. अनाथपणाचे विष आता उतरले. मला प्रेम हवे होते ते मला मिळाले. पण तुला अजून प्रवास करावा असे वाटत असेल तर मी तुझ्यासोबत येतो. माझे स्वप्न पूर्ण झाले आहे.''

''माझा प्रवास अजून बाकी आहे. मला अजून काही गवसायचं आहे. तू इथं थांब. माझा प्रवास संपल्यावर मी येथेच तुला भेटेन.''

''नाही धारिणी, या सुखाला मी आता अंतर देणार नाही. जिथे तू, तिथे मी.''

त्या प्रवासात एका अस्वलाच्या पिलाला जन्म देण्यासाठी अस्वलिनीला धारिणी मदत करते. अस्वलीण जन्म देऊन मरते तेव्हा त्या पिलाला ती छातीशी धरते. ऊब देते. मासे खायला घालते. ते पिलू स्वत:च मासे पकडून खाऊ लागते. स्वावलंबी होते तेव्हा ते तिच्यापासून दूर जाते. त्याचवेळी धारिणी गरोदर असल्याचे स्पष्ट होते. त्याच्या पितृत्वाबद्दल चर्चा होते. धारिणी गर्भपाताला नकार देत म्हणते, ''आई होणं हेच माझं सर्वात मोठं स्वप्न होतं.''

बर्फात लोखंडी पहार ठोकताना कांचन त्या भिकाऱ्याने दिलेल्या दगडाचा वापर

करतो; तर ती लोखंडी पहार सोन्याची होऊन जाते. भिकाऱ्याने दिलेला दगड म्हणजे परीस असतो. कांचनचे स्वप्न पूर्ण होते. त्याला वाटाड्या इशारा देतो, ''सोनं हे केवळ विनिमयाचं साधन म्हणून वापर. सोनं हे आयुष्याचं ध्येय होऊ शकत नाही.''

धारिणी नकुलला सांगते, ''आपला प्रवास संपला. आपण परतू या.''

वाटाड्या अभिमन्यूला ती जाता जाता विचारते, ''सगळ्यांना थंडीचा त्रास झाला. तुला नाही...''

''धारिणी, ज्याला इतरांना वाटा दाखवायच्या असतात, त्याला अनेक वाटा स्वत:साठी बंद करायच्या असतात. मी माझ्या आत्म्यातून ऊब मिळवली. नकुलने तुझ्या प्रेमातून मिळवली. स्त्रीच्या सर्व शक्ती तुझ्यात जागृत होवोत.'' अभिमन्यू तिला आशीर्वाद देतो. नकुल धारिणी निरोप घेऊन आपला मार्ग धरतात.

कांचन, चेतन यांनाही कल्पप्रदेश जवळ आल्यासारखा वाटतो. एका पर्वतशिखरावर ते पोचतात. पुढे खोल दरीपलीकडे उंच पर्वत.

ह्याचवेळी खाली भेटलेला संन्याशी तेथे प्रकट होतो. ''अरे, तुमचा प्रवास संपला आहे. मग गोंधळताय का? तुमचे स्फटिक बाहेर काढा. तुमच्या नशिबात काय आहे ते वाचा.''

स्फटिकांची तर अदलाबदल झालेली. एकमेकांच्या स्वप्नांची ओढ वाटून चोरीचा मोह पडलेला.

संन्याशी त्यावर भाष्य करतो. ''तुमचं नशीब तुम्हाला खेळवत असतं. नियती शेवटी योग्य तेच आपल्याला देते. ती जे देते तेच योग्य समजावे. स्फटिक काढून बघा.''

चेतनकडे रंगीत स्फटिक असतो. कांचनच्या स्फटिकात सोन्याचा पर्वत दिसतो.

तो संन्याशी त्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची मोठी दृष्टी देतो.

... परिसानं निर्माण होणारं जड सोनं आणि चेतनला मिळालेलं रंगाचं वरदान यांचे खरे मर्म संन्याशी स्पष्ट करतो. त्यांच्या अहंकाराचा निरास करतो.

याचवेळी संन्याशी आपणाला जाणवलेली काही जीवनसत्ये प्रकट करतो.

सत्याबद्दल तो सांगतो, ''सत्य ही कोणतीही एक घटना नाही. सत्य हे जीवनातून उगवत असल्याने जीवनाप्रमाणे त्याचीही नवनवोन्मेषशाली प्रकृती आहे... मला शाश्वत अशा वैश्विक सत्याजवळ जायचं आहे. माणूस जेव्हा जगाशी संबंध तोडतो, तेव्हा तो विश्वाजवळ जात असतो. गुंत्यातून बाहेर पडलेला माणूस चटकन पाय उचलतो. स्वत:तून आणि स्वत:च्या सर्व पाशातून दूर होणं म्हणजे संन्याशी होणं. तुम्हाला स्वप्नांचा अर्थ कळला. आता आयुष्याचा आणि विश्वाचा अर्थ कळेल. जी स्वप्नं पायाशी जमा होतात आणि प्रवास संपला म्हणतात ती स्वप्नं 'स्वप्नं'

नसतातच. ती केवळ वळणं असतात.''

तो संन्याशी दरीपलीकडे जायला निघतो. खालून येणाऱ्या वाऱ्यामुळे आपले शरीर पेलले जाऊन आपण पलीकडे जाऊ... आयुष्याचं माप पूर्ण भरेल त्यावेळी दरीतून वर येणारा आणि मला तोलणारा वारा थांबेल. त्याखाली मी तयार आहे, असेही तो म्हणतो.

संन्याशी चालू लागतो.

हे तीन प्रवासीही परतीची वाट धरतात. आपल्या जुन्या जीवनाच्या दिशेने.

... या रूपरेखेवरून 'अज्ञेय' ची थोडीफार ओळख होऊ शकेल. जागोजाग प्रवासी आणि इतरेजन यांच्यात होणाऱ्या चर्चामधून अनेक तात्त्विक-आध्यात्मिक संकल्पनांचे वेगवेगळे पैलू प्रकट होत जातात. स्वप्न, सत्य वगैरे कल्पना अधिकाधिक व्यापक होत जातात. आपल्या विचारांना चालना देतात.

या कल्पना काही सुभाषितवजा वाक्यांतून मांडण्याची हौस आणि क्षमता हे रेखा बैजल यांचे एक वैशिष्ट्य आहे.

वाचकांच्या चिंतनाला चालना मिळावी म्हणून अशी काही चमकदार, आशयघन अवतरणे पुढे देत आहे.

* परमेश्वराचं देणं नेहमी अंत:करणानं घ्यावं लागतं आणि द्यावं लागतं. (७)

* परमेश्वर आपल्याला हाकारत असतो. त्या हाकारण्याला आपणच प्रतिसाद द्यायचा असतो. परमेश्वर एखाद्या क्षमतेच्या रूपानं आपल्याला वसत असतो. ह्या क्षमतेला फुलवावं लागतं. (७)

* जे स्वप्न तू पाहतो आहेस त्याच दिशेनं जा. स्वप्नं आपल्या पायांना, मनाला, जीवनाला गती देतात आणि ती गती सार्थक बिंदूशी थांबते, ते सत्य! स्वप्न सत्यात परिवर्तित होतं. (७)

* स्वप्न भिरभिरत असतं. सत्य स्थिर असतं. (८२)

* परमेश्वर काही निरांजनं तयार ठेवत असतो. आपण त्यात ज्योत पेटवायची असते एवढंच! (९)

* स्वत:मधील प्रतिभा तो ओळखून होता, पण तिला एका मोकळ्या असीम प्रदेशात कसं न्यावं हे त्याला कळत नव्हतं. त्याच्यातल्या मनस्वी कलावंताला त्या कलेचा बाजार मांडणं आणि तो बाजार यशस्वी करायला निरनिराळ्या क्लृप्त्या करणं मानवत नव्हतं. (१०)

* आपली ओळख शेवटी या शरीरानं असते. अभौतिक इच्छा, भौतिक शरीर. पण म्हणून भौतिक इच्छांना गौण समजायचं कारण नाही... कोणतीही इच्छा साकारण्याचं माध्यमही शरीर असतं. (१६)

* आपली इच्छाशक्ती हे आपलं फार मोठं सामर्थ्य असते. ती इच्छा आपल्या शरीरातल्या पेशीपेशींना गती देते. आणि ते पेशीपेशींचे एकत्रित सामर्थ्य एकट्या शरीरापेक्षा कितीतरी पटींनी मोठं असतं. (१७)

* माझा प्रवास मनानं मनापर्यंत जाण्यासाठीच होता. मनाच्या अथांग प्रेमात जे समाधान आहे ते मला मिळालं. (८२)

* तुम्ही मला स्त्री समजता, म्हणून मी स्त्री असेन कदाचित्. पण स्वत:ला मी व्यक्ती समजते. आत्मा, मन, इच्छा, स्वप्नं असलेली व्यक्ती. (१८)

* देह हे आत्म्यावरचं वस्त्र असेल तर मला स्त्रीच्या अस्तित्वाचा अर्थ शोधायचा आहे. तो अर्थ हेच माझं स्वप्न असेल. (१०)

* एखाद्या सत्याबद्दल सच्चेपणानं बोलताना दोन माणसं सारखंच बोलणार. काही मुद्दाम, कधी बुद्धी तोकडी पडल्यानं कधी फायद्यासाठी, आपला प्रभाव वाढवायला एकाच सत्याचे उगाचच वेगवेगळे अर्थ लावून वेगवेगळ्या वाटा तयार होत जातात. पूजाशैली किंवा व्यक्तिपूजा. पण खूपदा सत्यही आपल्याला संभ्रमात टाकतं. (२१)

* सत्य संभ्रमात टाकतं नदी स्थिर आहे हा भ्रम असेल तर नदी अस्थिर आहे हा देखील भ्रमच आहे. मग वाहत्या पाण्याकडे दुर्लक्ष करून आपण किनाऱ्यावर विश्वास ठेवायचा. मृत्यूचा विचार बाजूला ठेवून जीवनावर विश्वास ठेवतो, त्याप्रमाणे. (२४)

* आपल्यावर सोपवलेलं काम म्हणजे भागधेय. ते त्रास देत नाही. (२५)

* आपल्याला जंगलाची भीती काढून टाकायची असेल तर आपल्याला जंगलच व्हावं लागेल. (२५)

* ज्याला सावली म्हणजे काय हे माहीत असते त्याला उन्हाचे चटके बसतात. मला सावलीच नव्हती. त्यामुळे चटक्यालाच मी जवळ केले. (३०)

* कितीही वाईट विशेषणं मागे लागली तरी आयुष्य हे आयुष्य असते. ते विशेषणापलीकडे उभं असलेलं. (३५)

* मनात जे शब्द उमटत असतात ते आपल्याला आनंद देणारे असतात. त्यांच्यावर विश्वास ठेव. ते पुन: पुन्हा आठव आणि तसंच घडणार हे मनाशी ठामपणे म्हण. मनाची शक्ती त्या दृष्टीनं प्रवण होते. मनाच्या शक्तीएवढं प्रभावी अन्य काहीही नसतं. (३५)

* मरण माणसाला असतं. स्वप्नांना नाही. शेवटच्या श्वासाक्षणी स्वप्नं अलगद उडून दुसऱ्याच्या हृदयाच्या घरट्यात जाऊन धडधडू लागतात. (४६)

* दंतकथा एखाद्या सत्याला वैश्विक स्तरावर नेण्यासाठी जन्म घेते. ती स्थळ,

काळ, व्यक्तीच्या पलीकडे असते. कारण सत्यही तसंच असतं. सगळ्या पलीकडं. (४६)

* ज्ञान काळाची बंधनं नाहीशी करतं. भूत, वर्तमान, भविष्य यांना मिटवतं. त्यामुळे ज्ञानी माणूस संपर्कात येणाऱ्याचं आयुष्य वाचू शकतो आणि आयुष्य वाचण्याएवढी अवघड गोष्ट दुसरी नसते. (४७)

* माणसाएवढा खोटा प्राणी निसर्गात कुणी नाही. निसर्गानं दिलेल्या सर्व शक्तींचा वापर अधिकार माणसं खोटं वागण्यासाठी करतात. (४७)

* कीर्ती म्हणजे दुसऱ्या माणसाला आपलं नाव माहिती असणं. एकाऐवजी अनेक माणसांना. बस एवढंच! (४७)

* कीर्ती मिळवणारा माणूस कशाना कशाचं भांडवल करत असतो. कुणी दानाचं, कुणी दयेचं, कुणी परोपकाराचं. (४८)

* कीर्ती जेवढी नावासाठी असते, त्याहून कितीतरी अधिक मनासाठी असते. (४७)

* काही मिळवलं की मगच काय मिळवायचं राहिलं आहे ते कळतं. (४९)

* वाट शोधणं सोपं असतं. कारण वाट ही एकमेव असते. पण शब्दांच्या वाटा अवघड असतात. एक शब्द अनेक वाटा दाखवतो आणि त्याची खरीखुरी वाट त्याहूनही वेगळीच असते. (५०)

* दुसऱ्यानं सांगणं ही केवळ माहिती असते. पण जेव्हा ते आपण अनुभवतो, जाणतो तेव्हा ते ज्ञान होतं. (५५)

* हे जीवन निर्माण करणारी पंचमहाभूतं मात्र चैतन्यमयी असूनही अचेतन आहेत. (६०)

* जीवन पणाला लावल्यावर जिवंत राहणं हीच गरज उरते. तीच नैतिकता उरते. तेच सर्वस्व उरते. (७१)

अशा सुभाषित सदृश निरीक्षणांनी या लेखनाची आशयघनता बहुढंगी चिंतनाला प्रवृत्त करते.

एक रूपककथा म्हणून ही कादंबरी चिंतनशील रसिकांचे भावविश्व विशाल व्यापक करील.

❒

**किंमत : १००रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २०रु.**

नवे कोरे




# काठ

लेखक

**डॉ. एस. एल भैरप्पा**

अनुवाद

**उमा वि. कुलकर्णी**

**२५०रु. पोस्टेज २५रु.**

अमृता आणि सोमशेखर यांच्या नात्याच्या माध्यमातून लेखक काही मूलभूत प्रश्न उपस्थित करतो. व्यक्तीला आयुष्यात नक्की काय हवे असते? स्त्री-पुरुषांना परस्परांकडून नक्की काय हवे असते? खरे प्रेम म्हणजे काय? मनोविकारांना आरंभ कसा होतो? अशा प्रकारच्या नात्यांना आपण एका साच्यात किंवा विवाहाच्या चौकटीत बसवू शकतो का? असे असेल, तर मग या नात्यांचे भवितव्य काय?

अशा अनेक मूलभूत प्रश्नांचा विचार करायला लावण्यातच या कादंबरीच्या यशाचे खरे गमक आहे!

# अभिप्राय

## केक कसा तयार करावा ?

केकचं नुसतं नाव ऐकलं तरी तोंडाला पाणी सुटतं! रस्त्यावरून जाताना एखाद्या बेकरीमध्ये केकचे विविध प्रकार पाहिले की तिथून पायच निघत नाहा. पण, आता केक विकत घेण्यासाठी दुकानात जायची गरज नाही. कारण, घरच्या घरी केक तयार करणं सोपं झालं आहे. त्यादृष्टीने बाजारात  केकची रेसिपी असलेली पुस्तकंही उपलब्ध आहेत. पथकन लक्ष वेधून घेणारं त्यापैकीच एक म्हणजे अपर्णा परचुरे यांच 'केक्स' हे पुस्तक. पुस्तकाच्या नावात फारसा फाफटपसारा न ठेवता मोजक्या शब्दात नेमक्या विषयालाव हात घालण्यात आला आहे.




चविष्ट केक, पेस्ट्रीज खाताना त्यावरील आईसिंगची सुंदर सजावट पाहून मन प्रसन्न होतं. परंतु डेकोरेटिव्ह केक प्रत्यक्षात तयार करणं तेवढंच अवघड आहे.  हे केक कसे तयार करायचे, त्याच्यामागे काय गुपित आहे याचा अत्यंत साधेपणाने उलगडा करण्याचे कौशल्य अपर्णा परचुरे यांनी 'केक्स' या पुस्तकात सहजपणे साधले आहे. या पुस्तकाच्या मुखपृष्टावरील केकचे विविध आकर्षक आकार आणि प्रकार आपले लक्ष वेधून घेतात. त्यामुळे पुस्तक आवर्जून वाचण्याची इच्छा निर्माण होते. बेसिक केक तयार करताना अपर्णाजींनी दिलेल्या अगदी छोट्या-छोट्या टिप्स पाळल्या तर आपल्याला उत्तम केक तयार येऊ शकतो.

केकवर आईसिंग करण्यासाठी जी साधने सांगितली आहेत ती आपल्या दैनंदिन वापरातील आहेत.  त्यामुळे त्यासाठी वेगळा खर्च करावा लागत नाही. या पुस्तकामध्ये डेकोरेटिव्ह केकची छायाचित्रे आहेत. त्यामध्ये आईसिग, खेळातले पत्ते, केक्टसचे झाड, बोट, लाकडाचा ओंडका, सफरचंद असे डेकोरेटिव्ह प्रकार

लक्ष वेधून घेतात.

कुटुंबातील सदस्यांना सुंदर केक तयार करून खायला घालण्याची इच्छा बऱ्याच गृहिणींना असते. परंतु, नेमकी कृती माहित नसल्याने ही इच्छा दाबून टाकावी लागते. मात्र, अपर्णा परचुरे याच्या या पुस्तकातून त्यांना आपली इच्छा पूर्ण करता येईल. कारण, या पुस्तकातून त्यांना आपली इच्छा पूर्ण करता येईल. कारण, या पुस्तकामध्ये साध्या, सरळ आणि सोप्या भाषेत केक्सच्या कृतींचे वर्णन केले गेले आहे. पुस्तकातील कृतींचा सराव केला तर गृहिणींच्या हाताला सफाई येऊ शकते. या पुस्तकातून सामान्य गृहिणींबरोबरच हॉटेल मॅनेजमेंटचा अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनाही फायदा होऊ शकतो. लेखिकेने होम सायन्स या विषयातून बी. एस्सी. आणि बी. एड ची पदवी घेतली आहे. त्या केक्स, आईस्क्रीम, बगाली मिठाई अशा विविध खाद्यप्रकारांचे क्लासेस घेतात आणि प्रदर्शने भरवतात. प्रसिद्ध अभिनेते डॉ. गिरीश ओक यांच्या त्या भगिनी. भारत विकास परिषद, स्वयंपूर्णा, इनरव्हील क्लब, रोटरी यासारख्या समाजसेवी संस्थामधून त्या कार्यरत आहेत. त्यांचे हे छोटेखानी पुस्तक गृहिणींसाठी विशेष उपयुक्त ठरणारे आहे.

**आशा कुलकर्णी**

दै. ऐक्य - १४ ऑगस्ट २०११

❐

## पाकशास्त्रावरील पुस्तके

| | | |
|---|---|---|
| रुचिरा भाग १ | कमलाबाई ओगले | १५० |
| रुचिरा भाग २ | कमलाबाई ओगले | १५० |
| स्वयंपाकघरातील नवा मित्र मायक्रोवेव्ह ओव्हन | राजश्री नवरे | ८० |









# बेरीज काल, आज आणि उद्याची

मागची पिढी बुरसटलेली आणि पुढची पिढी बहकलेली' असं मधल्या पिढीचं नेहमीच म्हणणं असतं. पण या दोन पिढ्यांच्या दरम्यान घडलेल्या मधल्या पिढीने बहकलेपणाकडे काहीच वाटचाल केलेली नसते का? मधल्यापिढीचं बहकलेपणही बुरसटलेलं ठरावं इतक्या वेगाने आणि विविध आवेगाने नवी पिढी बदलत असते.

दिनकर जोषींच्या 'एकडा वगारना मिंडा' या गुजराथी पुस्तकाच्या अंजली नरवणे यांनी केलेल्या 'अंकरहित शून्याची बेरीज' या अनुवादित कादंबरीत अशाच पिढी दर पिढी होत जाणाऱ्या स्थित्यंतराची कथा माडलेली आहे.

'अंकरहित शून्याची बेरीज' ही कथा आहे व्रजमोहनदास, त्यांचा मुलगा आणि अविनाशचा मुलगा प्रतीप यांची. वर्तमानातून भविष्याकडे सरकत असलेली कथा ही व्रजमोहनदास याच्या आठवणींद्वारे भूतकाळातही डोकावत असते. कारण, वर्तमान असो वा भविष्य, त्याची नाळ ही शेवटी भूतकाळाशी जोडलेली असते. व्रजमोहनदास यांनी वयाच्या सोळाव्या वर्षी मुंबईत पाऊल ठेवून चिकाटीने आणि मेहनतीने व्रजमोहनदासांनी व्यापार सुरू करून भरभराटीला आणलेला असतो. यात त्यांना वेगवेगळ्या लोकांची मोलाची मदत झालेली असते आणि या लोकांचे ऋण व्रजमोहनदासांनी कधीच नाकारलेले नसते. योग्य मार्गाने मिळेल तेवढा पैसा कमावण्यावर त्यांचा भर असतो. त्यामुळे त्यांची ही समृद्धी मूल्याधिष्ठित असते. त्यांचा मुलगा अविनाश याला वडलांच्या संघर्षाची जाणीव असते आणि त्याबद्दल खूप आदरही असतो. पण, व्यापार वृद्धिंगत करायचा असेल तर माणसांमध्ये पैसा गुंतवण्यापेक्षा नव्या व्यापारात किंवा नव्या जागेत गुंतवणूक करणं अविनाशला महत्त्वाचं वाटंत. व्यापार हातात आल्यावर हवं तसं वळण देऊ लागतो. पण, जेव्हा बायकोच्या नावावर घर घेतो, त्या वेळी पहिल्यांदाच व्रजमोहनदासांना अविनाशच्या मानसिकतेतला बदल जाणवतो. अविनाशलाही वडलांच्या नाराजीची पूर्वकल्पना असतेच. त्याचा विचार असतो की बापूजींचा राग आज नाही तर उद्या मावळेल. पण, आपल्या मुलाच्या भविष्याची तरतूद म्हणून व्यापारात अधिकाधिक नफा मिळवून आपला उत्कर्ष साधणं हेही महत्त्वाचं असतं. नात्यांचं महत्त्व अविनाशला मान्य



असतं, पण त्यावर वारेमाप पैसे उधळणं त्याला पसंत नसतं. अविनाश व्रजमोहनदासांचा एकुलता एक मुलगा असतो. वडलांचा सगळा इतिहास माहीत असतं, पण तरीही त्याला आपल्या मोठ्या बहिणीची आणि तिच्या नवऱ्याची भीती वाटत असते. वडलांनी आपल्या संपत्तीतला अर्धा वाटा तिला दिला तर आपल्या मुलांचं कसं होणार या विवंचनेत अविनाश असतो. आपल्याला आपल्या मुलांची काळजी आहे, तशीच आपल्या वडलांना आपली आणि बहिणीची काळजी आहे हे तो विसरून जात असतो.

अविनाशची मुलं मात्र वयात आल्यावर फारच पुढे निघून गेल्याचे अविनाशच्या लक्षात येतं. अविनाशचा वकिली शिकणारा मुलगा प्रतीप वडलांशीच वकिलीची भाषा करू लागतो. त्याला आपल्या वडलांचं वागणं अव्यवहारी वाटायला लागतं. तो घरचा जुना 'धंदा' न करता जगभरात धुमाकूळ घालत असलेल्या रॅप शोजचं 'कल्चर' मुंबईत आणायचा घाट घालतो. वडलांशी भांडण करून तो यासाठी पैसे मिळवतो. अनेक नैतिक-अनैतिक गोष्टी करून तो यशस्वीही होत जातो. कारण , नैतिकता ही पैशापेक्षा मोठी नाही, हा विचार त्याच्यात पूर्णपणे रुजलेला असतो. थोडंफार गैरवर्तन अविनाशकडूनही झालेलं असल्यामुळे तोही आपल्या मुलांना समजवण्यासाठी आवश्यक असलेला खंबीरपणा गमावून बसलेला असतो. अशा प्रकारे पुढे जात असलेलं पण दिशाहीन असणारं चक्र पूर्ण होतं.

समृद्धीला महत्त्व देताना जो मूल्यऱ्हास आपल्याकडून होत आहे, त्यावर ही कथा आहे. एक अंकापुढे जितकी शून्यं वाढवत नेऊ, तितके आपण श्रीमंत होतो हे खरं, पण ही नुसती लौकिकार्थाने मिळवलेली श्रीमंती किती खरी? ही सगळी शून्यं ज्या एक अंकाच्या दावणीला बांधली आहेत तो अंकच नष्ट झाला, तर नुसत्या शून्यांना काय किंमत राहणार? हा प्रश्न ही कादंबरी मांडते.

पैसा कमावण्याच्या नादात, शून्य वाढवण्याच्या नादात, अविनाश धावत असतो. पण मन:शांती असणारा, नीतिमूल्यं असणारा मूळचा एक अंकच तो विसरून जातो. धंद्याला प्रतिष्ठेची गरज नसते असं मानून 'धंदा' करणारा प्रतीप पाहून त्याला जाणीव होते की या नुसत्या शून्यांनी सगळंच नियंत्रणाबाहेर नेलं आहे. त्यांना नैतिकतेच्या, शिस्तीच्या, सचोटीच्या एक अंकाचं अधिष्ठान आवश्यक आहे. कारण ही मूल्यंच तुमच्या समृद्धीचा डोलारा ताठ मानेने सांभाळू शकतात. पैसा मिळवताना त्यासाठी आपण संस्कारांनाच तिलांजली देत आहोत याची कुठलीही शिकवणी न देत बसता ही कादबरी आपल्या विवेकबुद्धीलाच हा प्रश्न विचारते आणि पुस्तक वाचून संपल्यावरही आपल्या मनातून आणि डोक्यातून हा प्रश्न जात नाही... हेच या पुस्तकाचं मोठं यश आहे.

**आदित्य निमकर**

लोकसत्ता ०४/०९/२०११

**नवे कोरे**




# येस!

मन:परिवर्तन शास्त्रातील ५० गुपितं

मूळ लेखक
नोह जे. गोल्डस्टेन/ स्टीव्ह जे. मार्टिन/रॉबर्ट बी. सीअलडिनी
अनुवाद
डॉ. धरणीधर रत्नाळीकर

**२००रु. पोस्टेज २५रु.**

छोटेसे बदल तुमच्या मन:परिवर्तक शक्तीत मोठा बदल करू शकतात.
–लेखन साहित्यातील कोणत्या वस्तू, इतरांचे मन:परिवर्तन प्रकर्षाने करण्याचे तुमचे प्रयत्न, अधिक परिणामकारक ठरू शकतात?
–तुमच्यातील मन:परिवर्तकता इतरांपेक्षा ५०% ने वाढविण्यासाठी तुम्ही आज कोणता एक शब्द वापरण्याची सुरुवात करू शकता?
–कारणावली दिल्यानंतर लोक 'मर्सिडीज'ची निवड करतील की बीएमडब्ल्यू पसंत करतील?
–आणि बहुतांश 'डेन्टिस्ट' हे डेनीस का म्हणविले जातात?
तुमच्या सहकाऱ्यांनी तुमच्याशी अधिक वेळा सहमत होणे, तुमच्या पाल्यांनी गृहपाठ करणे आणि शेजाऱ्यांनी तुमच्यावर कचरा न टाकणे हे बहुतेक तुम्ही निश्चितपणे पसंत कराल.
'आपल्याला हवे ते इतरांनी करावे' असे मन:परिवर्तन करण्याच्या प्रसंगांना रोजच सामोरे जावे लागते. लोक कशामुळे आपल्या विनंतीस 'होकार' देतात?
मन:परिवर्तनाच्या मानसशास्त्रावर ६० वर्षांपासून केलेल्या संशोधनाच्या आधारे मांडलेल्या तथ्यांचा तुम्हाला घर व कार्यालय दोन्ही ठिकाणी उपयोग होईल.
'प्रभाव' या विषयाचे तज्ज्ञ म्हणून जगात ज्यांचा संदर्भ दिला जातो असे प्रोफेसर रॉबर्ट सियाल्दीनि याच्या साहचर्याने लिहिलेल्या 'येस!' या पुस्तकात मन:परिवर्तनाच्या अनेक पद्धती दिल्या आहेत,
एखाद्याला विशिष्ट कृतीसाठी प्रेरित करावयाचे असेल तर, 'येस!'द्वारे कसे नाट्यपूर्ण परिणाम होऊ शकतात, हे दाखवून दिले आहेत.

# वाचलेच पाहिजे असे

## डिजिटल फॉर्ट्रेस

**डॅन ब्राऊन** / अनुवाद **अशोक पाध्ये**

**४४०रु. पोस्टेज ३०रु.**




***घटनामालिकेची नांदी***

*स्थळ : 'प्लाझा द एस्पाना'*
*सेव्हाईल शहर, स्पेन.*
*वेळ : सकाळचे ११:००*

*असे म्हणतात की, मृत्यू जेव्हा समोर येऊन उभा रहातो तेव्हा सर्व गोष्टींचा स्वच्छ उलगडा होतो व सत्य प्रगट होते.*

*पण ही गोष्ट एन्झेई टंकाडो याला ठाऊक नव्हती. वेदनेमुळे आपली छाती आवळून धरली खाली पडताना तेव्हा आपण केलेली चूक व तिचे भयावह परिणाम कळून चुकते.*

*त्याच्याभोवती गर्दी जमली. खाली वाकून पहाणाऱ्या लोकांच्या नजरा त्याच्यावर खिळल्या. ते सर्व त्याला मदत करू पहात होते. पण टंकाडोला त्यांच्या मदतीची गरज नव्हती. आपण कोणत्याही मदतीच्या पलीकडे गेलो आहोत हे त्याला कळून चुकले होते. फार उशीर झाला होता. आपल्या डाव्या हाताचा पंजा त्याने थरथरत उचलला; वर धरून त्याने आपली बोटे हवेत पसरली. अरे, बघा माझा हात! त्याच्याकडे वाकून पहाणारे चेहरे तो आता काहीतरी बोलेल अशी अपेक्षा करत होते. परंतु आपण जे काही बोलू ते या बघ्या लोकांना कळणार नाही याची त्याला खात्री होती.*

*त्याच्या बोटांपैकी एका बोटात एक सोन्याचे वळे होते. त्या चकचकीत वळ्यावर काही अक्षरे कोरलेली होती. सूर्यप्रकाशात ती अक्षरे झगमगत होती. एन्झेई टंकाडोला कळून चुकले की, आपण पहात असलेला प्रकाश हा अखेरचा आहे. यानंतर सारा काळोख आहे.*

## १

'स्मोकी माऊंटन' या डोंगराळ भागामधील एका हॉटेलात ते दोघे होते. 'बेड ॲन्ड ब्रेकफास्ट' अशा सोयी तिथे होत्या. जेवण्याची सोय तिथे नव्हती. फक्त निजण्याची व सकाळच्या न्याहारीची सोय तिथे होई. त्या दोघांचे ते आवडते हॉटेल होते. तिच्याकडे खाली वाकून पहात डेव्हिड तिला विचारीत होता, ''मग? हे मदनमंजिरी, माझ्याशी लग्न करशील?''

छप्पर असलेल्या एका आलिशान पलंगावर ती झोपली होती. आपल्याशी कोण बोलते आहे? 'कुणीतरी आपल्याला मागणी घालतो आहे. होय. तोच तो! आपला सखा, आपला प्रियकर! तो आता कायमचा आपला झाला आहे!' त्याच्या निळ्या निळ्या डोळ्यात ती खोलवर डोकावून पहात होती.

पण तेवढ्यात एक घंटा कर्कश्शपणे वाजू लागली. तिचा आवाज दूरवरून येत असला तरीही तो मोठा वाटत होता. तो आवाज तिच्या जिवलगापासून तिला खेचून दूर नेऊ लागला. तिने आपले हात पुढे करून त्याला धरून ठेवण्याचा प्रयत्न केला. पण तिच्या हातात फक्त रिकाम्या पोकळीतील हवा आली.

तो आवाज फोनचा होता. त्या आवाजाने सुसान फ्लेचरचे स्वप्न भंग पावले व ती पूर्णपणे जागी झाली. चाचपडत तिने फोनचा रिसिव्हर उचलून कानाला लावला आणि म्हटले, ''हॅलो?''

''सुसान, मी डेव्हिड बोलतो आहे. तुला मी झोपेतून जागे केले का गं?''

तिच्या चेहऱ्यावर स्मितहास्य पसरले. बसल्या जागी वळत ती म्हणाली, ''आत्ताच मी तुला माझ्या स्वप्नात पहात होते. तेव्हा आता वेळ न लावता इकडे ये आणि आपण मजा करू.''

तो मोठ्याने हसून म्हणाला, ''अगं, बाहेर अजूनही अंधार आहे.''

यावर ती मधाळ आवाजात तक्रार करीत म्हणाली, ''हंऽऽ! मग तर तुला इकडे आलेच पाहिजे व आपल्याला मजा केली पाहिजे. स्मोकी माऊंटनकडे जाण्याआधी आपण झोपायला नको का?''

यावर डेव्हिडने निराशेने एक सुस्कारा टाकला व म्हटले, ''म्हणून तर मी तुला फोन केला. आपला तो प्रवास, ती सहल आता आपल्याला पुढे ढकलायला पाहिजे.''

ते ऐकताच सुसान खाडकन भानावर आली. तिच्या डोळ्यातील झोप कुठल्या कुठे निघून गेली. ती ओरडून म्हणाली, ''काय?''

''आय ॲम सॉरी. पण मला आता घरातून निघालेच पाहिजे. मी उद्या परतेन. तरीही आपल्या हातात दोन दिवस रहातात.''

ती नाराज झाली; थोडीशी दुखावली गेली. ती म्हणाली, ''मी तिथे आपली रिझर्व्हेशन्स केली आहेत. त्याच त्या 'स्टोन मॅनोर' हॉटेलातील आपल्या आवडत्या खोलीत.''

''मला ते ठाऊक आहे गं, पण....''

''आपली आजची रात्र खास आहे ना! आपला वाङ्‌निश्चय झाल्यापासून आज सहा महिने पूर्ण झाले ना! आठवते ना तुला? त्यासाठी आजची रात्र आपल्याला साजरी करायची आहे.''

पुन्हा एक सुस्कारा सोडून तो म्हणाला, ''सुसान, अगं कसं सांगू तुला? मला नेण्यासाठी त्यांनी कार आणली आहे. तुला मी आता एकदम विमानातूनच फोन करेन.''

''*विमानातून?* काय चालले आहे तरी काय? विद्यापीठाने तुला....?''

''विद्यापीठाचा यात काहीही संबंध नाही. मी तुला नंतर फोन करून सारा खुलासा करेन. मला आता निघालेच पाहिजे. ते बघ, मला हाका मारू लागले आहेत. मी तुझ्या संपर्कात राहीन. अगदी नक्की. वचन देतो तसे तुला.''

तिने ओरडून म्हटले, ''डेव्हिड हा सारा काय प्रकार...''

तिला पुढे बोलता आले नाही. त्याने फोन बंद केला होता.

हताश होऊन तिने आपले अंग पलंगावर टाकून दिले. नंतर कित्येक तास ती त्याच्या फोनची वाट पहात पलंगावर पडून होती. पण तिला त्याचा फोन आला नाही. कधीच आला नाही.

त्या दिवशी दुपारी आपल्या घरी सुसान टबमध्ये अंघोळ करीत होती. पण अंघोळ करण्यापेक्षा ती नुसती विचार करीत बसून राहिली होती. निराशेने ती खचली होती. स्टोन मॅनोर हॉटेल आणि तो स्मोकी माऊंटन यांना विसरण्याचा ती प्रयत्न करीत होती. *तो कुठे गेला असेल? नंतर त्याने आपल्याला फोन का केला नाही?* असा विचार ती करत होती. या प्रश्नांची उत्तरे ती सारखी शोधीत होती.

हळूहळू तिच्या भोवतालचे गरम पाणी निवत गेले. शेवटी ते थंडही झाले. टबमधून उठण्याच्या बेतात असताना जवळच बेसिनवर ठेवलेला कॉर्डलेस फोन वाजू लागला. ती ताडकन उठून उभी राहिली. यामुळे टबमधील बरेच पाणी हिंदकळून बाहेर सांडले. बेसिनपाशी जाऊन तिने फोन घेतला.

''डेव्हिड?'' तिने फोनवर विचारले.

''नाही. मी स्ट्रॉथमोर बोलतो आहे.'' पलीकडून आवाज आला.

ते ऐकताच तिचे अंग एकदम सैल पडले. ती म्हणाली, ''ओह!'' आपल्या

आवाजातील निराशा लपवायचा तिने प्रयत्न केला नाही. ती निर्जीवपणे पुढे म्हणाली, ''गुड आफ्टरनून कमांडर.''

''कोण्या तरुण मित्राच्या आवाजाची अपेक्षा केली होती का?'' त्या आवाजाने विचारले.

ती अवघडत म्हणाली, ''नाही, तसे काही नाही. पण मला एकदम कळेना....''

तिचे बोलणे तोडत तो म्हणाला, ''नक्कीच, नक्कीच.'' मग तो हसत हसत पुढे म्हणाला, ''डेव्हिड बेकर हा एक चांगला माणूस आहे. त्याला कधीही सोडू नकोस.''

''थँक यू सर.''

नंतर कमांडरचा आवाज एकदम कठोर झाला. तो म्हणाला, ''सुसान, मी तुला एवढ्यासाठी फोन केला की, तुला आत्ता इथे आले पाहिजे.''

ती अंदाज घेत म्हणाली, ''पण सर, आज शनिवार आहे. आम्ही शनिवारी सहसा....''

तो शांतपणे म्हणाला, ''ते मला ठाऊक आहे. पण आत्ताची परिस्थिती आणीबाणीची आहे.''

ती एकदम ताठ झाली. *आणीबाणी?* हा शब्द कमांडरच्या ओठावर आजवर कधीही आला नव्हता.

*आणीबाणी? क्रिप्टोमध्ये?* काय झाले असावे ते तिच्या लक्षात येईना. ती कशीबशी म्हणाली, ''येस सर.'' काही क्षण थांबून ती पुढे म्हणाली ''मी शक्य तितक्या लवकर तिकडे येते.''

''त्याहीपेक्षा लवकर ये.'' एवढे म्हणून स्ट्रॅथमोरने फोन बंद केला.

सुसान फ्लेचरने आपल्या अंगाभोवती टॉवेल गुंडाळून घेतला होता. तिचे अंग पाण्याने निथळत होते. तिच्यासमोर तिने घडी करून ठेवलेले कपडे होते. त्यात स्मोकी माऊंटनमध्ये हिंडण्यासाठी एक हायकिंग शॉर्ट होती. तिथल्या थंड हवेसाठी एक स्वेटर होता आणि रात्रीसाठी अंगावर चढवायची एक लिंगरी होती. ती नवीन लिंगरी तिने नुकतीच खरेदी केली होती. पण आता या कपड्यांचा उपयोग तिला करता येत नव्हता. नाराज होऊन ती कपड्याच्या कपाटाकडे वळली. त्यातून तिने ब्लाऊज व स्कर्ट बाहेर काढला.

*आणीबाणी? आणि तीही क्रिप्टोमध्ये?*

जिना उतरता उतरता तिच्या मनात आले, सकाळीच जर असे घडले आहे, तर आजचा सबंध दिवस कसा जाणार असेल?

लवकरच ते तिला कळून चुकणार होते.

२

अत्यंत शांत असलेल्या समुद्रावरून ते खास विमान तीस हजार फूट उंचीवरून उडत होते. ते एक लिअरजेट -६० जातीचे विमान होते. त्या विमानाच्या लंबवर्तुळाकृती खिडकीतून डेव्हिड बेकर बाहेर पहात होता. विमानातील फोन बिघडला आहे असे त्याला सांगण्यात आल्याने तो नाराज झाला होता. सुसानला वचन दिल्याप्रमाणे त्याला बोलता येत नसल्यामुळे त्याला दु:ख झाले होते.

'येथे बसून मी काय करतो आहे?' त्याने स्वत:लाच विचारले. पण त्या प्रश्नाचे उत्तर सोपे होते. त्याच्या भोवतीची जी माणसे होती ती अशी होती की, त्यांना 'नाही' म्हणण्याची कोणालाच हिंमत होऊ शकणार नव्हती.

विमानातील लाऊडस्पीकरवरून वैमानिक त्याला उद्देशून म्हणाला, ''मिस्टर बेकर, आपण आता अर्ध्या तासात मुक्कामाला पोहोचणार आहोत.''

त्या अदृश्य आवाजाला उद्देशून बेकर पेंगुळत्या आवाजात मनात म्हणाला, *असे का, छान!* त्याने खिडकीवरचा पडदा ओढला व झोपी जाण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्या मनात सतत सुसान येत राहिल्याने त्याला झोप लागली नाही.

३

व्होल्व्हो सेडन ही मोटरगाडी चालवित सुसान आपल्या ऑफिसपाशी आली. ते ऑफिस सरकारी होते व आतील विस्तृत जागेभोवती १० फूट उंचीचे एक काटेरी कुंपण होते. एका तरुण पहारेकऱ्याने हात उंचावून तिला थांबवित म्हटले, ''युवर आयडी प्लीज!''

सुसानने आपले ओळखपत्र काढून त्याच्यापुढे केले. त्याने ते ओळखपत्र संगणकाच्या स्कॅनरमध्ये तपासणीसाठी घातले. यात अर्धे मिनिट जाणार होते. ती तपासणी पूर्ण झाल्यावर ते ओळखपत्र तिला परत करीत तो म्हणाला, ''थँक यू मिस फ्लेचर.'' मग त्याने आत पाहून कुठेतरी एक ओळखीची खूण केली. क्षणार्धात फाटकाची दारे उघडली गेली.

सुसान आपली गाडी चालवित अर्ध्या मैलाचे आतले अंतर कापू लागली. शेवटी पुन्हा एक मघासारखेच फाटक लागले. तिथेही एक तसलेच काटेरी कुंपण होते. पण त्यामधून एक जीव घेणारा विद्युतप्रवाह खेळवला होता. तिला आता पुन्हा आपले ओळखपत्र दाखवावे लागणार होते. पुन्हा तशाच तपासणीतून जावे लागणार होते. *मी येथून आत्तापर्यंत लाखो वेळा गेले असेन. कशाला रे उगाच तपासणी करता?*

अखेर ती शेवटच्या तपासणी नाक्याच्या फाटकापाशी पोहोचली. तिथे एक

जाडजूड पहारेकरी हातात मशिनगन घेऊन उभा होता. त्याच्याजवळ दोन कुत्रे होते. इशारा करताच ते समोरच्या व्यक्तीवर चवताळून हल्ला करण्याच्या तयारीत उभे होते. त्या पहारेकऱ्याने तिला पाहून फाटकातून पुढे जाण्याची खूण केली. आतल्या रस्त्यावर ती सात-आठशे फुटांचे अंतर आपल्या गाडीने कापून गेली आणि कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या पार्किंग लॉटमध्ये आपली गाडी तिने नेली. तिच्या मनात आले, *काय हा एवढा व्याप! विश्वास बसणार नाही असा हा कामाचा पसारा आहे. २६ हजार कर्मचारी असलेल्या या ऑफिसचे वार्षिक अंदाजपत्रक १२ अब्ज डॉलर्सचे आहे. एवढ्या प्रचंड ऑफिसचे काम आपल्या शनिवार-रविवारच्या दोन सुट्ट्यांवाचून सहज चालेल. ते कधीही खोळंबणार नाही.*

सुसानने आपली गाडी नेहमीच्या आरक्षित जागेवर नेली आणि इंजीन बंद केले.

एका विस्तृत हिरवळीवरून चालत ती शेवटी मुख्य इमारतीमध्ये पोहोचली. पुन्हा आत दोन तपासणी नाकी होती. त्यातून तिची तपासणी होऊन ती पुढे गेली. अखेर ती एका बोळात शिरली. त्या बोळाला खिडक्या नव्हत्या. आणि तो बोळ एका नव्या इमारतीमध्ये शिरत होता. त्या इमारतीमध्ये शिरताना पुन्हा एक तपासणी नाके वाटेत होते. पुढे एक पाटी होती. त्यावर लिहिले होते:

NATIONAL SECURITY AGENCY (NSA)
CRYPTO FACILITY
AUTHORISED PERSONNEL ONLY

तिथला सशस्त्र पहारेकरी तिला म्हणाला, ''आफ्टरनून, मिस फ्लेचर.''

सुसान दमली होती. ती म्हणाली, ''हाय जॉन!''

''तुम्ही आज याल असे वाटले नव्हते.''

''मलाही तसे वाटले नव्हते.'' मग ती एका पॅराबोलिक मायक्रोफोनमध्ये वाकून म्हणाली, ''सुसान फ्लेचर.'' आपले नाव तिने अत्यंत सुस्पष्ट स्वरात उच्चारले. तिच्या आवाजाचे विश्लेषण संगणकाकडून झाले. त्या आवाजातील सर्व प्रकारच्या कंप्रता तपासल्या गेल्या. मग पुढचे बंद दार क्लिक् आवाज होऊन उघडले गेले. पुढे होऊन तिने प्रवेश केला.

त्या सिमेंटच्या रस्त्यावरून ती पुढे चालली होती. पहारेकरी तिला मागून पहात होता. तिची देहयष्टी किती कमनीय आहे हे त्याला जाणवत होते. आज तिचे काहीतरी बिनसले आहे, ती अस्वस्थ आहे हे त्याला जाणवले. तिच्या हरणासारख्या

डोळ्यात आज नेहमीचे भाव दिसत नव्हते. दूरवर कुठेतरी पहात असल्यासारखी तिची नजर भासत होती. पण तिचे गाल मात्र तजेलदार दिसत होते. आपले पिंगट केस ड्रायरने नुकतेच वाळवले असल्याने ते तिचे दोन्ही खांदे व्यापून टाकत रुळत होते. तिने लावलेल्या पावडरचा गंध तिच्या मागे मंदपणे तरळत जात होता.

लयबद्ध चालणारे तिचे पाय त्याने रसिकतेने पाहिले. *१७० बुद्धिनिर्देशांक असलेला तिचा मेंदू ती आपल्या नाजूक पायावर कसा काय पेलवू शकते* असा विचार त्याच्या मनात येऊन गेला.

तो पहारेकरी तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बराच वेळ पहात होता. शेवटी ती दूरवर वळून अदृश्य झाली.

तो बोगदा जिथे शेवटी संपला तिथे एक वर्तुळाकृती पोलादी दार होते. एखाद्या भव्य तिजोरीला जसे दार असते तसेच ते होते. तिथल्या पाटीवर मोठमोठ्या अक्षरात लिहिले होते CRYPTO.

एक नि:श्वास टाकून सुसानने दाराच्या एका कप्प्यात आपला हात घातला व तिथली बटणे दाबून पाच अंकी संख्या टाईप केली. ती सांकेतिक संख्या हा तिचा क्रमांक होता. यंत्रणेला ती कळताच ते वर्तुळाकृती दार आपल्या आसावर हळूहळू वळत गेले. १२ टनी वजनाचे ते पोलादी दार ९० अंशातून फिरत गेले. ते दार अवजड असल्याने अत्यंत मंद गतीने फिरत गेले. तेवढ्या काळात सुसानच्या मनात अनेक विचारतरंग उमटले. पण त्या सर्वातून एकच एक विचार सारखा डोके वर काढत होता. तो विचार डेव्हिडबद्दलचा होता.

*डेव्हिड बेकर!* आजवर तिने फक्त एकदाच प्रेम केले व ते याच पुरुषावर. जॉर्ज टाऊन विद्यापीठात डेव्हिड बेकर तिथल्या प्राध्यापकातील सर्वात तरुण प्राध्यापक होता. परकीय भाषांच्या विषयात तो अत्यंत निष्णात होता. विद्वानांच्या जगात तो एक पंडित माणूस समजला जायचा. त्याची स्मरणशक्ती अनेक पदरी होती. त्याला लाभलेली ती एक निसर्गदत्त देणगी होती. भाषांवर त्याचे मनापासून प्रेम होते. स्पॅनिश, फ्रेंच व इटालियन या भाषांवर त्याचे प्रभुत्व होतेच, पण त्याखेरीज सहा आशियायी उपभाषाही त्याला चांगल्या अवगत होत्या. भाषाशास्त्र आणि व्युत्पत्तीशास्त्र या विषयांवर त्याचा विद्यापीठात व्याख्यानाचा तास असला की, वर्गात एवढी गर्दी होई की अनेक जण उभे राहून ऐकत असत. बोलताना तो मोठ्या अधिकारवाणीने आणि उत्साहाने बोलत असे. त्याचे व्याख्यान ऐकण्यास आलेले त्याचे प्राध्यापक मित्र, सहाध्यायी वगैरे मंडळी मोठ्या कौतुकाने त्याचे बोलणे ऐकत. विद्यार्थी तर त्याचा प्रत्येक शब्द झेलीत असत.

बेकरची कातडी रापलेली होती; राकट होती. तो ३५ वर्षांचा व उत्साहाने

सळसळणारा तरुण होता. त्याचे डोळे हिरव्या रंगाची छटा दाखवणारे होते. त्याचा भक्कम जबडा व चेहऱ्यावर ताणलेली कातडी पाहिल्यावर सुसानला संगमरवरात कोरून काढलेल्या पुतळ्याची आठवण येई. सहा फुटांपेक्षा थोडी अधिक उंची असलेला बेकर स्क्वॅशचा खेळ खेळताना इतक्या वेगाने हालचाली करे की, पहाणाऱ्याच्या नजरेत तो ठरत नसे. त्यामुळे खेळातील त्याचे प्रतिस्पर्धी चक्रावून जात. आपल्या प्रतिस्पर्ध्याला हरवल्यावर तो एखाद्या कारंज्याखाली आपले डोके भिजवून थंड करे. मग भिजलेल्या केसातून पाणी निथळत असताना तो आपल्या स्पर्धकाला 'फ्रूट शेक' पाजे व 'बॅगेल' हा पदार्थ खायला घाले.

डेव्हिड बेकर हा एक तरुण प्राध्यापक असल्याने त्याला विद्यापीठातील पगार पुरत असे व त्यातून थोडीफार चैन करणेही त्याला परवडे. पण कधीकधी त्याला पैशांची चणचण भासे. गाडीचे टायर घासून घासून पार त्याचे गोटे होत. अशा वेळी टायर्सचे रिट्रेडिंग करावे लागे. स्क्वॅश क्लबच्या सभासदत्वाचे नूतनीकरण करण्यासाठी पैसे लागत. या रकमा बऱ्यापैकी मोठ्या असल्याने त्यालाही अधूनमधून बाहेरची कामे घेऊन जादा उत्पन्न मिळवावे लागे. मग तो वॉशिंग्टन शहरातील व आसपासच्या सरकारी ऑफिसेसमधील कामे घेई. ही कामे बव्हंशी अनुवादाची असत. अशाच एका कामासाठी तो गेला असता त्याची व सुसानची गाठ पडली होती.........

पुढे काय? वाचा डिजिटल फोर्ट्रेस या कादंबरीत.....


**डॅन ब्राऊन यांची इतर पुस्तके**

| **पुस्तकाचे नाव** | **अनुवाद** | **किंमत** |
|---|---|---|
| द दा विंची कोड | अजित ठाकूर | ३२० |
| एन्जल्स ॲण्ड डेमन्स | बाळ भागवत | ३५० |
| डिसेप्शन पॉईंट | अशोक पाध्ये | ५०० |
| द लास्ट सिम्बॉल | अशोक पाध्ये | आगामी |








**पोस्टेज खर्च वेगळा**

# कीप ऑफ द ग्रास

**करण बजाज**

अनुवाद

**माधुरी शानभाग**




**१६०रु. पोस्टेज २५रु.**

वयाच्या पंचविसाव्या वर्षी येलसारख्या विद्यापीठातून पदवी घेऊन, तुम्ही वॉलस्ट्रीटवरील बँकेमधे वर्षाला पाच लाख डॉलर्स कमवू लागाल आणि वयाच्या तिसाव्या वर्षी कोट्यधीश बनाल.

मात्र तुम्ही जर स्थलांतरित भारतीय आईबापाच्या पोटी अमेरिकेत जन्मलेले सम्राट रतनसारखे असाल, तर तुम्ही हे सर्व सोडून भारतीय बीस्कूलमधे प्रवेश घ्याल....

सम्राटचा चक्रावून टाकणारा प्रवास बंगलोरच्या आय.आय.एम.पासून सुरू होतो. वेडीवाकडी वळणे घेत, स्वप्नातही येणार नाहीत अशा जागी त्याला त्याचे आयुष्य घेऊन जाते ... आणि घडू नयेत अशी कृत्ये त्याच्या हातून घडतात.. विपश्यना, ध्यानधारणा, सेक्सी डॅनिश हिप्पीबरोबर हिमालयात भटकणे, नरभक्षक साधूबरोबर बनारसच्या गंगाघाटावर बसणे आणि राजाभैय्याच्या प्रजेला साबण विकणे.

हा सगळा प्रवास त्याला कुठे घेऊन जातो?...

करण बजाजच्या या पहिल्याच कादंबरीत चालू पिढीतल्या तरुणाईची स्पंदने प्रकट होतात आणि ती वाचकांना अंतर्मुख करतात.

# पुरस्कार



### * दिलीप प्रभावळकर यांना बालसाहित्य पुरस्कार

प्रभावळकर यांनी लिहिलेल्या 'बोक्या सातबंडे' या लेखनासाठी त्यांना 'साहित्य अकादमी'चा बालसाहित्यासाठीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. ५० हजार रुपये, शाल आणि ताम्रपट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

'एका खेळीयाने' हे पुस्तक खास प्रभावळकरी शैलीतील असून यात त्यांनी चिमणराव ते गुरू पर्यंतचा अभिनयप्रवास शब्दबद्ध केला आहे. 'अलबत्या गलबत्या' या बालनाट्यातील चेटकीण, 'वासूची सासू' मधील सासू, 'हसवाफसवी'मधील विविधरंगी सहा भूमिका, दूरदर्शनवरील 'चिमणराव' या भूमिका, त्या साकारताना केलेली तयारी आणि अनुभव यांचा पट त्यांनी या पुस्तकात उलगडला आहे. एखाद्या अभिनेत्याने साकारलेल्या आपल्या विविध भूमिकांबद्दल तपशीलवार माहिती देणारे हे एकमेव पुस्तक आहे.

### * सुर्वेंच्या नावाच्या पुरस्काराने सार्थक

प्रतिकूलतेला यशाची पायरी करून जीवनात साहित्य निर्मितीबरोबरच सामाजिक जाणीव जागृत ठेवणाऱ्यांना कविवर्य नारायण सुर्वे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जीवन संघर्षातील नायक असलेल्या सुर्वे यांच्या नावाचा पुरस्कार मिळाल्याने कष्टाचे सार्थक झाल्याची कृतार्थतेची भावना त्यांच्या चेहऱ्यावर झळकली.

महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी संस्थेतर्फे कवी दत्ता हलसगीकर यांच्या हस्ते लेखक संदीपकुमार साळुंखे यांना श्रमिक विद्यापीठ पुरस्कार, कवी प्रा. चंद्रकांत वानखेडे यांना सदन पुरस्कार, तर सामाजिक कार्यकर्ते मनोहर कोलते यांना 'भला माणूस' पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. द. मा. मिरासदार, डॉ. प्र. चिं. शेजवलकर, भाऊसाहेब भोईर, संस्थेचे अध्यक्ष उद्धव कानडे आणि सचिन इटकर या प्रसंगी उपस्थित होते.

कोलते यांनी पुरस्काराची रक्कम स्वत:ची भर घालून सामाजिक कार्यासाठी देण्याचे जाहीर केले. उत्तरार्धात 'सुर्वे मास्तरांचे विद्यापीठ' कार्यक्रमात कानडे, वानखेडे, अंजली कुलकर्णी, आश्लेषा महाजन, मृणालिनी कानिटकर-जोशी यांनी

कवितांचे सादरीकरण केले.

हलसगीकर म्हणाले, ''सुर्वे यांच्या कवितेत प्रतिनिधित्व करणारी उपेक्षित, वंचित माणसे त्यापूर्वीच्या काव्यात कधीच आली नव्हती.''

शेजवलकर म्हणाले, ''सुर्वे यांच्या कविता मस्तकस्पर्शी नाहीत, तर त्या जीवनस्पर्शी आहेत.''

*** दिनकर रायकर यांना सुशीलादेवी देशमुख पुरस्कार**

मातोश्री सुशीलादेवी देशमुख राज्यस्तरीय 'एकमत' पत्रकारिता पुरस्कार यंदा दैनिक लोकमतचे समूह संपादक दिनकर रायकर यांना घोषित झाला आहे.

या पुरस्काराचे स्वरूप ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह असे आहे. रायकर गेल्या ४० वर्षांपासून पत्रकारितेत आहेत. 'इंडियन एक्स्प्रेस' चे वार्ताहर म्हणून त्यांनी कामास सुरुवात केली. 'लोकसत्ता'चे सहायक संपादक म्हणून त्यांनी काम केले. गेल्या काही वर्षांपासून ते 'लोकमत'चे समूह संपादक म्हणून काम करीत आहेत.

*** समाजभूषण पुरस्कार**

जय आनंद ग्रुपच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा 'समाजभूषण पुरस्कार' उद्योजक आणि कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष वालचंद संचेती यांना आमदार सुरेश जैन यांच्या हस्ते देण्यात आला. या वेळी खासदार मेघराज लोढा, माजी मंत्री चंद्रकांत छाजेड, उद्योजक पोपटलाल ओस्तवाल, प्रकाशचंद भटेवरा, जय आनंद ग्रुपचे अध्यक्ष बाबूशेठ कुवाड, नगरसेवक रवींद्र धंगेकर आणि संजय बनसोडे उपस्थित होते. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

*** दिलीप भिकुले यांना ग्रंथसेवक पुरस्कार**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने सार्वजनिक ग्रंथालयांसाठी देण्यात येणारा 'डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथसेवक पुरस्कार' कॅम्प परिसरातील सिद्धार्थ वाचनालयाचे ग्रंथपाल दिलीप भिकुले यांना जाहीर झाला आहे. मानचिन्ह, प्रमाणपत्र व पंचवीस हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. भिकुले यांना यापूर्वीही अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

*** द्वारकानाथ लेले यांना पुरस्कार**

रंगत-संगत प्रतिष्ठान आणि साहिल फाऊंडेशनतर्फे देण्यात येणारा 'काव्य प्रतिभा पुरस्कार' यंदा काव्यशिल्प संस्थेचे संस्थापक आणि ज्येष्ठ पत्रकार द्वारकानाथ लेले यांना लेखक सविता भावे यांच्या हस्ते ३० ऑगस्टला प्रदान करण्यात आला.

*** नऊ वर्षांच्या झूनीच्या पुस्तकाला पुरस्कार**

नऊ वर्षांच्या झूनी चोप्रा हिच्या 'द लँड ऑफ ड्रीम्स' या पुस्तकाला 'फेडरेशन

ऑफ इंडियन पब्लिशर्स'ने कौतुकाची दाद दिली. अमेय प्रकाशनने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाला बालवाङ्मय विभागात उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीचा पुरस्कार (अॅवॉर्ड फॉर एक्सलन्स इन बुक प्रॉडक्शन) पुरस्कार जाहीर झाला आहे. चित्रपट निर्माते-दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा हे वडील आणि स्तंभलेखिका, समीक्षक अनुपमा चोप्रा ही आई. त्यामुळे झूनीला सर्जनशीलता, कल्पकता आणि लेखनाचे बाळकडू न मिळेल तरच नवल. पशू-पक्ष्यांची, निसर्गाची अद्‌भुत दुनिया, प्लेस्टेशन्ससारख्या तांत्रिक गोष्टींचे गूढरम्य जग आणि चांगल्या-वाईट गोष्टींचे पैलू झूनीने कविता आणि गोष्टींच्या माध्यमातून या पुस्तकातून उलगडले.

या पुस्तकाबरोबरच 'इट प्रे लव्ह' या पुस्तकाचीही प्रादेशिक भाषा विभागात उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीच्या द्वितीय पुरस्कारासाठी निवड झाली आहे. एलिझाबेथ गिल्बर्टलिखित हे पुस्तक जागतिक स्तरावर बेस्टसेलर ठरले. या पुस्तकावर आधारित चित्रपटात ज्युलिया रॉबर्टस्‌ची भूमिका गाजली.

## * डॉ. ह. वि. सरदेसाई यांना पुण्यभूषण पुरस्कार

''अंधश्रद्धा माणसाला विनाशाकडे नेते; तर सत्‌श्रद्धा या मोठ्या शक्तीच्या जोरावर ध्येय गाठता येते. देवाकडे सद्‌बुद्धी मागा आणि कर्माच्या आधारे आपले ध्येय गाठण्याचा प्रयत्न करा,'' असा सल्ला डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी 'त्रिदल पुणे' चा 'पुण्यभूषण' पुरस्कार स्वीकारताना केले.

डॉ. सरदेसाई म्हणाले, ''पुरस्कार म्हणजे व्यक्तीने केलेल्या कामाची पावती, शाबासकी आणि प्रेमाने पाठीवर दिलेली थाप असते. थोपटणे, बदल, वेळापत्रक ठरविण्याची गरज आणि सद्‌बुद्धी याच्या आधारे सुखी होता येते. थोपटणे ही माणसाच्या मनाची गरज असते. मातेच्या हृदयाच्या ठोक्याबरोबर ध्वनी निर्माण होतो. हा नाद गर्भाच्या मेंदूत लय निर्माण करतो. मूल रडताना खांद्यावर घेऊन त्याला थोपटले की हृदयाच्या ठोक्याची आठवण होते. मूल दीड-दोन वर्षांचे झाले की भाषा शिकू लागते. तेव्हा हे थोपटणे शाब्दिक होते. बदल ही महत्त्वाची गरज आहे. रमणीय, सुंदरतेचे आकर्षण हे बदलाचे स्वरूप आहे. वेळापत्रक ठरविण्याची गरज आहे. त्यामुळे मी आता काय करू, हा प्रश्न पडणार नाही आणि कंटाळादेखील येणार नाही. सत्‌श्रद्धेच्या जोरावर माणूस आजारातून बरा होतो. एवढेच नव्हे; तर मोठे ध्येय गाठू शकतो. आत्मबोध झाला नाही तर आपण संतुष्ट होऊ शकणार नाही. भौतिक गोष्टींच्या अपेक्षेसाठी, सुसूत्र विचारांसाठी आणि मनाच्या शक्तीसाठी धर्मावर श्रद्धा ठेवा.''

डॉ. बालाजी तांबे म्हणाले, ''केवळ गोळ्या खाऊन आरोग्य टिकविता येणार नाही; तर त्यासाठी व्यायाम महत्त्वाचा आहे हे डॉ. सरदेसाई यांचे व्याख्यान ऐकून

मला नेमकेपणाने समजले. स्त्री आरोग्य आणि संततीसाठी त्यांनी 'घरोघरी ज्ञानेश्वर जन्मती' हे पुस्तक लिहिले. त्यांचे कार्य पुढे नेण्यासाठी आणि घरोघरी ज्ञानेश्वर जन्माला यावेत, या उद्देशाने मी गर्भसंस्कार हे पुस्तक लिहिले. डॉक्टरांच्या केवळ स्पर्शातून रुग्ण ९० टक्के बरा होतो आणि त्याला वेगळाच आत्मविश्वास येतो. मोरपिशा शाईने ते आरोग्याची गॅरंटी लिहून देतात. भौतिकतेबरोबरच धार्मिक आणि अध्यात्मिक ज्ञानाचा आणि शास्त्राचा उपयोग करून ते रोग्याला बरे करतात.''

योगाचार्य अय्यंगार म्हणाले, ''आरोग्याच्या संपत्तीसाठी काम करणारे सरदेसाई हे खरे कर्मयोगी आहेत. योगामध्ये रोग निवारणाची शक्ती आहे. पुण्यानेच मला योगाचे शिक्षण आणि पाच खंडामध्ये प्रसाराची प्रेरणा दिली.''

*** कृ. श्री. अर्जुनवाडकर यांना महर्षी बादरायण व्यास सन्मान**

गेली सहा दशके अध्ययन, अध्यापन, संपादन आणि लेखनामध्ये योगदान देणारे ज्येष्ठ संस्कृततज्ज्ञ प्रा. कृष्ण अर्जुनवाडकर यांना यंदाचा महर्षी बादरायण व्यास सन्मान जाहीर झाला आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे स्वातंत्र्यदिनी या पुरस्काराची घोषणा करण्यात आली.

मराठी, संस्कृत, अर्धमागधी आणि पाली भाषांतील व्याकरणाचे अभ्यासक, तसेच योगशास्त्र, गीता आणि काव्यशास्त्र या विषयांवर विपुल लेखन करणारे लेखक, असे अर्जुनवाडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू आहेत. ''या पुरस्काराच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर आपल्या कार्याची नोंद घेतली गेली याचा आनंद झाला.'' अशी भावना प्रा. अर्जुनवाडकर यांनी व्यक्त केली.

संस्कृततज्ज्ञ पाणिनीच्या धर्तीवर लघुव्याकरणावर आधारित 'महाराष्ट्र प्रयोग चंद्रिका', 'मराठी व्याकरण : वाद आणि प्रवाद', 'मराठी व्याकरणाचा इतिहास', 'मम्मटभट्टविरचित काव्यप्रकाश', 'मोरो केशव दामले यांचे शास्त्रीय मराठी व्याकरण' ही त्यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. स. प. महाविद्यालय, वाडिया महाविद्यालय, मुंबई विद्यापीठ, कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन येथील योग विद्यापीठ येथे त्यांनी अध्यापनाचे कार्य केले. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे दोनशेहून अधिक शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. 'इंटरनॅशनल ऑथर्स अँड रायटर्स'च्या 'हूज हू' मध्ये त्यांचा समावेश आहे.

*** शरद जोशी यांना 'जीवनगौरव'**

शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांची 'चतुरंग'च्या यंदाच्या जीवनगौरव पुरस्कारासाठी निवड झाली आहे. सामाजिक क्षेत्रासाठी दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचे स्वरूप एक लाख रुपये, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे आहे.

शेतकऱ्यांची संघटना बांधण्यासाठी आणि शेतीविषयक बहुविध प्रश्नांची तड

लावण्यासाठी कृतिशील चळवळ उभारण्याच्या कामी जोशी यांनी अथक परिश्रम केले आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव व्हावा, या भावनेने प्रतिष्ठानने यावर्षी सामाजिक जीवनगौरव पुरस्कारासाठी जोशी यांची निवड केल्याचे पत्रकात म्हटले आहे. डॉ. अरुण टिकेकर यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. द. ना. धनागरे, डॉ. तात्याराव लहाने, डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, अविनाश धर्माधिकारी, सुधीर जोगळेकर आणि प्रफुल्ला डहाणूकर हे निवड समितीचे सदस्य होते.

*** सारिका मोरे यांना नारायण सुर्वे पुरस्कार**

महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेतर्फे दिला जाणारा पहिला पद्मश्री नारायण सुर्वे साहित्य पुरस्कार सारिका उमेशचंद्र मोरे यांच्या 'शिंपल्यातील मोती' या काव्यसंग्रहाला ज्येष्ठ संगीतकार पं. यशवंत देव, प्रसिद्ध कवी फ. मुं. शिंदे यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी सुर्वे यांच्या पत्नी कृष्णाबाई, प्रा. प्रशांत मोरे आदी उपस्थित होते.

*** मुरलीधर जगताप याना साने गुरुजी पुरस्कार**

हिंदी भाषेचे प्रचारक व लेखक मुरलीधर जगताप यांना महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा साने गुरुजी राष्ट्रीय एकता पुरस्कार (रोख रुपये ५१ हजार व सन्मानचिन्ह) हिंदी दिनानिमित्त मुंबई येथे देण्यात आला.

अहिंदी भाषिक हिंदी लेखकांना केंद्र सरकारतर्फे दिला जाणारा 'गंगाशरण सिंह' हा एक लाख रुपयांचा मानाचा पुरस्कार या आधीच त्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते लाभला आहे. पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी भाषा शिक्षणविषयक अनेक उपक्रमांमधून त्यांनी सातत्याने अध्यापन व मार्गदर्शन केले आहे. पुणे विद्यापीठ विधी सभेचे व शिवाजी विद्यापीठ अभ्यास मंडळाचे ते दीर्घकाळ सदस्य होते. महाराष्ट्र बँकेच्या राज्यभाषा विभागाचे प्रमुख म्हणूनही त्यांनी काम पाहिले असून, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या माध्यमातून हिंदी भाषेच्या प्रचारासाठी ते आजही कार्यरत आहेत. त्यांनी ३० पुस्तकांचे लेखन-संपादन केले असून, २४ पुस्तकांचा हिंदीतून अनुवादही केला आहे. त्यांचे 'महात्मा फुले' हे पुस्तक कन्नड भाषेतही झाले आहे.

*** उत्कृष्ट लोकप्रशासनाबद्दल विजय नाहटा यांचा गौरव**

अपंग शिक्षण व प्रशिक्षण केंद्र (ईटीसी) सुरू केल्याबद्दल, तसेच २००९-१० या वर्षासाठी लोकप्रशासनात बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल, पालिकेचे तत्कालीन आयुक्त व विद्यमान माहिती, जनसपर्क महासंचालक विजय नाहटा यांना पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

एक लाख रुपये रोख, पदक आणि सन्मानपत्र असे स्वरूप असलेल्या या पुरस्कारासाठी देशभरातून केवळ पाच प्रकल्पांची निवड करण्यात आली होती. अपंग

विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी नवी मुंबई महापालिकेतर्फे तत्कालीन आयुक्त असलेल्या नाहटा यांनी २८ जून २००७ ला हे केंद्र सुरू केले. या केंद्रामध्ये विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण व प्रशिक्षण देण्याबरोबरच अपंगत्वाचे निदान आणि उपचार, नि:शुल्क शैक्षणिक साहित्य दिले जाते.

*** सिंगापूर कलासंग्रहालय स्पर्धा**

सिंगापूर कलासंग्रहालयाकडून ४५ हजार अमेरिकन डॉलरच्या कलापुरस्कारासाठी पाच भारतीय कलावंतांना उपान्त्य फेरीत नामांकन लाभले. यात अतुल भल्ला, प्रभावती मेपायिल, शिल्पकार रवी शहा, शिबा छाच्छी आणि श्रेयस कार्ले यांचा समावेश आहे.

आशिया प्रशांत क्षेत्रातील २४ देशांतील १३० चित्र, छायाचित्र व शिल्पांची त्रैवार्षिक 'सिग्नेचर आर्ट प्राइज'च्या उपान्त्य फेरीसाठी निवड झाली असून त्यात या पाच कलावंतांचा समावेश आहे.

या १३० कलाकृतींतून एक ऑक्टोबरला अंतिम फेरी आणि १८ नोव्हेंबर विजेत्यांची घोषणा होणार आहे.

दिल्लीला राहाणारे ४७ वर्षांचे अतुल यांनी यमुनेकाठची वाळू, सिरॅमिक टाइल्स तसेच लाकूड आदींचा वापर करून पाणी, नागरी पर्यावरण आणि लोकसंख्या यांचा वेध घेणारी 'छबील' ही कलाकृती साकारली आहे. बंगळुरूचे रवी शहा हे काष्ठशिल्पकार म्हणून प्रसिद्ध असले तरी चित्रकला व छायाचित्रकलेतही त्यांचा मोठा वावर आहे. चंपक वृक्षाच्या लाकडापासून बनविलेले 'मीट ॲट लास्ट/द हग' हे त्यांचे काष्ठशिल्प या स्पर्धेत आहे. श्रेयस कार्ले यांचे 'चिडिया उड' हे कॅनव्हासवरील कोलाज स्पर्धेत आहे.

*** शंकर महादेवन यांना आशा भोसले पुरस्कार**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शहर शाखेच्या वतीने देण्यात येणारा आशा भोसले पुरस्कार प्रसिद्ध गायक-संगीतकार शंकर महादेवन यांना जाहीर झाला आहे. पुरस्काराचे हे दहावे वर्ष आहे. शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी ही माहिती दिली आहे. स्मृतिचिन्ह आणि रोख एक लाख ११ हजार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

*** सर्वोत्कृष्ट नायिकेचा राष्ट्रीय पुरस्कार**

मराठी चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार पटकाविणाऱ्याचा मान अभिनेत्री मिताली जगताप-वराडकर हिने मिळवला.

राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांवरील मराठीची मोहोर अगदी 'श्यामची आई' या चित्रपटापासूनची आहे. मराठी चित्रपटसृष्टीला आलेली मरगळ 'श्वास'ला राष्ट्रीय

सन्मान मिळाल्यानंतर दूर झाली आणि यंदाही 'बाबू बॅन्ड बाजा' या चित्रपटाने राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये मराठीची पताका उंचावली. मात्र  देशातील सर्वोत्कृष्ट अभिनेत्री या कॅटॅगरीत मराठी चित्रपटाची नायिका अजूनपर्यंत पोचली नव्हती. मितालीच्या यशाने ती उणीवही आता दूर केली.

आतापर्यंत रोहिणी हट्टंगडी, विजया मेहता, सुहासिनी मुळ्ये, उत्तरा बावकर या ज्येष्ठ अभिनेत्रींनी हिंदी सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्रीचा पुरस्कार पटकावला होता. तर पल्लवी जोशीला 'वोह छोकरी' सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी ज्युरी पुरस्कार मिळाला होता.

*** विज्ञान प्रसार पुरस्कार**

''विज्ञानाच्या आधारे जगत असताना व्यक्तींचा जीवनावश्यक दृष्टीकोनही विज्ञानाधिष्ठित असला पाहिजे. त्यामुळे अनेक समस्या सुटू शकतील,'' असे प्रतिपादन पुणे विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. मनोहर जाधव यांनी केले.

इंडियन फिजिक्स असोसिएशनच्या पुणे विभागातर्फे विज्ञानप्रसाराच्या क्षेत्रात कार्यरत व्यक्तींना शिक्षक दिनी पुरस्कार प्रदान करण्यात येतात. मराठीतून विज्ञानप्रसार केल्याबद्दल मो. वा. चिपळोणकर पुरस्कार यंदा कविता भालेराव व डॉ. गिरीश पिंपळे यांना विभागून देण्यात आला. वरिष्ठ महाविद्यालय गटातून प्रा. डॉ. प्रमिला लाहोटी यांना डॉ. भास्कर राय पुरस्कार, कनिष्ठ महाविद्यालय गटातून भौतिकशास्त्र विषयात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल प्रा. संजय नेणे यांना एम. आर. भिडे पुरस्काराने या वेळी गौरविण्यात आले.

सागर जगताप व संभाजी वारुळे या विद्यार्थ्यांना संशोधनाबद्दल डॉ. रविकुमार भल्ला पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पदवीधर व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना 'प्रोजेक्ट'मध्ये मोलाचे मार्गदर्शन करून संशोधन केल्याबद्दल प्रा. डॉ. मधुकर झांबरे यांना डॉ. आर. चंद्रशेखर मेमोरिअल पुरस्कार देण्यात आला.

जाधव म्हणाले, ''विज्ञानाचा वापर आपण करतो. मात्र, शिकलेल्या व्यक्तीही पारंपरिक विचारसरणीतच गुरफटलेल्या दिसतात. हे चित्र बदलण्यासाठी विज्ञान सोप्या भाषेत सर्वसामान्यांपर्यंत पोचणे गरजेचे आहे. त्याची जबाबदारी विज्ञान लेखक, विज्ञानाचे प्राध्यापक व विद्यार्थी यांच्यावर आहे.'' विज्ञान हे शोधनिबंध किंवा संशोधन यापुरते मर्यादित राहून उपयोग नाही. त्याचा प्रसार होणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या कार्यक्रमातून व्यक्त होणारे विचार विज्ञानाच्या प्रसाराला उपयुक्त ठरतील,'' अशी अपेक्षा डॉ. विद्यासागर यांनी व्यक्त केली.

❐

नवे कोरे

# कृष्णायन

**काजल ओझा-वैद्य**

अनुवाद

**प्रा. सुधीर कौठाळकर**

**२००रु. पोस्टेज २५रु.**




''स्त्रिया एकमेकींपेक्षा वेगळ्या का बरं नसतात....?''

द्रौपदीच्या महालात घडलेली घटना डोळ्यांसमोर येऊन, अश्वत्थाखाली बसलेल्या कृष्णाच्या मनात अनेक विचार येत होते....

''कोणत्याही युगात, कोणत्याही वयाची स्त्री एकसारखाच विचार करते. एकसारखाच अनुभव घेते. समान बाबतीत वेदना अनुभवते. एकसारख्या गोष्टीबद्दल रागावते. राग व्यक्त करण्याची रीत पण एकसारखीच असते.'' असे का? हा प्रश्न कृष्णाच्या मनात आला आणि त्यावर तो स्वत:च हसलाही.

या प्रश्नाला आता काही अर्थ होता का? आयुष्य जगून झालं होतं... ''आपल्या जीवनात आलेल्या महत्त्वाच्या तीनही स्त्रिया आपल्याबद्दल एकसारख्याच संवेदना का अनुभवत होत्या? एकाच पद्धतीनं दु:खी का होत होत्या?

खरं तर असा विचार करण्याची वेळही आता निघून गेली होती. आता होतं ते... केवळ स्मरण...!

प्रत्यक्ष दृष्टीसमोर त्या स्त्रिया नव्हत्याच. तरीही त्या तिघींचे डोळे त्याच्याकडे बघत होते... आशेनं, अपेक्षेनं, उपहासानं ...

प्रेयसी... पत्नी... आणि सखी... त्या तिघी जणी... खळाळणाऱ्या प्रवाहाबरोबर वाहत जणू म्हणत होत्या... ''तुझ्यात विलीन होण्यातच आमच्या जीवनाचं सार्थक आहे. तुझा खारटपणा स्वीकार्य आहे. कारण तूच आम्हाला विशालता दिलीस, अमर्याद पसरण्याचा अस्तित्वबोध तूच दिलास... आमचं प्रखर तेज सामावून घेऊन आम्हाला तूच शीतलता दिलीस ... आमचं स्त्रीत्व स्वीकारून अखंड प्रेम दिलंस ....''

# वाचकांचा प्रतिसाद



डॉ. संजय ढोले,

आदरणीय सर,

एक वाचक म्हणून आपल्या 'अश्मजीव' ह्या विज्ञानकथासंग्रहा संदर्भात ही छोटीशी प्रतिक्रिया.

मला आपला विज्ञानकथासंग्रह खूप आवडला. आपला विज्ञानकथासंग्रह विज्ञानाविषयी गोडी निर्माण करणारा तसेच विज्ञानाची फार थोडी माहिती असणाऱ्या व विज्ञानाशी निगडीत नसणाऱ्या व्यक्तींना विज्ञानाच्या किमयेने जागृत करणारा आहे. आपण दिलेल्या वैज्ञानिक प्रयोगांच्या स्पष्टीकरणावरून विज्ञानाला एक दिशा मिळणार आहे. आपला विज्ञानकथासग्रंह त्यासाठी एक प्रेरणास्त्रोतच ठरणार आहे.

माझ्यासारखे इतर वाचकही आपल्या पुढील विज्ञानकथा संग्रहाची वाट पाहणार आहेत!

प्राजक्ता पाटील, धुळे

सौ. सुरेखा शहा,

सस्नेह नमस्कार.

आपले 'थेंबभर पाणी, अनंत आकाश' पुस्तक नुकतेच वाचले. आवडले.

डिस्टिंक्शन करियरचा वकील स्पर्धा परीक्षेतून डेप्युटी कलेक्टर होतो. परंतु वकीली वा नोकरी न करता शेतीविकास सामुग्रीचा उद्योगपती बनतो. अशा भवरलाल जैन नामक अमृतमहोत्सवी व्यक्तीची चरित्रकथा लिहिणं तसं कठीण काम. पण आपल्यातल्या लेखिकेनं ते आव्हान चिकित्सकपणे मार्मिकरीत्या पेललंय. मनस्वी अभिनंदन!

ती केवळ वाट न ठेवता, तिचा एक्सप्रेस हायवे केला. पीव्हीसी पाइप, ठिबक सिंचन, तुषार सिंचन म्हणजेच भवरलाल जैन! - अशी ओळख महाराष्ट्रातच जैन उद्योगसमूहात रूपांतर झाले. जळगावमध्ये रुजलेल्या या रोपट्याचा यथावकाश भव्य वटवृक्ष होऊन त्याच्या पारंब्या-फांद्या गुजरात, आंध्र, तामिळनाडू आदि राज्यात पसरल्या, फोफावल्या.

या अभिनव कृषी उद्योगाचा एवढा बोलबाला झाला की, भवरभाऊंना अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार तर मिळालेच पण राष्ट्रपतींचा पद्मश्री हा नागरी किताबही

लाभला. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने डि. लिट्. पदवी त्यांना प्रदान केली.

हे सारे करताना भवरभाऊंचे स्थलांतर वाकोद खेड्यातून जळगावला झाले. तरीही जन्मखेड्याची नाळ त्यांनी तोडली नाही. वाकोद - आईपांढरीत सौरदिवे, कॉंक्रीट रस्ते, हायस्कूल, हॉस्पिटल, नदीघाट भाऊनी उभारले. हे विशेष कौतुकास्पद.

लेखनापूर्वी जैन हिल्स जळगाव व वाकोदला आपण अनेकदा भेटी दिल्याने चरित्रलेखनात जिवंतपणा आलाय. 'गती तेथे प्रगती' 'जेथे कमी तेथे आम्ही' 'पाणी, माती या मूलभूत कृषी-घटकांचे जतन हाच ध्यास' 'निर्णयाआधी सर्वांगीण दीर्घ विचार, नंतर मात्र वेगवान कार्यवाही' 'नियोजन, नियमितपणा, निर्व्यसनी ही यशाची त्रिसूत्री' या चमकदार शब्दप्रयोगात चरित्रनायक दिसतो आणि लेखिकाही दिसते!

एक प्रेरणादायी, प्रवाही अशी अभिनव चरित्रगाथा लिहिल्याबद्दल आपले अभिनंदन!

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ख्यातकीर्त परंपरेला साजेशी देखणी ग्रंथनिर्मिती झाल्याने 'पाणी-आकाश' चे वाचन अधिक आल्हाददायी! हार्दिक धन्यवाद.

प्राचार्य दिपा महानवर लोणंद, जि. सातारा.

'थेंबभर पाणी आणि अनंत आकाश' हे सौ. सुरेखा शहा याचे पुस्तक नुकतेच वाचले आणि  अनंत अमुची ध्येयासक्ति अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला' या ओळी आठवल्या.

सामान्य शेतकऱ्याच्या उत्थानाला जीवनध्येय म्हणून स्वीकारलेले भंवरलाल, पण त्याचबरोबर स्वतंत्र उद्योगाला गरजेचे असणारे व्यावहारिकता, विक्री धोरण, मार्केटिंग आर्थिक शिस्त आणि नाविन्याची उत्कट ओढ हे गुणही त्यांच्यात एकत्र नांदताहेत.

भंवरलालजीच्या कौटुंबिक परिस्थितीचे वर्णन अतिशय बहारदारपणे केले आहे. त्या वर्णनात मन गुंगून जाते. हाती धरलेले पुस्तक खाली ठेवावेसे वाटत नाही. जणू आपली एक सखीच आपल्याशी बोलत आहे असे वाटते. जळगावसारख्या पाण्याचे दुर्भिक्ष असणाऱ्या ठिकाणी नंदनवन फुलविणे ही सोपी गोष्ट नव्हती. पण भंवरलालजींनी आपल्या अथक परिश्रमाने ही गोष्ट साध्य केली. त्याचे वर्णन करतानाची लेखिकेची शैली वर्णनात्मक नसून पृथ:करणात्मक आहे. परिस्थितीचे सर्व कंगोरे मांडले आहेत.  त्यांनी स्वत: ३-४ वेळा थेट भेट देऊन भंवरलालजींच्या प्रकल्पांची इत्थंभूत पाहणी केली आहे. त्यांची चत्रदर्शी शैली आहे. पाणी म्हणजे जीवन. शेतकऱ्यांचा जीवनाधार. पण त्याच्या अभावाने शेतकऱ्यांच्या जीवनाची  दुर्दशा होत होती. मातीतून सोनं आणि दगडातून पाणी काढण्याची किमया त्यांनी केली आहे.

एक वाचक

❐

# श्रद्धांजली

*** रोहिणी कुलकर्णी**

'भेट' चित्रपटाच्या लेखिका आणि कथा-कादंबरीकार रोहिणी कुलकर्णी (वय ७७) यांचे अल्पशा आजाराने जबलपूर येथे नुकतेच निधन झाले. त्यांच्यामागे पती, दोन मुली आणि नातवंडे असा परिवार आहे. इंदूर येथे वास्तव्यास असलेल्या कुलकर्णी यांच्या कथा १९६५ ते १९९३ या काळात हंस, सत्यकथा, किर्लोस्कर मासिकांतून प्रसिद्ध होऊ लागल्या. 'भेट' या दीर्घकथेने त्यांनी वाचकांचे लक्ष वेधून घेतले. त्यांचे 'गर्भफूल', 'बहार', 'फलश्रुती', 'स्टार नाइट' हे कथासंग्रह आणि 'कृतार्थ', 'सातवं दालन', 'स्वातीचा उ:शाप', 'तिन्हीसांज', 'गर्भनाळ' आणि 'पिंपळफेरे' या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'भेट' या दीर्घकथेवर शं. ना. नवरे यांनी 'मला भेट हवी, हो!' हे नाटक आणि चंद्रकांत कुलकर्णी यांचा 'भेट' हा चित्रपट आला होता. त्यांच्या 'आशीर्वाद' कथेला शांताराम पारितोषिक मिळाले होते. मध्य प्रदेश साहित्य अकादमी आणि महाराष्ट्र सरकारच्या पुरस्काराच्या त्या मानकरी होत्या.

*** श्रीनिवास खळे**

स्वत:च्या अनवट रचनांची बहुमोल भर टाकत मराठी भावसंगीत विश्वात 'शुक्रताऱ्या'समान स्थान निर्माण करणारे श्रेष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे यांचे २ सप्टेंबरला वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. मुंबईत प्रदूषणाचा त्रास होत असल्याने दोन वर्षांपासून ते ठाण्यात रहायला आले होते.

त्यांच्या पश्चात पत्नी वसुमती तसेच शमा, संजीवनी आणि सोनाली या मुली, जावई बिपीन चौधरी, स्वप्नील कुलकर्णी आणि नातू असा परिवार आहे.

कविवर्य मंगेश पांडगावकर, ज्येष्ठ गायक अरुण दाते, ज्येष्ठ अभिनेत्री-गायिका आशालता, संगीतकार अनिल मोहिले, कमलेश भडकमकर, मिलिंद जोशी, गायक शंकर महादेवन, स्वप्नील बांदोडकर, अजित परब, मंदार आपटे, नीलेश परब, पुष्कर श्रोती, गायिका माधुरी करमरकर, सायली जोशी, महापालिका आयुक्त आर. ए. राजीव, आमदार जीतेंद्र आव्हाड, प्रताप सरनाईक, विनोद तावडे आदींनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले.

‘राम श्याम गुण गान’ या भक्तिरचनांच्या अल्बमनिमित्त लता मंगेशकर आणि पं. भीमसेन जोशी या ‘भारतरत्न’ना त्यांनी एकत्र आणले. भावगीते, भक्तिगीते, नाट्यसंगीत, बालगीते, चित्रपटगीते असे सर्वच प्रकार त्यांनी समर्थपणे हाताळले. त्या त्या विषयातील आवडती दोन-तीन गाणी आठवायची म्हटली तरी त्यात खळेंनी संगीतबद्ध केलेले एखादे गाणे असते. उदा. बालगीत म्हटले की ‘गोरी गोरी पान’, ‘किलबिल किलबिल’, भक्तीगीतांचा विषय निघाला तर ‘सुंदर ते ध्यान’, ‘भेटी लागे जीवा’, खेळ मांडियेला वाळवंटी अशी अनेक गाणी आठवतात. तुलनेने त्यांनी खूप थोड्या चित्रपटांना संगीत दिले असले तरी त्यातील ‘या चिमण्यांनो परत फिरा रे’ (लता मंगेशकर), ‘लळा जिव्हाळा शब्दच खोटे’ (सुधीर फडके), ‘पाण्यातले पाहता’, ‘आली आली सर ही ओली (आशा भोसले) आणि इतर गाणी रसिकांच्या कायमची स्मरणात आहेत. संयुक्त महाराष्ट्राची सिग्नेचर ट्यून अशी उदंड लोकप्रियता मिळालेले शाहीर साबळेंनी गायलेले महाराष्ट्रगीत (जय जय महाराष्ट्र माझा), माझे राष्ट्र महान अशी स्फूर्तीगीतेही त्यांनी संगीतबद्ध केली. ‘उगवला चंद्र पुनवेचा’, ‘कळा ज्या लागल्या जीवा’, ‘प्रेम हे वंचिता’ ही त्यांची नाट्यगीते वैशिष्ट्यपूर्ण ठरली. एक अष्टपैलू संगीतकार म्हणून खळेंची ओळख असली तरी खळे म्हटले की प्रथम आठवतात ती त्यांची सदाबहार भावगीते. ‘श्रावणात घन निळा बरसला’, ‘लाजून हासणे अन्’, ‘जेव्हा तुझ्या बटांना’, ‘सहज सख्खा एकटाच’, ‘या गडे हासूया’, ‘पहिलीच भेट झाली’, ‘जाहल्या काही चुका’, ‘राहिले ओठातल्या ओठात’, ‘बगळ्यांची माळ फुले’, ‘आला पाऊस मातीच्या वासात गं’, ‘हात तुझा हातातुन’, ‘भावनांचा तू भुकेला’, ‘कंठातच रुतल्या ताना’, ‘जाहल्या काही चुका’ अशी त्यांची अनेक गाणी मराठी मनावर अधिराज्य गाजवीत आहेत. संगीत क्षेत्रातील अनेक मानाचे पुरस्कार त्यांना लाभले. शासनाने पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले.

*** गौतम राजाध्यक्ष**

भारतीय चित्रपटसृष्टीत ग्लॅमरस छायाचित्रणाचे नवे दालन खुले करणारे आणि चंदेरी दुनियेतील ‘चेहऱ्यां’ना स्वत:ची ओळख मिळवून देणारे प्रथितयश छायाचित्रकार गौतम राजाध्यक्ष यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ६१ वर्षांचे होते. चंदनवाडी स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

पुण्यातील सिम्बायोसिस संस्थेत छायाचित्रणाचा प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्याच्या कामात व्यग्र असलेले गातम राजाध्यक्ष गेले काही दिवस प्रकृतीच्या किरकोळ कुरबुरींनी त्रस्त होते. १६ सप्टेंबर रोजी, एकसष्टाव्या वाढदिवशी, अभ्यासक्रमाचा आरंभ करण्याचा त्यांचा मानस होता. परंतु त्यापूर्वीच आकस्मिकपणे त्यांची प्राणज्योत मालवली.

‘लिंटास’ या जाहिरात कंपनीतील नोकरी सोडून छायाचित्रणाला वाहून घेतलेल्या

गौतम राजाध्यक्ष यांनी१९८० मध्ये शबाना यांचे फोटोसेशन केले. त्यानंतर सिनेसृष्टीतील बहुतांश चेहऱ्यांना राजाध्यक्ष याच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीचा परिसस्पर्श झाला. राजाध्यक्ष यांनी बेखुदी, अंजाम, सखी या सिनेमांचे पटकथा लेखनही केले.

*** साहित्यिक मनोहर पुरंदरे**

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदर यांचे धाकटे बंधू मनोहर पुरंदरे (वय ८३) यांचे नाशिक येथे १७ ऑगस्ट रोजी निधन झाले.

मनोहर पुरंदरे यांच्या निधनाने पुरंदरे वाड्याची रसिकता अंतर्धान पावली, अशा शब्दांत बाबासाहेब पुरंदरे यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. चालताबोलता कोश असा त्यांचा लौकिक होता.

मूळचे सासवडचे असलेले मनोहर पुरंदरे नाशिकला स्थायिक झाले. त्यांनी हंस, मोहिनी, नवल या मासिकांच्या संपादकीय विभागात प्रारंभी काम केल्यानंतर 'अमृत'मध्ये वीस वर्षांहून अधिक काळ सहसंपादक म्हणून काम केले. अनेक वृत्तपत्रांत त्यांनी नाटक आणि चित्रपटांवर विपुल लेखन केले.

'अध्यक्षीय नाट्य सूर्यमाला' व 'अध्यक्षीय साहित्य सूर्यमाला' या संदर्भग्रंथांचे लेखन त्यांनी केले. त्यांनी निवृत्तीनंतर नाशिक सार्वजनिक वाचनालयाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्न केले. त्यांच्या मागे पत्नी, भाऊ, मुलगा, मुलगी, सून व नातू असा परिवार आहे.

*** संगीततज्ज्ञ वि. रा. आठवले**

ज्येष्ठ शास्त्रीय संगीततज्ज्ञ पं. वि. रा. आठवले (वय ९२) यांचे विलेपार्ले येथील राहत्या घरी १३ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, मुली, नातवंडे, जावई असा परिवार आहे.

संगीत क्षेत्रात संपूर्ण आयुष्यभर सेवा केलेले आठवले हे नवी मुंबईत वाशी येथे असलेल्या अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय स्मारक भवनाचे संस्थापक अध्यक्ष होते. या वास्तूसाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. त्यांनी शास्त्रीय संगीत या विषयावर अनेक पुस्तके लिहिली. त्यांच्यावर आग्रा गायकीचे खोल संस्कार होते.

*** स्त्रीवादी दिग्दर्शक जगमोहन मुंद्रा**

बवंडर, विषकन्या, शूट ॲट साइट यासारखे समकालीन विषय सिनेमाच्या माध्यमातून हाताळणारे दिग्दर्शक जगमोहर मुंद्रा (६२) यांचे निधन झाले.

बवंडर(सन २०००) हा राजस्थानातील भंवरीदेवी प्रकरणावरील त्यांचा सिनेमा विशेष गाजला. नागपुरात १९४८ मध्ये जन्मलेले मुंद्रा यांनी हॉलिवूडमध्येही चित्रपट निर्मिती केली. ऐश्वर्या रायला घेऊन काढलेला प्रोव्होक्ड गाजला. कमला, बवंडर आणि प्रोव्होक्ड ही आपल्या स्त्रीवादी सिनेमांची त्रिवेणी आहे, असे ते म्हणत.

मुंद्रांची पार्श्वभूमी एका कर्मठ कुटुंबातील पण त्यांचे सिनेमे बोल्ड सीन्ससाठी गाजले.

मुंबई आयआयटीचे ते पदवीधर होते. पण इंजिनीअरिंग हा आपला प्रांत नाही, हे त्यांना तिथेच उमगले पुढे एमएस करण्यासाठी अमेरिकेत गेले. तिथे त्यांनी 'सिनेमाचे मार्केटिंग' या विषयावर प्रबंध सादर केला. यानिमित्ताने ते चित्रपट निर्मिती क्षेत्राकडे ओढले गेले. पीएच.डी. नंतर वर्षभर कॅलिफोर्नियात प्राध्यापकी करून ते पूर्णवेळ चित्रपट निर्मितीत पडले.

हिंदीमध्ये सुराग, कमला, विषकन्या, बवंडर, अपार्टमेंट, चेस, शूट ॲट साइट, प्रोव्होक्ड, नॉटी ४० हे चित्रपट त्यांनी प्रदर्शित केले.

हॉलिवूडमध्ये त्यांच्या नावावर द जिगसॉ मर्डर्स, हॅलोवीन नाइट, नाइट आईज, लॉज एंजेलिस गॉडेस, सेक्शुअल मॅलिस, टेल्स ऑफ द कामसूत्र-२: मान्सून हे सिनेमे जमा आहेत.

*** आचार्य शांताराम गरुड**

ज्येष्ठ विचारवंत आणि समाजवादी प्रबोधिनीचे संस्थापक आचार्य शांताराम जयराम गरुड (वय ८६) यांचे २ सप्टेंबरला निधन झाले.

मसूर (ता. कराड, जि. सातारा) हे आचार्य गरुड यांचे मूळ गाव. लहानपणीच त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. त्यामध्ये त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. स्वातंत्र्यानंतर त्यांनी समाजवादी पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षात काम केले. विविध प्रश्नांवर त्यांनी सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यात आंदोलने केली. इचलकरंजीत कामगारांच्या किमान वेतन प्रश्नावर यशस्वी आंदोलन केले.

❐

**सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावरही संपर्क साधू शकता**

**मेहता बुक सेलर्स**

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८.००
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

# बालनगरी

**भारतीय साबरी विद्येच्या पार्श्वभूमीवरील अफलातून फँटसी**

## अठ्ठाविसावे नक्षत्र

(मागील अंकावरून)

चांगदुष्टही आपले केस कराकरा खाजवत होता. ''हां, आठवलं!'' ओमने कान टवकारले.

''शंभरेक वर्षापूर्वी माझ्या बाच्या काळात असं एकदा घडलं होतं बघा. तेव्हा रिक्षा न्हैय टांगा चालवायचा माझा बा, हां. कुठचाच प्रसाद मिळेना. खूप तालेवार प्रस्थ होते ते! खूप शास्त्री खर्ची घातले, तेव्हा तोड मिळाली बघा.''

''काय तोड मिळाली?'' मंजुघोषाने चांगदुष्ट गप्पच झालेला बघून विचारले.

''काय का नीट आठवेना बघा.''

मंजुघोषाला त्याला काय म्हणायचेय ते नेमके कळले.

तो हळूच ओमच्या खांद्यावर येऊन बसला.

ओमच्या कानात कुजबुजला.

ओमने सरलकाकाने दिलेली खिशातली थैली चाचपडली. खिशातच हात घातला. चाचपडून एक नाणं काढलं. ते खिशाबाहेर काढताच त्याची सोनेरी झळाळी बघून ओम स्वतःच चकित झाला. ते नाणे चोचीत घेऊन मंजुघोषाने चांगदुष्टाच्या मांडीवर टाकले

''हां हां. आठवलं. त्याचं त्या जातकाचं अठ्ठाविसावं नक्षत्र होतं बघा. काहीतरी आक्रितच! अतिदुर्मिळ योग.''

''कुठलं नक्षत्र?'' मंजुघोषाने विचारले.

''अजून एक नाणं उकळल्यावर त्या नक्षत्राचे नाव चांगदुष्टाने सांगून टाकले. 'अभिजीत' पण त्या नक्षत्राचा आराध्य वृक्ष कोणता ते त्याला सांगता येईना. कारकुनालाच विचारा म्हणाला.''

मंजुघोषाने ओमकडून आधी एक नाणे नेले. मग अजून एक नाणे नेले. मग अजून एक असे करत हळूहळू सगळीच थैली रिकामी झाली.

ते झाड पुष्य नक्षत्राचे होते. पुष्य म्हणजे नक्षत्रांचा राजा.

मग मंजुघोषाने कारकुनांना गाऱ्हाणे घातले. ''हे पवित्र नक्षत्रवनातल्या, पवित्र

नक्षत्रकपींनो, हा उपहार स्वीकारा आणि या जातकाचा उद्धार करा. त्याचा मार्ग सुकर करा. या अतिदुर्मिळ योगाचे तुम्ही जाणकार आहात. कृपा करून त्याचा नक्षत्रवृक्ष उद्भूत करा. तुम्हाला स्वर्गातल्या पवित्र कल्पवृक्षाची आण! पवित्र संतान वृक्षाची आण! पवित्र देवमंदाराची आण! पवित्र पारिजाताची आण, पवित्र हरिचंदनाची आण.''

''होय महाराजा.'' चांगदुष्ट मागून ओरडला.

''होय महाराजा.'' त्याचे बघून ओम ओरडला.

माकडांमध्ये मोठी हुल्लड माजली. एक माणसाहूनही थोराड मोठे नरवानर झाडावरून उतरून खाली आले.

खंडाळ्याच्या घाटात ओमने काळतोंडी माकडांना चणे भरवले होते, त्या माकडांसारखेच ते होते. पण त्याच्या कपाळावर नक्षत्रचिन्हाची पांढरी खूण होती. ते शांतपणे पुढे आले. त्याने थैली उघडून पाहिली, चाचपडली, तिरस्काराने टाकून दिली. ते परत मागे झाडापाशी जाऊन बसले.

''अहो, वानरांना सोन्याच्या मोहोरांशी काय काम? तुमच्याकडे त्यांना देण्यासारखे दुसरे काही असले तर बघा.'' चांगदुष्ट रिक्षातूनच ओरडला.

ओमने खिसे उलटेपालटे करून पाहिले. खाण्यापिण्याचे त्याच्याकडे काहीच नव्हते. या वानरांना त्याची चॉकलेटं बहुतेक आवडली असती. उपासात मोह नको म्हणून ओमने खिशात भरली नव्हती. बाकी त्याच्याकडे दोन रुपयाचे स्वतःचे नाणे होते. त्याची माकडांना काही किंमत नव्हती.

मंजुघोष परत ओमच्या खांद्यावर चढला. कुजबुजला. ओमने त्याला अलगद हातावर घेतले. त्याच्या गळ्यापाशी चाचपडून तिथे बांधलेली एक दोरी शोधून काढली. तिची गाठ सोडवली. त्यात एक मोती होता. टपोरा पांढरा. तो ओमने भीत भीत थैली होती तिथे नेऊन ठेवला. माकडांची परत वरती जोरदार धावपळ, खेचाखेच सुरू झाली. खाली बसलेले नरवानर पुढे आले. त्याने वरती सर्वांना दात विचकून दाखवले. तो मोती हातात घेतला. पारखून बघितला आणि एकदम तोंडात टाकून गिळून टाकला. वरचा कोलाहल शांत झाला. मग त्या नक्षत्रकपीने बोटाने धुळीत काहीतरी गिरवले. मंजुघोष पटकन उडून त्या अक्षरावर झेपावला.

''पुत्रंजीव'' मग तो ''पुत्रंजीव, पुत्रंजीव,'' करत रिंगणात गरागरा फिरला. निराश होऊन ओमच्या समोर येऊन बसला. पुत्रंजीवाचे झाड यात तर नाही. ओमला तशीही त्यातली झाडे ओळखता येत नव्हती. एक माडाचे. बाकी कशाचा पत्ता लागत नव्हता.

''ते कसे असते?'' ओमने विचारले.

''अशी चक्राकार पाने लागलेली असतात. मोठाली थोडीशी तेलकट, खोड

मातकट भुऱ्या रंगाचे आणि.... मंजुघोषाने पुढचे बोलणे सोडून दिले. आपण एका शहरवासी, दहा वर्षाच्या मुलाबरोबर बोलतो आहोत हे तो विसरून गेला होता. यापेक्षा एखाद्या कारचा मेक, रंग, तिची वैशिष्ट्ये सांगितली असती तर ओमने ती लगेच ओळखून काढली असती.

''मी ते झाड शोधून येतो.'' म्हणून मंजुघोष उडाला.

''नको, नको'' ओम भीतीने थरथरत ओरडला. ''मला एकट्याला सोडून जाऊ नकोस.''

मंजुघोषाने परोपरीने ओमला समजवायचा प्रयत्न केला. पण ओम ऐकेना.

ओम, तुम्हाला पुत्रंजीवाचे झाडच हवे ना, मला माहीत आहे कुठेय ते! बसा रिक्षात लवकर. त्यात काय? असे जाऊ आणि असे येऊ. बघा आता दिवस किती चढलाय.''

मंजुघोषाला त्याचे म्हणणे पटले. चांगदुष्ट ही भलाई फुकट करणार नव्हता. त्याला ती मोहोरांची अख्खी थैली हवी होती. 'जर जंगलातल्या माकडांना तुम्ही ती देऊ शकता, तर ती मला द्यायला काय हरकत आहे?' असा त्याचा बिनतोड युक्तिवाद होता.

ओम आणि मंजुघोष रिक्षात चढले. ओमने डोळ्याची पापणीही झुकू न देण्याचा पण केला होता. त्याचा काही फायदा झाला नाही. एका चुकार क्षणी त्याचे डोळे मिटले. उघडले. तेवढ्यात ते जंगलातून एका नव्याच शहरात परतलेत असे त्याला दिसले.

रिक्षा एका बंगलीसमोर जाऊन उभी राहिली. त्या बंगलीच्या आवारात एक भला दांडगा वृक्ष उभा होता.

''ओम, चटकन आत जाऊन प्रदक्षिणा पूर्ण कर. कोणाचे लक्ष नाहीये.'' मंजुघोषाने सूचना दिली.

ओम शिताफीने फाटकाच्या मधल्या फटीतून आत घुसला. झाडाला हात लावून त्याने एक प्रदक्षिणा पूर्ण केली. नमस्कार केला तोच, 'कोण आहे रे तिकडे?' म्हणून एक चढा आवाज कानावर आला. ओम ताबडतोब सटकला. रिक्षा गाठेपर्यंत त्याच्या छातीत धडधडत होते. मागे वळून कोण विचारतेय एवढेही त्याने पाहिले नाही.

''इश्श! मी मंजुळा बोलतेय ना इथे, असं काय खुळ्यासारखं इथे तिथे पाहायचं? इकडे, इकडे पाहा ना बाई.'' ओमच्या कानावर मंजुघोषाचे आवाज येत होते. रिक्षात येऊन बसल्यावर त्याला जाम हसू आवरेना. मंजुघोषाने बंगलीच्या मालकाचे लक्ष दुसरीकडे वेधताना त्याचा पार मामा केला होता. बिच्चारा! त्याला काय माहित ही मंजुळा खरोखरची रानात उडणारी उनाड मैना होती.

चांगदुष्टाने रिक्षा बंगलीच्या बाजूच्या रस्त्याच्या कडेला नेऊन लावली. मंजुघोष पुत्रंजीवाची एक एक फांदी थोड्याथोड्या वेळाने घेऊन आला. बारा फांद्या जमल्यावर रिक्षाने पुढे कुच केले.

''हे तुझ्या अर्जाचे नमुने,'' म्हणून मंजुघोषाने त्या बारा फांद्या ओमच्या हातात ठेवल्यावर ओम उडालाच. ''आपल्याकडे दुसरा आकाशमोती असता तर एवढे सायास पडले नसते. त्या नक्षत्रकपीने बदल्यात या फांद्या - नमुने आणून दिले असते. त्यांचे कामच आहे ते! प्रदक्षिणा फी भरली की त्यांना हे नमुने द्यावेच लागतात.'' मंजुघोषाने स्पष्टीकरण दिले.

''प्रदक्षिणेची फी? आकाशमोती?'' ओमने अचंब्याने विचारले.

''नव्हे, नव्हे. फी म्हणजे प्रदक्षिणा बरे. तिथेच पुत्रंजीवाचे झाड असते तर त्याला एक प्रदक्षिणा घालून काम झाले असते. खरे म्हटले तर तसे असायला हवे होते हो. काय हो रिक्षावाले?''

''नाही कोण म्हणतो? नक्षत्रवनात सगळ्या प्रकारची झाडे आहेत तर पुत्रंजीवी नाही कोण म्हणतो? मला माहीत होत कुठेय ते.'' चेहऱ्यावर लबाड भाव आणत चांगदुष्ट म्हणाला.

ओमचे डोळे मोठ्ठे झाले. 'मग मगाशी ते का दाखवलं नाही?' तो एकदम बोलून गेला.

''ओहो, ओमना राग आला की हो!'' आणि चांगदुष्टाने एक हात चाकावरचा सोडत मोहोरांची थैली त्या हाताने वर उडवून झेलून दाखविली. ओमला संताप आला. सांगून सवरून वर ही बदमाषी. मंजुघोषने हलकेच ओमच्या वळलेल्या मुठीवर पंख घासला. जणू धीराने घे समजावले. खरोखर त्या अर्ध्या भल्या, अर्ध्या वाईट चांगदुष्टाचे आपण काय करू शकणार होतो या विचाराने ओम गप्प बसला.

या धुमसणाऱ्या रागाने त्याची सगळी भीती मात्र दूर पळाली. त्याने चांगदुष्टावरची नजर हटवून बाहेर बघितले.

एका नदीच्या काठाकाठाने रिक्षा पळत होती. नदीच्या तीरावर दोन्ही बाजूला जंगल होते. नदी अगदी संथ वाहत होती.

''हे आले आपले ठिकाण! गुप्तगंगेचा काठ.'' मंजुघोष म्हणाला. ओमचा हात त्याच्या नकळत गळ्यातल्या रुद्राक्ष माळेवर गेला.

(क्रमशः)

समीर बागायतकर, वेंगुर्ला
९८६०४९८८६२
इ-मेल : ssbagayatkar@yahoo.co.in

# चित्र रंगवा



# शिकार

निळोबा डोंगराचा पायथा हिरव्यागार झाडाझुडपांनी भरून गेला होता. जंगलात आदिवासींची छोटीशी वस्ती होती. काही आदिवासी डोंगर-पायथ्याच्या सपाट जमिनीवर थोडी-फार शेती करीत. काहीजण औषधी वनस्पती, कंदमुळे, मधाची पोळी वगैरे गोळा करून जवळच्या शहरात नेऊन विकत. काबाडकष्ट करून आपलं पोट भरीत.

काळू आदिवासी एके दिवशी जंगलातील औषधी वनस्पती आणि जंगली फळे घेऊन शहरात विकायला गेला. पण त्या दिवशी त्याचा माल खपलाच नाही. दिवसभरात कशीतरी फक्त दहा-बारा रुपयांचीच विक्री झाली. इतक्या कमी पैशात आपल्या कुटुंबाचा दोन दिवसांचाही खर्च भागणार नाही, या विचारानं तो उदास झाला. या औषधी वनस्पती विकून काही आपल्याला पुरेसे पैसे मिळत नाहीत. या ऐवजी जास्त पैसे मिळवून देणारा दुसरा काही धंदा केला पाहिजे. 'कोणता धंदा करावा बरं?' या विचारात असतानाच बाजारपेठेत त्याला एक दुकान दिसलं. कातडी पट्टे, नक्षीकाम केलेल्या कातडी पिशव्या, 'फर'च्या म्हणजे केसाळ मऊ कातड्याच्या टोप्या अशा छानदार वस्तू त्या दुकानात होत्या. दुकानातल्या वस्तू नवलाईनं बघत काळू दुकानासमोर उभा राहिला. त्याच्या पोषाखावरून तो आदिवासी आहे, हे ओळखून दुकानदारानं त्याला आत बोलवलं. मोठ्या प्रेमानं काळूची विचारपूस केली. काळूचा चहा-पाव संपवल्यावर दुकानदार हळूच त्याला म्हणाला,

''अरे, औषधी विकणं हे तुझ्यासारख्या तगड्या माणसाचं काम नव्हे. तुझ्यासारख्या बहाद्दरानं जंगलात शिकार केली पाहिजे- शिकार!''

'शिकार' हा शब्द ऐकताच काळूच्या अंगात उत्साह संचारला. त्यानं दुकानदाराला विचारलं,

''हा, पन कोनाची शिकार करू?''

''अरे तुमच्या जंगलात हरणं आहेत ना, त्यांची शिकार करायची. दर आठवड्याला एक हरण मारायचं आणि अंधार पडल्यावर गुपचूप दुकानाच्या मागच्या बाजूला आणून द्यायचं. एका हरणाला पाचशे रुपये देईन. पण लक्षात ठेव, ही गोष्ट कोणालाही न कळता झाली पाहिजे. आलं ध्यानात?''

एका हरणाला पाचशे रुपये ही किमत ऐकून काळूच्या तोंडाला पाणी

सुटलं, गेल्या कितीतरी दिवसात त्याला पन्नास रुपयांची नोट ही बघायला मिळाली नव्हती. दुकानदाराला त्यानं होकार दिला. काळूने एका हरणाची शिकार केली. दुकानदाराने त्याला पाचशे रुपये दिले. तो खूष झाला. शिकारीच्या नव्या उद्योगामुळं काळू आता चैनरत राहू लागला. पण त्यामुळं जंगलातल्या वाघांची मात्र उपासमार होऊ लागली. हरणं म्हणजे वाघांचं खाद्य. काळून हरणांची शिकार सुरू केल्यापासून राहिलेली हरणही दूरच्याजंगलात जाऊ लागली. त्यामुळं वाघांना पूर्वीसारख खायला मिळेना. पूर्वी सहसा नजरेला न पडणारे वाघोबा आता वरचेवर आदिवासींच्या झोपड्यांच्या आजूबाजूला फिरू लागले. उपाशी वाघांच्या डरकाळ्या जंगलात घुमू लागल्या.

काळू आपला उद्योग लपूनछपून करत होता. घनदाट जंगलातल्या आडवाटेनं मारलेल्या हरणाचं धड शहरातल्या दुकानदाराला रात्रीच्या अंधारात पोचवत होता.

काळू हरणाची शिकार करतो ही गोष्ट त्याच्या वस्तीतल्या लोकांना दोनतीन आठवड्यातच कळली.

''काळू तू हरणं मारतंय् हे चागला काम नाय्. देवीचा तुज्यावर कोप हुईल.'' शेजारचा बुधा त्याला म्हणाला.

पण जास्त पैशाची चटक लागलेल्या काळूनं त्याच्या बोलण्याकडं मुळीच लक्ष दिलं नाही. उलट त्याच्याच अंगावर ओरडत तो म्हणाला,

'बुध्या, मला लय् शानपना सांगू नगंस. आन् ध्येनात टेव, म्या हरणं मारतू हे



कुनाला सांगशील तर तुला जित्ता ठिवनार नाय् .'

एका संध्याकाळी दाट झाडीतल्या रस्त्यानं धनुष्य-बाण घेऊन शिकारीला निघालेल्या काळूला वनखात्याच्या शिपायानं पकडून आपल्या साहेबासमोर उभं केलं. साहेबांनी त्याची चौकशी केली. जंगलातल्या प्राण्यांची शिकार करणं हा गुन्हा आहे याची त्याला समज दिली. 'हा गुन्हा करताना तू सापडलास तर तुला तुरुंगात पाठवीन' असं त्यांनी कडक शब्दात काळूला बजावून सांगितलं काळू चांगलाच घाबरला. साहेबांच्या हातापाया पडू लागला. तेव्हा पुन: एकदा समज देऊन साहेबांनी त्याला सोडून दिलं.

आपण हरणांची शिकार करतो हे बुध्यानंच साहेबांना सांगितलं असलं पाहिजे असं त्याला वाटलं. बुधाचा सूड उगवण्यासाठी तो संधीची वाट बघू लागला.

एके दिवशी बुधा ओढ्याकाठची कंदमुळे गोळा करण्यासाठी निघाला तेव्हा काळूनं त्याला पाहिलं. बांबूच्या नळकांड्यात ठेवलेल्या बाणाच्या लोखंडी टोकाला चांगली धार करून बाणाचं टोक विषारी वनस्पतीच्या रसात बुडवून धनुष्य खांद्याला; आणि भाता पाठीला अडकवून काळू करवंदीच्या जाळीपाशी आला. समोरच्या ओढ्याच्या काठावर कंदमुळं खणून काढत होता. मग करवंदीच्या झुडपाजवळच्या मोकळ्या जागेत येऊन काळूने धनुष्याला बाण लावून बुधावर नेम धरला. बुधावर बाण सोडण्यासाठी काळूनं धनुष्याची दोरी कानापर्यंत ताणली इतक्यात काय झालं?

मागच्या बाजूनं प्रचंड गर्जना करत एका मोठ्या वाघानं काळूच्या अंगावर झेप घेतली. काळूच्या हातातल धनुष्य-बाण गळून पडलं आणि तो जमिनीवर पालथा पडला.

भुकेनं चवताळलेल्या वाघानं काळूवर झेप घेतली. आपल्या पंजानं त्याचा चेहरा रक्तबंबाळ केला. काळू जमिनीवर कोसळला.

आजवर अनेक हरणांची शिकार केलेला काळू आज स्वत:च वाघाची शिकार बनला होता!

**माधव अ. कुंभोजकर,**
सांगली

# ओळखा पाहू



## शक्तिमानचा जनक

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक १५ नोव्हेंबर २०११ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.

बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.

निकाल जानेवारी २०१२च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,** मेहता मराठी ग्रंथजगत विभाग, १९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, पुणे टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०.

'ऑगस्ट' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एक अग्रगण्य व्यक्तिमत्त्व - एन. आर. नारायणमूर्ती

स्पर्धेचे विजेते **सतिष साठे - औरंगाबाद**

पी.व्ही.पाटील, अनिकेत कुलकर्णी, रमेश रामचंद्र गटकळ - पुणे, डी.टी.नन्दापुरे - यवतमाळ, चंद्रकांत अंबाडे - भुसावळ, पौर्णिमा युगंधर - नाशिक, वैदेही वनारसे, मंजिरी खरे, शि.वा. आठवले, रा.द.ढुमणे - पुणे, भीमराव गुंडे, नागेश गरंडे - सोलापूर, रुपाली कागले - कोल्हापूर, योगेश आंबटकर, वसंत कोठारी, मधुकर भिडे, रामचंद्र धर्माधिकारी - अहमदनगर, डॉ. जयंत जुननकर - नागपूर, निषाद कुलकर्णी - सांगली, अ.शा.सुरासे - औरंगाबाद, सुशीला पाटील, अमित ठाकरे - अमरावती, विद्या कापडी - गोवा, दिगंबर संत, धनंजय नामजोशी, अनुया चंद्रात्रे - मुंबई, भगवान बनसोडे, मिलिंद महाराज, रफीक सत्तार, सुरेश कात्नेश्वरकर - नांदेड, चंद्रकांत अंबाडे - भुसावळ, कृष्णा निबदे - रत्नागिरी, रविंद्र सराफ - रावेर

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,

**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**

टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना** - प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०%  तीन वर्षांना २५%  पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची**
**वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षांची**
**वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची**
**वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच**
**वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'लोखंड खाणारे उंदीर'** आणि **'नशीबवान शेखर'**
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची
पुस्तके भेट!
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चला जाणून घेऊ या! मंत्रसामर्थ्य'**
आणि **'चला जाणून घेऊ या! प्रार्थना'**
प्रत्येकी ४० रु. ची
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.




**भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 oct. 2011

# कॅन्सर रोखू या

## नवे कोरे




वैद्यकशास्त्राने कितीही प्रगती केली असली तरी कॅन्सर हा विकार आजही असाध्य समजला जातो. कारण मानसिक व शारीरिकदृष्ट्या रुग्णावर आघात करणाऱ्या या आजारावर अजून तरी 'रामबाण' उपाय सापडलेला नाही.

आधुनिक जीवनशैलीचा शाप म्हणून आज मोठ्या प्रमाणात कॅन्सर आपल्यासमोर येत आहे. आधुनिक उपचार आणि मानसिक संतुलन शिकवणारे पारंपरिक भारतीय शिक्षण व आहारपद्धती या दोघांचा मेळ साधल्यास कॅन्सरशी सामना करणे तुलनेने सोपे जाते, ही वेगळी दृष्टी या पुस्तकातून मिळते.

**मूळ लेखक – डॉ. डेव्हिड सर्व्हन–श्रायबर**

**अनुवाद : वन्दना अत्रे । डॉ. चंद्रकांत संकलेचा**

**१८०रु. पोस्टेज २०रु.**

## मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे – ३०. फोन – (०२०) २४४७६९२४

BOOK POST
Printed Matter

प्रति, ______________________

______________________

______________________

______________________

**संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.**